नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ८३ * * नागपूर * | शनिवार, दिनांक २१ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## ८ आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करांना अटक

■ **वृत्तसंस्था, गुडगाव, दि. २० :**
गुरुग्राममधील पोलिसांनी एका आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा पदार्फाश करून मोठे यश मिळवले आहे. सेक्टर-४३ गुन्हे शाखेच्या पथकाने ड्रग्ज तस्करीविरुद्ध कारवाई करताना सात परदेशी नागरिकांसह एकूण ८ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी सुमारे १ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहेत.
पोलिसांनी पोखरा (नेपाळ) येथील रहिवासी बिमल पहाडी याला सेक्टर-३९ येथून अटक केली, त्याच्याकडून १ किलो ६० ग्रॅम सल्फा आणि ११६ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या एकूण ड्रग्जची किंमत सुमारे १ कोटी रुपये आहे.

अग्रालेख

## खरीखरी..

## परिवहनातील महाखड्डे

केंद्रीय परिवहन मंत्रालयाने काही महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये दुचाकी वाहनधारकांसाठी जानेवारी २०२६ पासून दोन हेल्मेट असणे सक्तीचे करण्यात आलेले आहे. केंद्रीय परिवहन मंत्रालय सध्या नितीनजी गडकरी यांच्या ताब्यात आहे. ते जीव तोडून सर्वांच्याच जिवाचे रक्षण करावे. म्हणून प्रयत्नशील असतात. आपल्या भारतात मोठा प्रश्न हा आहे की, केवळ २० ते २५ टक्के वाहनधारकच नियमांचे पालन करतात. बाकी वाहनधारक आणि चालकांच्या बाबत सगळा आनंदी आनंद आहे. मात्र जोपर्यंत आपल्या वाहन चालकांची ही मानसिकता बदलत नाही. तोपर्यंत आपल्या देशात आपण कितीही कायदे आणले, काहीही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. तरी त्याचा फारसा परिणाम होईल असे वाटत नाही. आम्ही नेहमी सकारात्मक विचार करतो. पण काही बाबी अशा आहेत की, त्याच्यावर आपल्या महान भारतात तरी कधी सुधारणा होतील, असे वाटत नाही. आपल्या देशातील अपघातात सर्वात जास्त अपघात दुचाकी वाहनांचे असतात. या अपघातांची कारणेही तुम्हा आम्हाला ठाऊक आहेत. आपल्या येथे दुचाकीवर दोन लोकांना बसण्याची कायदेशीर परवानगी आहे. आतापर्यंत फक्त चालकाच्या डोक्याला हेल्मेटचे बंधन होते. आता नव्या कायद्याप्रमाणे मागे बसणाऱ्यालाही हेल्मेट घालावे लागेल. या हेल्मेटचीही मोठीच गंमत आहे. अनेक शहाणे हेल्मेट ऐवजी साधी प्लास्टिकची टोपी वापरतात. त्यामुळे धड डोकेही झाकले जात नाही. विशेष म्हणजे अशा डुप्लिकेट आणि तथाकथित हेल्मेटवर अजूनही गंभीरपणे कोणतीही कारवाई होत नाही. म्हणजेच यापुढे हेल्मेट सारखेच हेल्मेट असावे. ते मजबूत असावे. आयएसआय मार्क असावे, हा महत्त्वाचा संदेश वाहन चालकांच्या डोक्यात बसला पाहिजे. दुसरी बाब म्हणजे आपले दीड शहाणे वाहनचालक दोन ऐवजी, गाडीवर किमान तिघांना तरी सर्रासपणे बसवतात. काही बहाद्दर तर चार ते साडेचार जणांना बसवून तुफान वेगाने गाडी दामटवतात. यामुळे अपघाताची शक्यता कित्येक पटीने वाढते. यापुढचा मुद्दा सिग्नल तोडणाऱ्या गाढवांचा आहे. आपल्याला समोर जायचे आहे. सिग्नल वर लाल बत्ती दिसत आहे. तरी आजूबाजूला पाहून किंवा दुर्लक्ष करून कितीतरी सिग्नलतोडू गाढव सम्राट आपल्या गाड्या बिनदिक्कतपणे पुढे घुसवत असतात. ही गोष्ट जशी आपली जनसंख्या आटोक्यात येत नाही तशीच आटोक्यात न येणारी आहे. या पुढची गोष्ट म्हणजे आता आपल्या देशात अनेक ठिकाणी रस्त्याची दोन भागात विभागणी करणारे द्विभाजक बसवलेले आहेत. त्यामुळे एका बाजूने जाणे आणि दुसऱ्या बाजूने येणे अपेक्षित असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने ही गोष्ट कितीही महत्त्वाची असली. तरी तशी सवय अजून तरी आपल्या वाहनधारकांना लागलेली नाही. उलट दिशेने वाहन चालवणे, हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. अशा तोऱ्यात वाहन चालवणाऱ्यांचे दररोज हजारोंनी अपघात होतात. त्याला आळा कसा बसेल, हा सुद्धा आपल्या समोरील यक्षप्रश्न आहे. यापुढचा मोठा विषय म्हणजे आपले मोबाईलप्रेम, कान आणि खांदा यांच्यामध्ये मोबाईल दाबून सडकेकडे तिरका डोळा करून वाहन चालवणारे मोबाईलप्रेमी वेगबहाद्दर आपण काही गुन्हा करीत आहोत. असे समजतच नाहीत. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे कोणतेही कारण नसताना निव्वळ उन्माद म्हणून तुफान वेगाने गाडी चालवणे. हे अपघातांचे सर्वात मोठे कारण आहे. गर्दीच्या ठिकाणी उलटसुलट गाडी चालवून स्वतःबरोबर इतरांचाही जीव धोक्यात घालणारेही कमी नाहीत. एक खास गोष्ट तर आम्ही विसरलोच. ती म्हणजे अनेक वीर बहाद्दर घरून किंवा बारमधून मस्तपैकी झिंगून रस्त्यावर बेदरकारपणे वाहन चालवण्याच्या नादात निरपराध लोकांना मारतात आणि स्वतःही मरतात. आमच्या डोक्यात जे जे धोके शिरलेले आहेत. ते ते या खरीखरी मध्ये सांगण्याचा हा आमचा खराखुरा प्रयत्न आहे. आता यावर काय उपाय, तर भारतातील जी काही पोलीस ठाणी आहेत. तेथील सर्व पोलिसांना केवळ वाहतूक संचालनाचे काम देण्यात आले. तरच या बाबी बंद होऊ शकतील. मात्र पोलिसांची इतर सर्व कामे बंद ठेवता येतील काय. कोणत्याही शहरातील पोलिसांच्या वाहतूक शाखेत आवश्यक तेवढे मनुष्यबळ उपलब्ध राहत नाही. जे काही उपस्थित असतात. त्यापैकी ६० ते ७० टक्के पोलीस अगदी इमानदारीने काम करतात. इतर पोलीस चक्क डोळे उघडे ठेवून झोपा काढत असतात. त्यामुळे केंद्रीय परिवहन मंत्रालयाने हेल्मेट बाबत काढलेल्या आदेशानंतर वरील सर्व बाबींचा गंभीरपणे विचार करून, जो कोणी नियम तोडणार असेल. त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करणे हाच एकमात्र उपाय ठरणार आहे. त्यामध्ये पहिल्यांदा दंड, दुसऱ्यांदा जादा दंड आणि तिसऱ्यांदा परवाना स्थगिती एवढे कठोर झाल्याशिवाय शिस्त लागेल, असे दिसत नाही. आपल्या परिवहन यंत्रणेत शिस्त आणण्यासाठी परिवहनातील हे महाखड्डे बुजवण्याचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या देशातील जुगाडू नागरिकांचा अनुभव पाहता, हे शिवधनुष्य पेलणे किती कर्मकठीण आहे. याची प्रचिती येईल. अपघात वीरांना नमन असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### इराणने भारतासाठी उघडले हवाई क्षेत्र

# विद्यार्थी परतणार!

■ **वृत्तसंस्था**
**तेहरान/तेल अवीव, दि. २० :**
इस्रायलसोबतच्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या युद्धादरम्यान इराणने भारतासाठी आपले हवाई क्षेत्र उघडले आहे. ऑपरेशन सिंधू अंतर्गत, भारत सरकार पुढील दोन दिवसांत ३ विशेष चार्टर्ड विमानांद्वारे सुमारे १ हजार भारतीय विद्यार्थ्यांना तेथून सोडवेल.
माध्यमांच्या वृत्तानुसार, विद्यार्थ्यांना घेऊन जाणारे एक विमान शुक्रवारी रात्रीपर्यंत भारतात पोहचले आणि शनिवारी दुपारपर्यंत दोन विमाने भारतात पोहोचतील. या उड्डाणांची व्यवस्था भारत सरकारने केली आहे. ही उड्डाणे इराणमधील मशहद येथून उड्डाण करतील आणि दिल्लीत उतरतील.
यापूर्वी, १९ जून रोजी ११० भारतीय विद्यार्थी इराणहून भारतात पोहोचले होते. तथापि, त्यांना जमीनी सीमेवरून इराणमधून बाहेर काढण्यात आले. कारण १३ जून रोजी इस्रायली हल्ल्यापासून इराणचे हवाई क्षेत्र आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी बंद होते.
आज इराण आणि इस्त्रायलमधील युद्धाचा आठवा दिवस होता. आज सकाळी इराणने इस्त्रायलच्या बेरशेबा शहरातील मायक्रोसॉफ्ट ऑफिसजवळ बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ला केला. यामुळे अनेक गाड्यांना आग लागली. आजूबाजूच्या घरांचेही नुकसान झाले. गुरुवारी इराणने बेरशेबा येथील एका रुग्णालयावर क्षेपणास्त्र डागले, ज्यामध्ये ५० हून अधिक लोक जखमी झाले.
न्यूयॉर्क टाईम्समधील एका वृत्तानुसार,




अमेरिकेचा असा विश्वास आहे की इराणकडे आता अण्वस्त्रे बनवण्याची पूर्ण क्षमता आहे. व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी सांगितले की जर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी आदेश दिला तर इराण काही आठवड्यात अण्वस्त्रे बनवू शकतो.
लेविट म्हणाले की इराणकडे अण्वस्त्रे बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आहेत. आता त्यांना फक्त त्यांच्या नेत्याच्या होकाराची वाट पाहावी लागेल. जर इराणने असे केले तर ते केवळ इस्त्रायलच नव्हे तर अमेरिकेच्या आणि संपूर्ण जगाच्या सुरक्षेला धोका निर्माण करेल असेही त्यांनी सांगितले.
आतापर्यंत ७ दिवसांच्या युद्धात २४ इस्त्रायली मारले गेले आहेत, तर ६०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. त्याच वेळी, वॉशिंग्टनस्थित एका मानवाधिकार गटाने दावा केला आहे की इराणमध्ये मृतांची संख्या आता ६३९ वर पोहोचली आहे आणि १३२९ लोक जखमी आहेत.

## डबल इंजिन सरकारचा दुहेरी फायदा

### ओडिशात प्रधानमंत्री मोदींचा रोड शो : व्हिजन डॉक्युमेंट्स जाहीर



■ **वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. २० :**
पंतप्रधान मोदींनी शुक्रवारी भुवनेश्वरमध्ये सांगितले की, ओडिशातील डबल इंजिन सरकारमुळे लोकांना दुहेरी फायदा मिळत आहे. आज ओडिशातील भाजप सरकारने एक वर्ष पूर्ण केले आहे. हा केवळ सरकारचा वर्धापन दिन नाही. हा एका स्थापित सरकारचा वर्धापन दिन आहे. हा सुशासनाचा वर्धापन दिन आहे.
ते म्हणाले की, ओडिशातील लाखो गरीब कुटुंबे बऱ्याच काळापासून आयुष्मान योजनेच्या बाहेर होती. आज येथे आयुष्मान भारत आणि गोप बंधू जन आरोग्य योजना दोन्ही सुरू आहेत. यामुळे ओडिशातील सुमारे ३ कोटी लोकांना मोफत उपचारांचा लाभ मिळण्याची खात्री आहे.
तत्पूर्वी, ओडिशातील भाजप सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, पंतप्रधानांनी २०३६ पर्यंत विकसित ओडिशा आणि २०४७ पर्यंत विकसित भारत निर्माण करण्यासाठी व्हिजन डॉक्युमेंट्स जारी केले. त्यांनी विमानतळ ते जनता मैदानापर्यंत रोड शो केला.
पंतप्रधान मोदी म्हणाले, ओडिशातील शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून दुहेरी फायदा मिळू लागला आहे. आमच्या सरकारची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे वंचितांचे सक्षमीकरण. ओडिशामध्ये आदिवासी समाज राहतो. पूर्वी, ते सतत दुर्लक्षित राहिले. त्यांना मागासलेपण, गरिबी आणि वंचितता सहन करावी लागली. देशावर दीर्घकाळ राज्य करणाऱ्या पक्षाने आदिवासींचा राजकारणासाठी वापर केला. त्यांनी आदिवासी समाजाला विकास किंवा सहभाग दिला नाही. त्यांनी त्यांना नक्षलवाद आणि हिंसाचाराच्या आगीत ढकलले.'
'आदिवासी भाग नक्षलवादाच्या विळख्यात होता. रेड कॉरिडॉरच्या नावाने त्याची बदनामी होत होती. आम्ही आदिवासी समाजाला हिंसाचारातून बाहेर काढून विकासाच्या मार्गावर आणण्याचे काम केले आहे.
एकीकडे हिंसाचार पसरवणाऱ्यांवर आम्ही कठोर कारवाई केली, तर दुसरीकडे आदिवासी भागात विकासाची लाट आणली. आज देशात २० पेक्षा कमी जिल्ह्यांमध्ये नक्षलवादी उरले आहेत. ज्या वेगाने कारवाई केली जात आहे, त्यामुळे लवकरच आदिवासी समाजाला स्वातंत्र्य मिळेल, दहशतवाद संपेल.
'देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती, ओडिशाच्या कन्या मुर्मू जी यांनी या योजनेसाठी मार्गदर्शन केले आहे. याअंतर्गत आदिवासींमधील सर्वात मागासलेल्या आदिवासींना मदत करण्याचे काम केले जात आहे. पहिल्यांदाच मच्छीमारांसाठी पंतप्रधान मत्स्य संपदा योजना करण्यात आली आहे. ही देशभरात आहे. मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्डची सुविधा देखील मिळाली आहे. २५ हजार रुपयांचा विशेष निधी तयार केला जाणार असल्याचे ते म्हणाले

## बोल बच्चन भैरवींना मी उत्तर देत नाही..

### ठाकरेंच्या टीकेवर फडणवीसांचा पलटवार

■ **वृत्तसंस्था**
**जळगाव, दि. २० :**



उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीवर टीका केली होती. मराठी माणसांची शक्ती एकत्र येऊ नये म्हणून यांच्या मालकांचे नोकर भेटीगाठी घेत आहेत, असे ते म्हणाले होते. फडणवीस यांनी शुक्रवारी जळगाव येथे त्यांच्यावर पलटवार करताना मी बोल बच्चन भैरवींना उत्तर देत नाही, असा उपरोधिक पलटवार केला.
काहीही झाले तरी मुंबई पुन्हा एकदा आमच्या ताब्यात येणारच आहे. मुंबई मराठी माणसांच्या ताब्यात गेली तर यांच्या मालकांचे कसे होणार? मालकाच्या मित्राचे कसे होणार? म्हणून मराठी माणसांची शक्ती एकवटता कामा नये म्हणून शेठजीचे काही नोकर प्रयत्न करत आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते.
पत्रकारांनी शुक्रवारी याविषयी फडणवीस यांना छेडले असता त्यांनी केवळ एका वाक्यात या प्रश्नाला उत्तर दिले. मी बोल बच्चन भैरवींना उत्तर देत नाही, असे ते उद्धव ठाकरे यांचा नामोल्लेख टाळत त्यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले. समाजात विशेषतः जनजातीय क्षेत्रात काही लोक फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. काही लोक खोट्या गोष्टी सांगून आमच्या जनजातीय बंधू भगिनींना इतर लोकांपासून वेगळे कसे करता येईल याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आपण सावध राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

## आज एअर इंडियाची ८ उड्डाणे रद्द

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
एअर इंडियाने शुक्रवारी ८ उड्डाणे रद्द केली आहेत. यामध्ये ४ आंतरराष्ट्रीय आणि ४ देशांतर्गत उड्डाणे समाविष्ट आहेत. विमानतळावरील देखभाल आणि ऑपरेशनल कारणांमुळे ही उड्डाणे रद्द करण्यात आल्याचे एअर इंडियाने म्हटले आहे. देशांतर्गत उड्डाणांमध्ये, पुणे ते दिल्ली, अहमदाबाद ते दिल्ली, हैदराबाद ते मुंबई आणि चेन्नई ते मुंबई उड्डाण रद्द करण्यात आली आहेत.

## राहुल गांधी म्हणाले... इंग्रजी लाज नव्हे तर शक्ती



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :**
काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की इंग्रजी भाषा सक्षम करते. ती लज्जास्पद नाही आणि ती प्रत्येक मुलाला शिकवली पाहिजे. गरीब मुलांनी ही भाषा शिकावी असे भाजप-आरएसएसला वाटत नाही कारण त्यांना प्रश्न विचारावेत आणि समानता मिळवावी असे त्यांना वाटत नाही, असा आरोप त्यांनी केला.
राहुल गांधी यांची ही पोस्ट अमित शहा यांच्या त्या टिप्पणीनंतर आली आहे, ज्यामध्ये शहा म्हणाले होते की या देशात इंग्रजी बोलणाऱ्या लोकांना लवकरच लाज वाटेल.
इंग्रजी हे धरण नाही, ते एक पूल आहे. इंग्रजी ही लाज नाही, ती शक्ती आहे. ती साखळ्या तोडण्याचे एक साधन असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

## नीतेश राणेची जीभ घसरली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**
उद्धव ठाकरे यांना उत्तर देताना आज नीतेश राणे यांची जीभ घसरली. त्यांनी अत्यंत खालच्या शब्दांत आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली. स्वतःचा मुलगा कसा आहे, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे मला पेंग्विन बोलून फरक पडत नाही. स्वतःच्या मुलाची अवस्था बघा. आमचे तोंड उघडायला लावू नका. आधी स्वतःच्या मुलाची अवस्था बघा. मौलवींना खूश करण्यासठी उद्धव ठाकरे टीका करतात, असेही नीतेश राणे म्हणालेत.
उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना, उंची पेंग्विनची, चाल बदकाची आणि आवाज कोंबडीचा अशी टीका नीतेश राणे यांच्यावर केली होती. आज नीतेश राणेंनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरेंच्या टीकेला उत्तर देत जोरदार पलटवार केला आहे. स्वतः चा मुलगाच असा असल्यामुळे त्यांना बाकी सगळे पेंग्विन, कोंबडा असे दिसणार, त्यांना त्यांच्या मुलाची चिंता आहे, आवाज पाहिला की बाई आहे की पुरूष आहे कळत नाही. म्हणून आमचे तोंड उघडायला लावू नका, आपल्या मुलाची अवस्था पाहा, असे नीतेश राणे म्हणाले.

### अमित शहा यांच्या दौऱ्यापूर्वी चकमकीत

# महिला नक्षलवादी ठार

### कांकेरमधील जंगलातून सापडले मृतदेह आणि अनेक शस्त्र

■ **वृत्तसंस्था, कांकेर, दि. २० :**
छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीपूर्वी जवानांनी एका महिला नक्षलवाद्याला चकमकीत ठार केले आहे. जवानांनी घटनास्थळावरून महिला नक्षलवाद्याचा मृतदेह आणि रायफलसह अनेक शस्त्रे जप्त केली आहेत. ही घटना छोटेबेतिया पोलिस स्टेशन परिसरातील अमटोला भागातील आहे.
सैनिकांना अमटोला आणि कालपर भागात १५-२० नक्षलवादी असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर डीआरजी आणि बीएसएफची संयुक्त टीम ऑपरेशनसाठी पाठवण्यात आली. यादरम्यान नक्षलवाद्यांशी चकमक झाली.
पोलिस अधीक्षक आयके एलिसेला म्हणाले की, या भागात नक्षलवाद्यांचा एक छोटा गट सक्रिय आहे, जो सुरक्षा दलांना हानी पोहोचवण्यासाठी, बांधकाम थांबवण्यासाठी आणि तेंदूपत्ता खरेदीवर परिणाम करण्याच्या उद्देशाने आला होता. त्यांची संख्या सुमारे १५ ते २० आहे.
त्यांनी सांगितले की, चकमकीनंतर एका महिला नक्षलवाद्याचा मृतदेह सापडला, ज्याची प्रथमदर्शनी ओळख कंपनी क्रमांक ०७ ची सदस्य म्हणून झाली आहे. याशिवाय ३०३ रायफल, देसी बीजीएल लाँचर, ३०३ काडतूसचे ७ तुकडे, वॉकी टॉकी अशा अनेक वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. चकमकीनंतर सैनिक परतले आहेत.
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा २२ जून रोजी छत्तीसगडच्या दौऱ्यावर येत आहेत. शहा नक्षलवादी हिंसाचारात शहीद झालेल्या पोलिस आणि अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना भेटतील. यासोबतच ते नक्षलविरोधी कारवाईच्या प्रगती अहवालाचा आढावा बैठकही घेतील.



अमित शहा यांनी गेल्या वर्षी रायपूरमधील एका सभेत सांगितले होते की, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवादाचे उच्चाटन केले जाईल. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी १ वर्षापेक्षा कमी वेळ शिल्लक आहे. शहा सरकार स्थापन झाल्यानंतर ३५० हून अधिक नक्षलवादी चकमकीत मारले गेले. त्यामुळे शहा यांचा हा दौरा नक्षलवादाच्या निर्मूलनासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.



छत्तीसगड पोलिस, बीएसएफ, सीआरपीएफ आणि इतर केंद्रीय पोलिस दलांचे उच्च अधिकारीही शहा यांच्या बैठकीत उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांनी शुक्रवारी त्यांच्या तयारीबाबत उच्चस्तरीय बैठक घेतली. मुख्यमंत्री साई यांनी शहा यांच्या भेटीची तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. अमित शहा रायपूरहून बस्तरलाही जाऊ शकतात.

# विमानांच्या सुरक्षेचे बजेट भारतात खूपच कमी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :**
अहमदाबादेत झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर संसदीय समितीने सादर केलेला अहवाल चर्चेत आला आहे. मार्चमध्ये राज्यसभेत सादर केलेल्या या अहवालात विमान अपघातांच्या चौकशीत आणि विमान सुरक्षेसाठी निधी देण्यात अनियमितता असल्याचे म्हटले आहे.
पर्यटन, वाहतूक आणि संस्कृती मंत्रालयावरील संसदीय स्थायी समितीच्या अहवालात म्हटले आहे की भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा विमान वाहतूक बाजार आहे, परंतु सुरक्षा पायाभूत सुविधा आणि विमान अपघातांच्या चौकशीसाठी केवळ ३५ कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत, जे पुरेसे नाही.
पर्यटन, वाहतूक आणि संस्कृती मंत्रालयावरील संसदीय स्थायी समितीचा अहवाल मार्चमध्ये राज्यसभेत मांडण्यात आला. या अहवालात




विमान वाहतूक संस्थांना देण्यात येणाऱ्या निधीबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आले होते
अहवालात म्हटले आहे की, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय, विमान अपघात तपास ब्युरो आणि नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो यांना मिळणारे बजेट खूपच कमी आहे आणि त्याच्या वाटपातही काही त्रुटी आहेत.
अहवालानुसार, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी डीजीसीएला ३० कोटी रुपये देण्यात आले होते, तर एएआयबीला फक्त २० कोटी रुपये आणि बीसीएएसला फक्त १५ कोटी रुपये मिळाले.
भारतातील विमानतळ आणि प्रवाशांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असल्याने, अधिक बजेट द्यावे, असेही समितीने म्हटले आहे. अहवालात म्हटले आहे की, २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय खर्चात प्रमुख विमान वाहतूक संस्थांमध्ये निधीच्या वाटपात स्पष्ट फरक आहे.
अहवालानुसार, विमान वाहतूक नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आणि विमान कंपन्यांवर देखरेख ठेवण्यासाठी जबाबदार असलेल्या डीजीसीएला एकूण बजेटच्या जवळपास निम्मे म्हणजे ३० कोटी रुपये देण्यात आले आहेत. या संदर्भात, समितीने असे सुचवले की या निधी वाटपाचा सखोल आढावा घेतला पाहिजे.

## हिंदीची सक्ती नको, पण द्वेषही विद्यार्थ्यांच्या हिताचे नाही : शरद पवार



**मुंबई:** हिंदी भाषेची सक्ती असू नये, पण तिचा द्वेष करणंही विद्यार्थ्यांच्या हिताचं नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे प्रमुख शरद पवार यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर आपली पहिली स्पष्ट प्रतिक्रिया व्यक्त केली. देशातील सध्याच्या राजकीय वातावरणात भाषावाद पुन्हा एकदा ऐरणीवर असताना पवार यांनी तितक्याच संतुलित आणि वास्तववादी भूमिकेने चर्चेला नवा दृष्टिकोन दिला आहे. ते म्हणाले, हिंदीची सक्ती होऊ नये हे खरं आहे. पण कोणी ती भाषा शिकत असेल, बोलत असेल, तर फक्त विरोधासाठी विरोध करण्याचं कारण नाही. भाषेच्या नावाने वैर नको. शरद पवार यांनी भाषेच्या निवडीचा निर्णय विद्यार्थ्यांवर आणि त्यांच्या पालकांवर सोडावा, असंही स्पष्ट केलं. एखाद्या विद्यार्थ्याला कोणती भाषा शिकायची हे त्याने आणि त्याच्या पालकांनी ठरवावं. शिक्षणामध्ये सक्ती नको, मार्गदर्शन हवं, असं सांगत त्यांनी राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारांचा आधार घेत भाषाविषयक स्वातंत्र्याचं समर्थन केलं. पवार पुढे म्हणाले, आपण एक गोष्ट विसरू नये देशातील ५५ ते ६० टक्के जनता ही हिंदी भाषा बोलते. त्यामुळे संवादासाठी, समजूतदारपणासाठी हिंदीचं महत्त्व नाकारता येत नाही. तिच्याकडे दुर्लक्ष करणंही योग्य ठरणार नाही. मात्र त्यांनी स्पष्ट केलं की, हिंदीचं महत्त्व मान्य करणं म्हणजे इतर भाषांचा अवमूल्यन नव्हे. आणि हे कारण देऊन कुणावर सक्ती करणं अजिबात योग्य

## धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत

### आदिवासी समाजाच्या गावात १७ प्रकारच्या योजना राबविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ **महासागर प्रतिनिधी, जळगाव, दि.२० :**

धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानअंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये १७ प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करून आदिवासी समाजाचा कायापालट केला जाणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. धरणगाव येथे उभारण्यात आलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचे उद्घाटन व जामनेर तालुक्यातील गोद्री फत्तेपूर येथे गोर बंजारा आणि लबाना कुंभ स्मृतीस्थळी पाच कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे ई-भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धरणगाव येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.



कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण,पद्मश्री चैत्राम पवार, अनिल भालेराव, शरदराव ढोले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतीस्मारक अत्यंत सुंदर झाले आहे. राणी दुर्गावती, भगवान बिरसा मुंडा, सिद्धू-कान्हू, तंट्या मामा, झलकारी बाई, राघोजी भांगरे, भिमा नाईक, रुमाल्या नाईक, राणा पुंजा भिल, यांच्यासारख्या अनेक नायकांचे दर्शन या स्मारकात घडते. हे स्मारक केवळ ऐतिहासिक नाही, तर येथे आश्रमशाळा असून अस्मिता जागवण्याचे कार्यही केले जाते. भविष्यात येथे महिलांसाठी कौशल्य विकास व फळप्रक्रिया प्रशिक्षण केंद्र उभारले जाईल. संस्कृती संवर्धनाचाही उपक्रम येथे राबविण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्याचा लढा सुरू केला आणि त्यानंतर जनजाती समाजातील अनेक नायकांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. परंतु त्यांचा इतिहास दुर्लक्षित राहिला. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने अशा नायकांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातून नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

खाज्याजी नाईक यांनी १८५७ च्या समरात भिल्ल जमातीचे ३० हजार लढवय्ये उभे करून महाराष्ट्र व मध्यप्रदेशात मोठा लढा दिला. त्यांच्या लढ्यामुळे इंग्रजांची सत्ता हादरली. इंग्लंडहून त्यांना ठार करण्याचे आदेश आले. त्यांच्यावर त्या काळी दोन हजार रुपयांचे बक्षीस ठेवले होते. त्यांनी इंग्रजांचा खजिना लुटून शस्त्र खरेदी केली. ह्यजिथे अन्याय, तिथे खाज्याजी नाईकह्न हे समीकरण बनले होते. अंबापाणीच्या लढाईत महिलांनीही शौर्य दाखवले. खाज्याजी नाईक अधिक काळ जगले असते तर कदाचित इंग्रजांना भारत सोडावा लागला असता, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'धरती आबा' योजनेंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये १७ प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी होणार आहे. केंद्र शासनाने यासाठी ८० हजार कोटी रुपये मंजूर केले असून, पुढील ५ वर्षांत एकही आदिवासी बांधव बेघर राहणार नाही. त्यांना शिक्षण, रोजगार व रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

## मनसेसाठी सध्या हिंदीचा मुद्दा महत्त्वाचा, युतीत तूर्त रस नाही : संदीप देशपांडे



**मुंबई :** राजकीय वतुर्ळात दोन्ही ठाकरे एकत्र येण्याबाबत चर्चा रंगल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनीही पक्षाच्या वर्धापन दिनी आयोजित मेळाव्यात मनसेसोबतच्या युतीबाबत सकारात्मकता दर्शवली. असे असतात मनसेने मात्र सध्या युतीपेक्षा हिंदी सक्तीविरोधी आंदोलनावर लक्ष केंद्रीत केले आहे. यासंदर्भात बोलताना मनसे नेते संदीप देशपांडे यांनी "आम्ही सध्या हिंदी सक्तीच्या विरोधासाठी रस्त्यावर उतरलो आहोत, युतीमध्ये फारसा रस नाही," असे स्पष्ट केले. त्याचबरोबर युतीचा विषय चर्चेत येत असतानाच, देशपांडे यांनी शिवसेनेच्या गतकालीन निर्णयांवरही जोरदार टीका केली आणि उद्धव ठाकरेंच्या उत्साहामागील हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हिंदी भाषा सक्तीच्या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सरकारविरोधात तीव्र आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. पालक मीटिंग्स, सह्यांची मोहीम, निदर्शने आणि जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिली.

## विकसित महाराष्ट्र २०४७' साठी सर्वेक्षणामध्ये नागरिकांनी मत नोंदवावे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

'विकसित महाराष्ट्र २०४७' चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी विविध १६ क्षेत्र निहाय नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण करण्यात येणार आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्युआर कोडवर नागरिकांनी आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

केंद्र सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला सन २०४७ पर्यंत विकसित भारत - भारत@२०४७ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन 2029 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर व सन 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविणे हे राज्याचे ध्येय आहे. राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे.

या कार्यक्रमामध्ये व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येणार आहे. व्हिजन डॉक्युमेंट तयार करताना दीर्घकालीन, मध्यमकालीन व अल्पकालीन अशी टप्पानिहाय उद्दिष्टे ठेवण्याचे निर्देश सर्व विभागांना देण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी १६ संकल्पनांवर आधारीत क्षेत्रनिहाय गट बनविण्यात आले आहेत. यामध्ये कृषि, शिक्षण, आरोग्य, ग्राम विकास, नगरविकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉफ्ट पॉवर, तंत्रज्ञान व मानव विकास/ मनुष्यबळ व्यवस्थापन असे हे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय/अशासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे.

विकसित महाराष्ट्राच्या व्हिजन मध्ये नागरिकांचे मत, अपेक्षा, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्याच्या दृष्टीने राज्यव्यापी नागरिक सर्वेक्षण अभियानाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिनांक १७ जून, २०२५ रोजी झाले आहे.

सर्व आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपासून गावपातळीवरील कार्यालय प्रमुखांनी सर्वेक्षणामध्ये सर्व नागरिकांनी आपले अभिप्राय नोंदवावेत यासाठी दर्शनी भागावर फलक लावावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये नागरिकांनी क्युआर कोडवर आपले मत नोंदवून विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे. या सर्वेक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांची कोणतीही वैयक्तिक माहिती संकलित करण्यात येणार नाही.

## पालखी मार्गावर चार ड्रोन सात हजार पोलिसांचा बंदोबस्त

■ **महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. २० :**

यंदाच्या आषाढी वारीत पालखी मार्गावर सुरक्षा व्यवस्थेसाठी विशेष तजवीज करण्यात आली असून, चार ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे पालखी मार्गावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवणे, भाविकांची संख्या मोजणे, तसेच चेन स्नॅचिंग व अन्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जाणार आहे. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी ही माहिती दिली.

फुलारी गेल्या चार दिवसांपासून सोलापूर ग्रामीण पोलिस दलाची आणि पुणे ते सोलापूर दरम्यानच्या पालखी मार्गाची पाहणी करत आहेत. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी सुरक्षेची आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. यंदा सात हजार पोलिसांचा टप्प्याटप्प्याने बंदोबस्त राहणार असून, पोलिस महासंचालक कार्यालयाकडून बॉम्बशोधक पथक, एसआरपीएफ पथक यांचीही तैनाती केली जाणार आहे.

हा बंदोबस्त पालखीच्या प्रारंभापासून ते समारोपापर्यंत असणार आहे. तसेच यंदा वारीसोबत जनरेटरचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

## विधान भवनात संसद व राज्यांच्या अंदाज समित्यांची राष्ट्रीय परिषद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२० :**

भारतीय संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद मुंबईच्या विधान भवनात आयोजित करण्यात आली आहे. येत्या २३ व २४ जून २०२५ रोजी होणाऱ्या या दोन दिवसीय परिषदेमध्ये संसद तसेच सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे समितीप्रमुख आणि सदस्य सहभागी होणार आहेत. या परिषदेच्या उद्घाटनास लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, तसेच महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची उपस्थिती लाभणार आहे. या परिषदेत प्रशासनीक कार्ये सक्षमपणे आणि अल्पव्ययासह होतील याची सुनिश्चिती करण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजांचे पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रण यासाठी अंदाज समितीची भूमिका या विषयावर विचारमंथन होणार असून, आर्थिक शिस्त व प्रशासनात पारदर्शकता कशी आणता येईल, यावर भर दिला जाणार आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे समिती प्रमुख अर्जुन खोतकर, तर लोकसभेच्या समितीचे प्रमुख डॉ. संजय जयस्वाल देखील परिषदेत आपले विचार मांडणार आहेत. महाराष्ट्रातील दोन्ही सभागृहांचे सदस्य आणि संसद सदस्यही यावेळी उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय परिषदेनंतर २४ जून रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पत्रकार परिषदेत परिषदेच्या निष्कर्षांची माहिती दिली जाणार आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र विधानमंडळाने अनेक ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. ८४ वी अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषद, उप राष्ट्रपती जगदीप धनखड यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान, तसेच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते पार पडलेला विधानपरिषद शतक महोत्सवातील ग्रंथ प्रकाशन सोहळा या मालिकेतील ही परिषद एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

## बेगानी शादी में ठाण्याचा अब्दुल्ला का नाचतो संजय राऊत यांचा एकनाथ शिंदेंवर निशाणा



**मुंबई :** भाजपमध्ये जाण्यासाठी शिंदे गट खूप उतवळा झाला होता, तुम्ही तुमचे बघा. दोन भावांनी कुणासोबत युती करावी हा आमचा प्रश्न आहे. तुम्ही कोण आहात? बेगानी शादी में ठाण्याचा अब्दुल्ला का नाचतो आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राज ठाकरे-उद्धव ठाकरे हे भाऊ आहेत. दोन पक्ष एकाच विचारधारेचे आहे दोघे ठरवतील काय करायचे ते, ठाण्याच्या अब्दुलांचा काय संबंध असा टोला संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंना लगावला आहे. शिवसेनेच्या मेळाव्यात शिंदेंनी मनसे-उबाठा युतीवर केलेल्या टीकेला त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे यांच्या तोंडी जी भाषा आहे ना ती अघोरी विद्या करणाऱ्यांची भाषा आहे. मारणं, मुर्दा, हत्या हे शब्द वापरणारे अघोरी लोक आहेत. ज्यांनी आयुष्यभर तुम्हाला पोसले त्यांच्याबद्दल असे बोलणे नीचपणाचे आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदेंचा दोघे बंधू एक येण्याच्या चर्चेवर तीळपापड का झाला आहे. त्यांची अघोरी विद्या कामा येत नाही का?, असा खोचक सवाल राऊतांनी केला आहे. गुवाहटीमध्ये कापलेले रेडे तुम्हाला यश देत नाही का? फडणवीस यांनी तुमचे पायपुसणं केले.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादासाठी उच्चाधिकार समितीची पुर्नरचना मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १८ सदस्यांची नव्याने नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**


महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्ना संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने उच्चाधिकार समितीची नव्याने पुनर्रचना केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) सर्वेसर्वा शरद पवार यांचा ही या समितीत समावेश करण्यात आला आहे. सर्वपक्षीय आणि सर्वसमावेशक अशी ही समिती तयार केली असून, सीमावादासंदर्भात राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर समन्वय ठेवण्यासाठी तिचे कार्य महत्त्वाचे राहणार आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेनंतर उच्चाधिकार समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी समिती कार्यरत असणार आहे. या समितीच्या माध्यमातून सीमावादातील न्यायालयीन लढाई, सीमाभागातील विकासाचे प्रश्न तसेच कन्नड भाषिक राज्यातील मराठी भाषिकांचे हक्क व सुरक्षा यासारख्या मुद्द्यांवर सुसंगत आणि सशक्त धोरण राबवले जाणार आहे.

एक मुख्यमंत्री आणि दोन मुख्यमंत्र्यांसह राज्यसभा सदस्य शरद पवार, लोकसभेचे नारायण राणे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण आणि समिती समन्वयक मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटन मंत्री व समिती समन्वय शंभूराज देसाई, मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह आमदार जयंत पाटील, सुरेश खाडे, सुधीर गाडगीळ, सचिन शेट्टी, रोहित पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचा समितीत समावेश केला आहे.

## कोकण किनारपट्टीवर रेड अलर्ट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**



मुंबईसह उपनगरात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. आज मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघर या भागात गेल्या 24 तासांत सर्वत्र मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस झाला आहे.

दरम्यान आयएमडीने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, कोकणातील रायगड, रत्नागिरी जिल्ह्याला 20 ते 22 जूनपर्यंत यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये तुफान पावसाची शक्यता असून नागरिकांना आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावे.

20 जूनला नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तर पुढील 5 दिवस मराठवाड्यात आणि विदर्भ, मध्य महाराष्ट्रात 3 दिवस तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस होईल. पुण्यात 20, 22 जूनला तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस होऊ शकतो, असे हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.

इगतपुरीत गुरुवारी 146, त्र्यंबकला 143, तर नाशिकमध्ये 60 मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे 24 तासांत गंगापूर धरणाचा साठा 14.72, तर दारणाचा 14.62 टक्क्यांनी वाढला. दारणातून 4742, तर नांदूर-मधमेश्वरमधून जायकवाडीच्या दिशेने 24,998 क्युसेकने विसर्ग सुरू होता. दारणात 43 टक्के साठा झाल्याने पाणी सोडण्याच्या कोष्टकानुसार विसर्ग करण्यात आला. 5 वर्षांनंतर प्रथमच दारणातून जूनमध्ये विसर्ग झाला.

खळखळणारे पाण्याचे प्रवाह आणि हिरव्यागार निसर्गाचा संगम भंडारदरा परिसरात अनुभवायला मिळतो. धरणाच्या कुशीतील धबधब्यांचा हा निसर्गनाद पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करत आहे. भंडारदरा परिसरात सध्या 8 ते 10 धबधबे प्रवाहित झाले आहेत. एरव्ही जुलै-ऑगस्ट महिन्यात मान्सूनचा जोरदार पाऊस झाला की धबधबे प्रवाहित होतात. पण यंदा प्रथमच जूनमध्ये निसर्गाचे हे आल्हाददायक चित्र पाहायला मिळत आहे. कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य परिसरातील आणि भंडारदऱ्यापासून 10 किलोमीटर अंतरावर असलेल्या कोल्टेंभे धबधब्याचे मनोहारी दृश्य. गेल्या काही दिवसांत येथे पर्यटकांची संख्याही वाढलीय.

## महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना मिळणार गुगलचे बळ : मंगलप्रभात लोढा



**मुंबई :** राज्यात अधिकाधिक उद्योजक तयार व्हावेत यासाठी राज्य सरकारकडून मागील काही वर्षांपासून स्टार्टअप्सना प्राधान्य दिले आहे. त्याचधर्तीवर आता राज्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) स्टार्टअप्सना अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता स्टार्टअप्सना माहिती क्षेत्रातील जागतिक कंपनी असलेल्या गुगलचे बळ मिळणार आहे. गुगलच्या माध्यमातून या स्टार्टअप्सना उद्योगासाठी जगाच्या कानाकोपऱ्यात संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात भारतातील स्टार्टअप्सना नवीन संधी उपलब्ध होण्याबरोबरच त्यांना जागतिक ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. महाराष्ट्रातील स्टार्टअप्सना जागतिक स्तरावर नेण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा प्रयत्नशील आहेत. या अनुषंगाने माहिती क्षेत्रातील अग्रगण्य जागतिक कंपनी गुगलच्या सहकार्याने महाराष्ट्रात उद्योगाच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

## बाणेरमध्ये डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणीचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २० :**

भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणी मृत्युमुखी पडल्याची घटना बाणेर परिसरात घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुणी जखमी झाली. याप्रकरणी बाणेर पोलिसांनी डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

तेजल प्रकाश तायडे (वय २७, रा. तलासरी, जि. ठाणे) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणीचे नाव आहे. अपघातात प्राची जगन्नाथ पाचंगे (वय २८, रा. डांगे चौक, थेरगाव) जखमी झाली. तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी डंपरचालक राहुल भीमराव राठोड (वय २४, रा. भोंडवे वस्ती, रावेत) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला पोलिसांनी अटक केली. याबाबत प्राची पाचंगे हिने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजल आणि प्राची बाणेर भागातील ज्युपिटर हॉस्पिटल परिसरातून गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास दुचाकीवरुन निघाल्या होत्या. त्या वेळी गणेश मंदिर चौकात भरधाव डंपरने दुचाकीला धडक दिली. अपघातात तेजल गंभीर जखमी झाली. तेजल आणि प्राचीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर पसार झालेल्या डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. डंपरचालक राठोड याला रात्री उशीरा अटक करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक केकाण तपास करत आहेत.

## उद्धव ठाकरेंचा आगामी निवडणुकीसाठी प्लॅन तयार

### मनसे युतीबाबत सकारात्मक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाप्रमुख आणि संपर्क प्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. स्थानिक पातळीवर युती व आघाडीच्या शक्यतेचा अभ्यास करण्याच्या सूचनांसह, मनसेसोबतच्या युतीबाबतही ठाकरेंनी सकारात्मक भूमिका दर्शवली. राज ठाकरेंसोबत नाहीच जुळले तर? उद्धव ठाकरेंकडून बॅकअप प्लॅनिंगला सुरुवात करण्यात आली आहे. त्याचबरोबर मतदार याद्यांतील वाढ, बोगस नावे आणि निवडणूक यंत्रणेतील त्रुटींवर विशेष लक्ष देण्याचे आदेश पदाधिका ?यांना देण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा आणि संपर्क प्रमुखांची आज दुपारी 12 वाजता शिवसेना भवनात बैठक झाली. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आघाडी की मनसे सोबत युती केल्याने पक्षाचा फायदा होईल, याची स्थानिक पातळीवरील नेत्यांशी चर्चा करुन येत्या एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

राज्यभरात स्थानिक पातळीवर युती, आघाडी करण्यासंदर्भात आढावा घ्यावा. जर युती, आघाडी झाली नाही तर सर्व जागांवर



पक्ष म्हणून लढण्यास तयार राहण्याच्या सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या. महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी द्यायचा आहे.

आगामी काळात मनसेसोबत युतीसाठी आपण सकारात्मक आहोत. मात्र, स्थानिक पातळीवर युती, आघाडी संदर्भात आढावा घेऊन माहिती द्या, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या आहेत. स्थानिक पातळीवर कुठे आघाडी, युती करायची याबाबतचा निर्णय पक्ष घेईल. त्यामुळे महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी देण्याच्या सूचना केल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनी मतदार याद्यांमधील संशयास्पद वाढीबाबत कार्यकर्त्यांना माहिती संकलनाचे आदेश दिले आहेत. मतदार याद्यांचा अभ्यास करा, लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत मतदार कसे वाढले? गटप्रमुखांनी 40 लाख मतदार कसे वाढले हे तपासा, मतदार याद्यांच्या घोळाबाबत माहिती समोर आणा अशा सूचना उद्धव ठाकरेंनी केल्या आहेत.

## चंद्रभागेत बुडून तरुण भाविकाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पंढरपूर, दि. २० :**

आषाढी एकादशी यात्रेला अवघे काही दिवस उरले असताना पंढरपूरमध्ये एक दुर्दैवी घटना घडली आहे. चंद्रभागा नदीत बुडून शुभम पावले (वय २७) या तरुण भाविकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम पावले हा आपल्या मित्रांसोबत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला आला होता. पुंडलिक मंदिराशेजारील चंद्रभागा नदीपात्रात स्नानासाठी उतरला असता पाण्याचा अंदाज न आल्यामुळे तो बुडाला, अशी शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेची माहिती मिळताच तात्काळ शोध मोहीम राबवण्यात आली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर शुभमचा मृतदेह सापडला.

या अपघातामुळे आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या आज पुण्यात मुक्कामी आहेत. पुणे महानगरपालिकेचा आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज असून, पालख्यांच्या मुक्कामस्थळी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आषाढी वारीसाठी उजनी धरणातून भीमा नदीत (चंद्रभागा) १६०० क्युसेक्सने पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## जयकुमार गोरे खंडणी प्रकरणात दिल्लीच्या मांत्रिकाला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. २० :**

राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या खंडणी प्रकरणात पोलिसांनी राजधानी दिल्लीतून एका मांत्रिकाला अटक केली आहे. याच मांत्रिकाच्या इशाऱ्यानुसार एका महिलेने गोरे यांच्याकडे खंडणी मागितल्याचा आरोप आहे. साताऱ्यातील वडूज पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या कारवाईमुळे या प्रकरणी अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्याला विवस्त्र फोटो पाठवल्याचा आरोप एका महिलेने केला होता. या प्रकरणी महायुतीच्या गोटात एकच खळबळ माजली होती. पण त्यानंतर त्याच महिलेला मंत्री गोरे यांच्याकडून 1 कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यामुळे तिने केलेल्या आरोपांची हवा निघून गेली होती. या पार्श्वभूमीवर वडूज पोलिसांनी दिल्लीत जाऊन अशोक शर्मा नामक मांत्रिकाला अटक केली आहे. या प्रकरणी अगोदरच खंडणी मागणाऱ्या महिलेसह सत्ताधारी शिवसेनेचे (शिंदे गट) पदाधिकारी अनिल सुभेदार व अन्य एका पत्रकाराला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, मांत्रिक अशोक शर्मा हा राजधानी दिल्लीतील लक्ष्मीनगर परिसरात वास्तव्यास होता. तोच मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे खंडणी मागणाऱ्या महिलेला वेळोवेळी मार्गदर्शन करत होता. त्याने तशी कबुलीही पोलिसांकडे दिली आहे.

दिल्लीतील एक मांत्रिक संबंधित महिलेला मदत करत असल्याची गुप्त खबर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वडूज पोलिसांच्या एका पथकाने दिल्लीत धाव घेतली होती. खंडणी मागणाऱ्या महिलेला मिळणाऱ्या 1 कोटींच्या खंडणीचा काही हिस्सा या मांत्रिकाला देण्याचे ठरले होते, असे पोलिसांनी सांगितले आहे.

# मारहाणीतील जखमी युवकाचा मृत्यू

## तीन आरोपींस अटक, एक फरार

■ महासागर प्रतिनिधी,
खामगाव , दि. २० :

जुन्या वादातून सख्या चुलत भावांनी व पुतण्याने लोखंडी पाइपने मारहाण करून गंभीर जखमी केलेल्या चुलत भाऊ योगेशचा चार दिवसानंतर उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. प्रकरणी पोलिसांनी तीन चुलत भावासह पुतण्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तीन आरोपींना अटक केली आहे. तर गुन्ह्यातील एक आरोपी फरार झाला आहे.

शेगाव तालुक्यातील जलंब येथील योगेश प्रल्हाद मोहे (वय ३२) याच्याशी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास संतोष काळे यांच्या घरासमोर त्याचे चुलत भाऊ वासुदेव, गजानन व शालिग्राम मोहे या तिघांनी व पुतण्या विशाल मोहे सर्व रा. जलंब यांनी जुन्या वादाच्या कारणावरून वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी वासुदेव गजानन मोहे यांनी योगेशला पकडून ठेवले तर शालिग्राम व विशाल मोहे यांनी आपल्या जवळील लोखंडी पाइपने मारहाण करून त्याला गंभीर जखमी केले. योगेशला प्रथम येथील शासकीय रुग्णालयात उपचारार्थ भरती केले. परंतु त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याच्यावर प्रथमोपचार करून त्याला पुढील उपचारासाठी अकोला येथे हलवण्यात आले. परंतु तेथे त्याची



प्रकृती सुधारत नसल्याने त्याला १६ जून रोजी नागपूर येथील शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले.

तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती ठाणेदार अमोल सांगळे यांना मिळताच त्यांनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन आरोपींचा शोध सुरू केला. दरम्यान तीन आरोपी हे खामगाव येथे असल्याची त्यांना माहिती मिळाली. हे आरोपी बस स्थानक परिसरात दिसून आले.

तत्पूर्वी पतीला मारहाण केल्याची तक्रार पल्लवी मोहे यांनी जलंब पोलिसांत दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी वासुदेव, गजानन, शालिग्राम या चुलत दिरांविरुद्ध व पुतण्या विशाल मोहे विरुद्ध गुन्हे दाखल केले होते.

## विविध कंपन्यांमध्ये ७३ उमेदवारांची निवड

**अकोला** : नोकरी इच्छुक उमेदवारांना खाजगी क्षेत्रातील संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्लेसमेंट ड्राईव्ह' बुधवारी घेण्यात आला. या रोजगार मेळाव्यात ७३ उमेदवारांची विविध पदांसाठी प्राथमिक निवड करण्यात आली.


चार वर्षांपूर्वीच्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या निर्बंधांमुळे अनेक जण बेरोजगार झाले. होते. निर्बंधांच्या काळात उद्योग, बाजारपेठा बंद होत्या. मात्र काही दिवसांपासून रोजगार उपलब्ध होण्यासाठी सर्वच स्तरावरून प्रयत्न करण्यात आले.

# बीबियाणे, खतांच्या बेभाव विक्रीवर प्रशासनाचे दुर्लक्ष

## पिंजरमध्ये शेतकऱ्यांची लुटमार

■ महासागर प्रतिनिधी,
बार्शीटाकळी , दि. २० :

तालुक्यातील पिंजर येथे बी-बियाणे आणि खतांची बेभाव विक्री होत आहे. येथील काही कृषी सेवा केंद्र चालक शेतकऱ्यांकडून अव्वाच्या सव्वा भाव घेऊन शेतकऱ्यांची पिळवणूक करीत आहे. याबाबत तालुका कृषी अधिकारी कार्यालय आणि कृषी अधिकारी पंचायत समिती बार्शीटाकळी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे का? असा आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर येथे कृषी सेवा केंद्राची संख्या जास्त आहे. तरीसुद्धा या भागातील शेतकऱ्यांना शासनाच्या निर्धारित दराने बी-बियाणे, खते, कीटकनाशके मिळत



नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वास्तविकता शेतकऱ्यांना शासनाच्या निर्धारित भावाने बियाणे, खते कीटकनाशके मिळायला पाहिजे. परंतु, पिंजरमध्ये तसे होत नसल्याचे चित्र आहे. येथील अनेक कृषी केंद्राचे मालक वस्तूंची बेभाव विक्री करून शेतकऱ्यांची लुटमार करीत आहेत. संबंधित कृषी विभागाचे कर्मचारी किंवा अधिकारी या भागाचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. तसे होत नसल्याचे दिसून येते. एकतर निसर्ग शेतकऱ्यांना साथ देत नाही, तर दुसऱ्या बाजूने सरकार शेतमालाला योग्य भाव देत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांची फार मोठी पंचायत झाली आहे. शेतकरी बैचेन आहेत. पंचायत समितीचे कृषी अधिकारी, चौकशी करू कारवाई करू, असे म्हणतात. मात्र, याबाबत गंभीरतेने विचार करून शेतकऱ्यांची लुटमार थांबवावी, अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांनी केली आहे.

# विद्युत शव दाहिनी स्थापण्याचा संकल्प ढोल पथकाचा मानस

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २० :

गेल्या अनेक वर्षापासून शहरात विविध उत्सव, कार्यक्रमात युवकांचे ढोल पथक सादर करून मानधनाच्या रूपात मिळणाऱ्या निधीद्वारे वेगवेगळे सेवाभावी कार्य करणाऱ्या 'संकल्प ढोल पथक'च्या वतीने यावर्षी विद्युत अथवा गॅस शववाहिनी स्थापन करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे गरजू कुटुंबांना मदतीचा हात होऊन पर्यावरण पण संतुलित राहणार असल्याची माहिती संकल्प ढोल पथकाच्या वतीने स्थानीय विदर्भ चेंबर सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी संकल्प ढोल पथकाचे मार्गदर्शक राम राठी, प्रथमेश गोखले, गायत्री देशपांडे, दायित्व फाउंडेशनचे सेवाधारी योगेश मारवाडी, रोटरॅक्ट मोक्षधाम ट्रस्टचे सुधीर रांदड आदी उपस्थित होते. मागील ११ वर्षांपासून संकल्प ढोल पथकाच्या वतीने वादनातून गोळा करण्यात आलेली रक्कम विविध सामाजिक संस्था, तसेच कार्याला प्रदान करण्यात येते. यापूर्वी पिंजरच्या संत गाडगेबाबा आपत्कालीन मंडळास बचाव साहित्य प्रदान केले होते. यानंतर महानगरात मोहता मिल परिसरातील मोक्षधाम येथे




विद्युत अथवा गॅसची जलद शव दाहिनी साकार करण्यात येणार असून याचे कार्य युद्ध स्तरावर सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच यावर्षी योगेश मारवाडी यांच्या दायित्व फाउंडेशनला मदतीकरता निवड करण्यात आली आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली. फाउंडेशन निराधार, अनाथ, अपंग आणि उपेक्षित नागरिकांसाठी अन्नदान, वैद्यकीय सहायता, निवारा आदी कार्य करीत आहे. प्रतिष्ठानच्या 'रोज एक रुपया वर्षभर मदतीचा हात' या संकल्पनेने समाजातील सामान्य माणसाला पण आता मदत करणे शक्य झाले आहे. ही एक चळवळ झाली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या दायित्व फाउंडेशनसाठी संकल्प पूर्ती सोहळा व कौटुंबिक स्नेहसंमेलन येत्या शनिवार, २१ जून रोजी सायंकाळी ५ वाजता माहेश्वरी भवन येथे आयोजित करण्यात आले आहे. यात जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, मनपा आयुक्त सुनील लहाने, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी आर्दींना निमंत्रित करण्यात आले आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले. पत्रकार परिषदेत यावेळी राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, समीर शहा, सीए शिवम रांदड, आर्कि. कुशल जैन समवेत संकल्प ढोल पथकाचे बहुसंख्य युवक व युवती उपस्थित होते. संकल्प प्रतिष्ठानचे सर्व सदस्य हे तरुण आहेत. त्यांचे वादन जितके जोशपूर्ण आहे, तितकीच त्यांची सामाजिक जाणही स्पष्ट आहे. यंदा शहरात एक दाहिनी यंत्र उभारण्याचा संकल्प करण्यात हा केवळ एक पायाभूत सुविधा नसून, मरणोत्तर सन्मानासाठीचा एक मानवी अधिकार सुनिश्चित करण्याचा प्रयत्न आहे. सध्या अकोल्यात सुसज्ज आणि पर्यावरणपूरक विद्युत, गॅस दाहिनी यंत्राची गरज आज मोठ्या प्रमाणावर जाणवते. पारंपरिक अंत्यसंस्कार पद्धतींमुळे झाडांची कत्तल, प्रदूषण आणि जागेचा अभाव यांसारख्या अनेक अडचणी निर्माण होत आहेत. विद्युत, गॅस दाहिनीमुळे या समस्यांवर उपाय मिळतो, शिवाय तो एक स्वच्छ, सुसंघटित आणि सन्मानजनक अंत्यसंस्काराचा पर्याय ठरतो. ह्या प्रकल्पासाठी अंदाजे ५० लाख रुपयांचे अंदाजित खर्च अपेक्षित आहे. यासाठी संकल्प प्रतिष्ठान आपल्या ढोल-ताशा पथकाच्या वादनातून मिळणारे मानधन या प्रकल्पासाठी देणार आहे. याशिवाय, संस्थेच्या माध्यमातून जनतेपर्यंत आवाहन करून इतर देणग्याही उभारण्यात येणार आहेत. या अत्यंत गरजेच्या आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणाऱ्या प्रकल्पात आपण सहभागी व्हावे, असे आवाहन संकल्प प्रतिष्ठान व रोटरॅक्ट मोक्षधाम ट्रस्ट करून करण्यात आले आहे.

## एपीएमसीचे माजी संचालक गोपाल राणे यांची आत्महत्या

**अमरावती:** अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा शिवसहकार



सेनेचे जिल्हाध्यक्ष गोपाल बाबासाहेब राणे (५५) यांनी त्यांच्या राठीनगर येथील निवासस्थानी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी (दि. १९) सकाळी घडली. राणे यांच्या एका शेतावर अतिक्रमण करण्यात आले असून, त्याच वादातून चौघे जण आपल्याला मानसिक त्रास देत असून जीवे मारण्याची धमकी देत आहे, यातूनच आत्महत्या करत असल्याचे गोपाल राणे यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत नमुद केले आहे. तसेच न्याय देवतेवर विश्वास असून मला न्याय मिळेलच, असाही उल्लेख त्यांनी चिठ्ठीत केला आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांत गुरुवारी उशिरा रात्री गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

चांदूर बाजार तालुक्यातील देवरी येथील मूळ रहिवासी गोपाल राणे हे अमरावतीमधील राठीनगर भागात कुटुंबीयांसह वास्तव्याला होते. गुरुवारी ते त्यांच्या पत्नीसह मॉर्निंग वॉकला गेले होते. परत आल्यानंतर मी मागील खोलीत लिहीत बसतो, असे पत्नीला म्हणाले. त्यांना कविता, विविध विषयावर लेखन करण्याचा छंद होता. त्यामुळे पत्नीला वाटले ते खोलीत बसून लिखाण करत आहे. मात्र बराच वेळ होऊनही ते खोली बाहेर आले नाहीत. त्यामुळे पत्नीने त्यांना आवाज दिला. मात्र, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. खोलीचे दारही आतून बंद होते.

# दोन वर्षीय बालकाला पालकमंत्र्यांची मदत

## साडेतीन लाख रूपयांचे मशिन दिले

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. २० :

एकांश या दोन वर्षीय बालकाचे कानातील मशिन बसस्थानकावर अनावधानाने हरवले. त्यामुळे बालकाला ऐकण्याची समस्या झाली. परंतू घरची हालाखीची परिस्थिती असल्याने नवीन मशिन घेणेही शक्य नव्हते. मात्र पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मदतीचा हात देऊन या बालकाला साडेतीन लाख रूपयांचे मशिन उपलब्ध करून दिले. कर्णबधिर एकांशवर मोफत कॉकलिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेजमध्ये झाली.

गेल्या दोन महिन्यांपासून बाळाचा भाषा आणि वाचा विकास होण्यासाठी स्पीच थेरपी दिली जात आहे. स्पीच थेरपीसाठी 'साउंड प्रोसेसर' आवश्यक आहे. सदर साऊंड प्रोसेसर पालकांनी विकतही घेतले होते. मात्र उपचारासाठी अमरावती येथे आले असताना बसस्थानकावर मशिन अनावधानाने हरविले.

वडील स्वप्नील खडसे यांनी आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने साउंड प्रोसेसर खरेदी करणे शक्य नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे मदती विनंती केली. स्पीच थेरणीसाठी साउंड प्रोसेसर अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी खडसे यांनी जिल्हा नियोजन निधीतूनही मदत करण्याची विनंती केली. मुलाचे आयुष्य वाचवण्यासाठी आणि त्याला सर्वसामान्य जीवन जगता यावे, यासाठी साउंड प्रोसेसर लावणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने जिल्हा प्रशासनाने या प्रकरणी मदत करावी अशी विनंती केली.

बसस्थानकावर कानातील मशीन हरवल्यामुळे मागील सहा महिन्यापासून दोन वर्षीय बालक ऐकू, बोलू शकत नव्हता.

त्यातच घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे नवीन यंत्रसुद्धा घेण्याची स्थिती नव्हती. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे याबाबत माहिती आल्यानंतर त्यांनी तातडीने दखल घेत मुख्यमंत्री सहायता निधीला पत्र देऊन एकांतला त्वरीत साडेतीन लाख रूपयांची मशीन उपलब्ध करण्याची विनंती केली. मात्र ही मशीन राज्याच्या कोणत्याच योजनेत येत नसल्यामुळे विशेष बाब म्हणून प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला.

जिल्हा परिषद आणि पालकमंत्री कार्यालयाच्या पाठपुरावाने एकांशला कर्ण यंत्र मिळाले. त्यामुळे दोन वर्षीय बालकाला आता ऐकता आणि बोलता सुद्धा येणार आहे.

## धरणात दाबण्यात आलेला दगड, मुरुम काढण्यासाठी शेतकऱ्यांचे जलआंदोलन



**मानोरा :** तालुक्यातील कुपटा येथील उपसा सिंचन प्रकल्पात म.जि.प्रा.कडून धरणाच्या बुडीत क्षेत्रात विहिरीतून निघालेले मुरुम, दगड चेनिंग करुन मशिनरीच्या सहायाने दाबण्यात आले. ते मटेरियल पुन्हा काढण्यात यावे, या मागणीच्या निषेधार्थ कुपटा, चोंढी, गोरेगाव, वागद बु., वागद तांडा येथील शेतकरी आंदोलन केले. तब्बल तीन तास पाण्यामध्ये आंदोलन सुरु होते मात्र, त्या ठिकाणी कोणीही प्रशासकीय अधिकारी दाखल झाला नाही, उलट प्रशासनाला संरक्षण दिल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. आधी कुपटा लघु पाटबंधारे विभागाकडून कुपटा येथील उपसा सिंचन लघु प्रकल्पात शेकडो ब्रास मुरूम दाबल्याच्या निषेधार्थ आज कुपटा येथील लघु प्रकल्पात शेतकऱ्याने जलसमाधी आंदोलन केले. हे आंदोलन सकाळी साडेदहा वाजता सुरू झाले. आंदोलकांच्या मागणीनुसार धरणात शेकडो ब्रास मुरूम दाबल्यात आलेला आहे. तो काढून टाकण्यात यावा, त्यामुळे धरण क्षेत्रातील जलसाठ्याचे प्रमाण कमी होणार आहे. परंतु त्याकडे गांभीर्याने न पाहता शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. शेकडो ब्रास मुरुम स्नॅचिंग करून दाबण्यात आला आहे. ही एकप्रकारे शेतकऱ्यांची दिशाभूल आणि सरकारच्या पैशाचा अपव्यय आहे. या प्रकरणी शेतकऱ्यांनी वारंवार निवेदन देऊनही दखल घेतली नसल्याने याच्या निषेधार्थ चोंढी, गोरेगाव, राजीवनगर, वागद तांडा, येथील उल्हास चव्हाण, चव्हाण आदी शेतकऱ्यांनी पाण्यात साडेतीन तास आंदोलन केली.

# मुंबई आयआयटीच्या अहवाला

## पूररेषेची पुन्हा तपासणी

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २० :

पाटबंधारे विभागाने केलेल्या मोर्णा, विद्रुपा नदीच्या निळ्या-लाल पूर रेषेच्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक झाली. पूररेषेची पुन्हा तपासणी होणार असून, पुराच्या खुणा उपलब्ध करून द्या, असा आदेश अतिरिक्त मुख्य सचिवांनी बैठकीत दिला.

यापूर्वीच नकाशे मुंबईच्या आयआयटीला ( भारतीय तंत्रज्ञान संस्था) पाठवण्यात आले आहेत. आता आयआयटी पुन्हा तपासणी करणार आहे. यासाठी २१ जुलै २०२१ रोजीच्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुराच्या खुणांची माहिती देण्याचा आदेश दिला. आयआयटीकडून पाटबंधारे विभागाने केलेल्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षानुसार अहवाल तयार होणार आहे. दरम्यान निळी व लाल रेषा आखणी सर्वेक्षण नकाशे निरस्त करण्याबाबत मंगळवारी मंत्रालयात बैठक पार पडली. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या बैठकीला भाजप आमदार वसंत खंडेलवाल उपस्थित होते. घरातून सर्व्हेक्षणाचा आरोप मोर्णा नदीच्या किनारा परिसरात काही वर्षांपूर्वीच घरे बांधण्यात आली असून, अनेक ठिकाणी ले-आऊटझाले आहेत. कौलखेड, बलोदे ले-आऊट, खडकी, अकोली बु., गीता नगर आदी भागात पूर आलेला नसतानाही येथील वस्त्याही निळ्या रेषेत आल्या आहेत. यावर राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. अधिकाऱ्यांनी घरीच बसून सर्व्हेक्षण केले , असाही आरेप केला होता. त्यामुळे हा राजकीय मुद्दा झाला आहे.

अकोल्यात १९९४ मध्ये अतिवृष्टीमुळे ३० टक्के भाग पाण्याखाली गेला होता. त्यानंतर २००२मध्ये १५० मी.मी. पाऊस झाला होता. २१ जुलै २०२१ रोजी एका दिवसात २०२ मि.मी. पाऊस पडला होता. मोर्णा नदीला पूर आल्याने नदी काठच्या घरात आठ ते नऊ फुटापर्यंत पाणी साचले होते. जुने शहर, खडकी व इतर भागांमध्ये पावसाचे पाणी नागरिकांच्या घरांमध्ये शिरले होते.

पाटबंधारे विभागाने नकाशे आयआयटीला दिले होते. आता एक आठवड्यात २१ जुलै २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे पडलेल्या पुराच्या खुणा सुद्धा उपलब्ध करून देण्यात देण्यात येणार आहेत. ही फेर तपासणी आता त्रयस्थ संस्थेतर्फे होणार आहे. ही तपासणी करताना शासन निर्णयातील मुद्द्यांपेक्षा संपूर्ण तांत्रिक बाबी विचारात घेतल्या जातात. ५ ते ५० मीटर रेषा अलिकडे-पलीकडे झाल्यास फारसा फरक पडत नसतो, असेही तज्ज्ञांचे मत आहे.

# श्री रुपनाथ महाराजांच्या पालखीचे अकोला शहरात स्वागत



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २० : श्री तीर्थक्षेत्र रुपनाथ महाराज संस्थान, दहिहांडा येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे निघालेल्या पायदळ पालखी दिंडीचे गुरुवारी अकोल्यात भक्तिपूर्वक स्वागत करण्यात आले. कौलखेड येथील आरोग्य नगरमधील 'शिव संभव' निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आणि कविता मिटकरी यांच्या वतीने पालखीचे उत्साहात स्वागत झाले. वारकरी संप्रदायाच्या सेवेसाठी समर्पित भावनेने जेसीबीच्या सहाय्याने वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

उपस्थित वारकऱ्यांना मिटकरी दाम्पत्यांनी प्रेमपूर्वक ब्लँकेट भेट देत आपुलकीचा ओलावा दिला. गुरुवारच्या उपवासानिमित्त वारकऱ्यांसाठी फराळाच्या विशेष भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. या भक्तिभावाच्या वातावरणात एक विशेष क्षण म्हणजे, आमदार अमोल मिटकरी व पत्नी कविता मिटकरी यांनी पारंपरिक फुगडी खेळत उत्सवात जीव ओतला. भक्तीरसात रंगलेल्या या दृश्यांनी उपस्थितांची मनं जिंकली.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
Tender Notice

Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur, invites e – tenders in B – 1 form / appropriate form for the following works. These e – tenders can be purchased from Website (https://Mahatenders.gov.in). The terms and conditions of e – tenders are available on above website. Purchase and submission of e – tenders can be done through internet.

| Name of the Work | Project Cost(in Rs.) |
|---|---|
| Providing & Erecting Streetlight Poles at Various Places in Bajaj Nagar Area ( Sims Hospital and Karuna Banquet Hall) in P. No. 16 Z.No 1 Laxminagar Nagpur | 8,39,327/- |
| Street Lighting at Sai Mangal Soc. Jaitala Road in P. no. 38 Z. no. 1 Laxminagar | 6,92,006/- |

**Note** - Rates are exclusive of G.S.T. Note :- **1.** Tender Submission end date : 26-06-2025 ( up to 3:00 PM ) 2. Date of Opening of Tender (If Possible) : 27-06-2025 ( at 04:00 PM )

Advt No. 203 PR Date 20.06.2025

Executive Engineer (Electrical)
N.M.C. Nagpur

P/N/25/203



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, नागपुर
ई-मेल-div1nagpur.ee@mahapwd.com

**ई-निवीदा सुचना क्रमांक १९/२०२५२६**

कार्यकारी अभियंता. सा.बां. विभाग क्र. १, नागपुर हे महाराष्ट्र शासनाचे सा.बां. विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामा करीता बि.१ नमुन्यात निविदा प्रणालीदवारे (ऑनलाईन) निवीदा मागवीत आहेत. निवीदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in, https://mahapwd.com येथुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग क्र. १,नागपुर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निवीदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रू. लाखात) | निवीदा प्रपत्र किंमत (रूपये) | काम पुर्ण करण्याचा कालावधी (महीने) |
|---|---|---|---|---|
| 1. | Construction Of P.W. Offices Building In The Premises Of Chief Engineer, P.W. Region At Nagpur. | 992.42 | 3540.00 | 18 Months |

१. या कामांचे निवीदा फार्म विक्री करीता http://mahatenders.gov.in, https://mahapwd.gov.in या संकेत स्थळाला भेट द्यावी. सदर निवीदा सुचनेची प्रत या कार्यालयातील सुचना फलकावर पहावयास मिळेल.
२. निवीदेच्या अटी व शर्ती प्रारूपात दर्शविल्याप्रमाणे राहील.
३. या निवीदा सुचनेत काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती शुध्दीपत्रक प्रकाशित होतील.
४. कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा संपूर्ण निविदा रदद अथवा फेरफार करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाआंनी राखुन ठेवलेला आहे.
५. ई-निवीदा पोर्टलवर "बिड लॉक" झाल्यानंतर निवीदांबाबत "हार्ड कॉपी"१ प्रतीत कंत्राटदारानी तिन दिवसाच्या आत सादर करणे अनिवार्य राहील.
६. सदर स्थापत्य कामाकरीता Post Qualification Criteria लागु राहील.

जावक क्र. ७७३५ दि. १८/०६/२०२५

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १
नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C1264



**OFFICE OF THE MEDICAL SUPERINTENDENT**
**MH-EMPLOYEES STATE INSURANCE SOCIETY, HOSPITAL**
**Manewada Road, Somwarl Peth, Nagpur-440024**
**msngp.mhesis@gmail.com**
**(GOVT.OF MAHARASHTRA)**


**Walk in Interviews for appointment of Part Time Specialists (1 Year) on Contract basis for MH-ESIS Hospital, Nagpur**

| SR. No. | Department | OPEN | OBC | NT | SC | ST | VJNT (A) | SBC | EWS | TOTAL | Date & Time of Interview | Age as on date of Inertview | Qualification | Emoluments |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Anesthetist | – | – | – | – | 1 | – | – | – | 1 | Dt.24/06/2025 Time 11:00 am to 12:00 Noon | Up to 67 Years as on the date of Interview | MBBS with P.G. Degree or equivalent from recognized university with post PG experience of 3 years. OR PG Diploma from recognized university Having post PG experience of 5 years respectively in particular speciality | As per Order dated 13/02/2025 (Rs.60,000-25,600-85,600) per month. Duties as per agreement signed at the time of joining. Additional Rs. 15000/- per month on performing emergency call duties. |
| 2 | Dermatologist | – | – | – | 1 | – | – | – | – | 1 | Dt.24/06/2025 Time 12:00 PM to 1:00 pm | | | |
| 3 | Physician | 1 | – | – | – | – | – | – | – | 1 | Dt.25/06/2025 Time 11:00 am to 12:00 noon | | | |
| 4 | Specialist Medical Officer (Medicine) | 1 | – | – | – | – | – | – | – | 1 | | Up to 58 Years as on the date of interview | MBBS with P.G. Degree / PG Diploma of equivalent from recognized university | As per P.H.D. GR dated 29/05/2020 Rs.85,000/- per month. Duties as per agreement signed at the time of Joining. |

NOTE:
1. Reservation for categories will be executed as per Govt. of Maharasthra Rules.
2. As per Instructions, if the candidate of the respective category is not avallable, then the post will be filled in by candidate of any other category as per Merit list.
3. Candidate should also be in possession of the original certificats in the prescribed format in support of their claim at the of Interview.
4. Candidates claiming reservation under OBC/NT Category should submit the latest Non Creamy layer certificate along with Self Declaration.
5. MH ESI Society may increase or decrease or cancel filing up of any or all the post without assigning any reasons.
6. The recrultments are purely on contractual basis and selected candidates will have no claim for regularization of the service in the hospital.
7. Selected Candidates will have to sign Agreement of Terms & Conditions on Rs.100/-Stamp paper to be submitted by the candidate prior to joining.
8. No TA/DA will be admissible for Interview or joining the post.
9. For all posts candidate should have to submit their application within given time to this office.
10. Documents Required to be attached as to application (self attested xerox coples.)
 * Matriculation Certificate/Birth Certificats/Domicile, Age & Nationality Certificate for Age Proof
 * Proof of Educational Qualification (Relevent document must be furnished before scrutiny committee)
 * Valid MMC/MCI/MSDC/DCI Registration Certificates with Renewal certificate
 * Caste Certificate, Validity Certificate & Non Creamy layer Certificates if applicable.
 * Experience Certificates
 * Two Photographs. (PP size)
 * Noc from present employer if employed at the time of interview.
 * Candidate should report half an hour before the scheduled time of Interview
11. All rights about number of posts to be filled are reserved with appointing authority
12. Appointment order will be issued as & when posts get vacant

Sd/-
Medical Superintendent
MH-ESI Sodety Hospital
Nagpur-440024

क्र. संमावज / नाग /१९६/२०२५



# आत्मशुध्दीसाठी विवेकपूर्ण ध्यान

(जागतिक योग दिन)
२१ जून या दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी निवडण्यामागे खास कारण आहे. २१ जून हा वर्षांत सर्वात मोठा दिवस मानला जातो, ज्याला उन्हाळी संक्राती असे म्हटले जाते. उन्हाळी संक्रांती हा उत्तर गोलाधार्तील सर्वात जास्त प्रकाश असलेला दिवस आहे. पृथ्वीचा अक्ष त्याच्या कमाल कोनात सूर्याकडे झुकतो, त्यामुळे दिवस मोठा होतो. २१ जूननंतर सूर्य दक्षिणायनात प्रवेश करतो. योग आणि अध्यात्मासाठी हा दिवस खूप खास मानला जातो. त्यामुळे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. जगभरात योगाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याच्या फायद्यांची जाणीव करून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो.

-----------------

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत केलेल्या भाषणात पंतप्रधानांनी योगाचे महत्त्व सांगितले होते. ह्यह्ययोग ही भारताच्या प्राचीन परंपरेने दिलेली एक अमूल्य देणगी आहे. योग मन व शरीर, विचार व कृती, संयम व पूर्णता, मनुष्य व निसर्ग यांच्यातील ऐक्याला मूर्त रूप देतो. आरोग्य व स्वतःच्या कल्याणसाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्राप्त करून देतो.

योगासने हा केवळ एक व्यायाम नाही, तर स्वतःशी, जगाशी आणि निसगार्शी एकरूपतेची भावना शोधण्याचा मार्ग आहे. आपली जीवनशैली बदलून आणि चेतना निर्माण करून आरोग्य सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय योग दिन स्वीकारण्याच्या दिशेने काम करू या,पंतप्रधानांच्या या भूमिकेनंतर संयुक्त राष्ट्रांतील विविध देशांनी योगांचे महत्त्व जाणून हा दिवस साजरा करण्यास मान्यता दिली.

योग एक पूर्ण विज्ञान आहे, एक पूर्ण जीवन शैली आहे, एक पूर्ण चिकित्सा पद्धती आहे आणि एक पूर्ण अध्यात्म विद्या आहे. योगाच्या लोकप्रियतेचे रहस्य हे आहे की लिंग, जाति, वर्ग, संप्रदाय, क्षेत्र आणि भाषाभेदांच्या संकीर्णतांमध्ये कधी आबद्ध न असणे होय. चिंतक, बैरागी, अभ्यासी, ब्रह्मचारी, गृहस्थ कोणीही याचे सानिध्य प्राप्त करून लाभांन्वित होऊ शकतात. व्यक्तींच्या निमार्णात आणि उत्थानामध्येच नाही तर परिवार, समाज, राष्ट्र आणि विश्वाच्या चहूमुखी विकासामध्येही याचा उपयोग सिद्ध झाला आहे.

योग मनुष्याला सकारात्मक चिंतनाच्या प्रशस्त मार्गावर आणण्यासाठी एक अद्भुत विद्या आहे, ज्याला हजारो वर्षापूर्वी भारताच्या प्रज्ञावान ऋषी-मुनींनी आविष्कृत केले होते. महर्षि पतंजलीनी अष्टांग योगच्या रूपात याला अनुशासनबद्ध, संपादित आणि निष्पादित केले. जेव्हा मनाला एकाग्र करून ध्यानावस्थित रूपात जीव परमात्म्याबरोबर मिलनाची आकांक्षा करत असते तोच योग आहे. योगासनांना आधुनिक जीवनात फक्त व्यायामच मानले जाते. इंग्रजीमध्ये याला योगच्या ऐवजी योगा संबोधिले जाते.

योगाचे कित्येक प्रकार शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक हालचालींना आपल्या ताब्यात ठेवतात ज्यांचा उद्देश असतो की मनुष्याला आपल्या स्वरूपाच्या बाबतीत ज्ञान मिळवणे हेच मानव जीवनाचे परम लक्ष्य मोक्ष प्राप्त करणे. योग वैदिक तत्त्वशास्त्रात सहा विचारधारांमध्ये दर्शनांमध्ये एक आहे.

इथे याचे तात्पर्य राजयोगाबरोबर आहे. तो एक ब्रह्मन्न मिळविण्यासाठी ईश्वरीय ध्यानाचा राजसी मार्ग आहे. हिंदू संस्कृतीत योगाचे कित्येक प्रकारपण आहेत, उदा. निष्काम कर्म योग, आत्महित विहीन भक्ति योग आणि ज्ञान योग (विवेकपूर्ण ध्यान). जागतिक योग दिन हा योगास मान्यता देणारा एक दिवस आहे, जो २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारल्यानंतर दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो.

मानसिक तंदुरुस्ती, प्राचीन भारतात उगम पावलेल्या या निरोगीपणाच्या प्रथेचा जागतिक स्तरावर प्रचार करणे संयुक्त राष्ट्रांनी महत्त्वाचे मानले होते. भारतीय धर्म संस्कृतीमधील योग संकल्पनेची मांडणी श्रीमदभगवद्गीता ग्रंथात केलेली आहे. त्याच जोडीने पतंजली मुनी यांनी आपल्या योगसूत्राद्वारे मानवाच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाची संकल्पना स्पष्ट केली आहे.

याद्वारे आध्यात्मिक उन्नतीही साधता येते असे पातंजल योगसूत्र ग्रंथात सांगितले आहे. जगभरातून स्वीकारले गेलेले भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्त्व अधोरेखित होण्याचे प्रयत्न या दिवसाच्या निमित्ताने होते. योग हा शब्द संस्कृत युज् या धातुपासून तयार झाला आहे. पाणिनी व्याकरणामध्ये युज् समाधौ असे सूत्र आहे. योग या शब्दाचा अर्थ जोडणे, एकत्र आणने, जुळवणे असा अनेक प्रकारे होतो.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

योगावर पतंजली मुनींनी जवळजवळ इ.स.पू. १५० मध्ये योगसूत्र लिहिले. पतंजलींच्या अनुसार अष्टांग योगाचे पालन करणारी व्यक्ति आपल्या मनाला शांत करू शकते आणि शाश्वत ब्रह्मात सामावू शकते. याच अष्टांग पथा ने नंतर येणाऱ्या राज योग, तंत्रयोग आणि बौद्ध (वज्रयान) योगाचा पाया घातला.

दोन वर्षांत या उपक्रमाने चळवळीचे रूप घेतले आहे. १८ जून रोजी ऑस्ट्रेलियन संसदेमध्ये माजी पंतप्रधान टोनी अबॉट यांच्या उपस्थितीत योगसत्र झाले. स्वतः अबॉट यांनी यावेळी योगासने केली. दरवर्षी एक विशेष थीम लक्षात घेऊन योग दिनाचे आयोजन केले जाते.

यंदा म्हणजे २०२५ या वर्षीची थीम एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग आहे. या थीमचा अर्थ असा आहे की, आपल्या सर्वांचे आरोग्य या पृथ्वीच्या आरोग्याशी जोडलेले आहे. जेव्हा पृथ्वी निरोगी असेल तेव्हा मानव देखील निरोगी असतील. योग हा दुवा मजबूत करण्यास मदत करतो.

हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, या जागतिक उत्सवाचा ११ वा वर्धापन दिन आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या थीम अंतर्गत या वर्षीचा कार्यक्रम समग्र कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढविण्यात योगाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकतो.

२०१५ मध्ये पहिल्यांदा योग दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी थीम होती, सुसंवाद आणि शांततेसाठी योग. त्याच्याच पुढील वर्षी म्हणजे २०१६ मध्ये शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग अशी थीम होती. २०१७ मध्ये आरोग्यासाठी योग, २०१८ मध्ये शांततेसाठी योग, २०१९ मध्ये हृदयासाठी योग, २०२० मध्ये घरी आणि कुटुंबासह योग, २०२१ मध्ये निरोगीपणासाठी योग, २०२२ मध्ये मानवतेसाठी योग, २०२३ मध्ये वसुधैव कुटुंबकमसाठी योग सर्वांच्या कल्याणासाठी योग, हे दर्शविण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती.

गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये महिला सक्षमीकरणासाठी योग अशी थीम ठेवण्यात आली होती. या मध्यवर्ती कल्पनेसह महिलांचे मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य वाढवण्यावर भर दिला गेला होता. महिलांचे सर्वांगीण कल्याण वाढविण्यात आणि परिवर्तनात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. हे अधोरेखित करण्यासाठी ही थीम निवडण्यात आली होती.

हा दिवस महिलांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकासातील प्रगती साजरी करेल, असा विश्वास ही थीम निवडतांना व्यक्त करण्यात आला होता. संयुक्त राष्ट्रसंघाचा ठराव स्वीकारल्यानंतर, भारतातील आध्यात्मिक चळवळीतील अनेक नेत्यांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक रविशंकर यांनी मोदींच्या प्रयत्नांचे कौतुक करतांना म्हटले आहे की, कोणत्याही तत्वज्ञान, धर्म किंवा संस्कृतीला राज्याच्या संरक्षणाशिवाय जगणे फार कठीण आहे. योग आतापर्यंत जवळजवळ अनाथाप्रमाणे अस्तित्वात आहे. आता, अधिकृत मान्यता. यूएन योगाच्या फायद्याचा आणखी प्रसार करेल.

११ डिसेंबर २०१४ रोजी भारताचे स्थायी प्रतिनिधी अशोक मुखर्जी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत मसुदा ठराव सादर केला. मसुदा मजकूराला १७७ सदस्य राज्यांकडून व्यापक समर्थन मिळाले ज्यांनी मजकूर प्रायोजित केला, जो मताशिवाय स्वीकारला गेला.

या उपक्रमाला अनेक जागतिक नेत्यांचा पाठिंबा मिळाला. एकूण १७७ राष्ट्रांनी हा ठराव सह-प्रायोजित केला, जो अशा स्वरूपाच्या ठरावासाठी आतापर्यंतची सर्वाधिक सह-प्रायोजकांची संख्या आहे. भारतीय कॅलेंडरमध्ये, उन्हाळी संक्रांती दक्षिणायनामध्ये संक्रमण दर्शवते. उन्हाळ्यातील संक्रांतीनंतरची दुसरी पौर्णिमा ही गुरु पौर्णिमा म्हणून ओळखली जाते.

हिंदू पौराणिक कथांमध्ये, शिव, पहिला योगी (आदि योगी), या दिवशी उर्वरित मानवजातीला योगाचे ज्ञान देण्यास सुरुवात केली आणि ते पहिले गुरु (आदि गुरु) बनले असे म्हटले जाते. निरोगी तन आणि शांत मन याची गुरुकिल्ली म्हणजेच योग, त्यानिमित्त सर्वांना जागतिक योग दिनाच्या खूप खूप शुभेच्छा !!

■ ■ ■

# एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग

*योगस्थ कुरु कर्माणि*
*सङ्गं त्यक्त्वा धनजंय*
*सिद्धयसिध्दयोः समो भूत्वा*
*समत्वं योग उच्यते*

आजचे जीवन इतके गतिमान व धकाधकीचे झाले आहे की आपण आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यास वंचित झालो आहोत. जुन्या परंपरा लोप पावल्यामुळे शारीरिक कष्ट व अंगमेहनतीची कामे कमी झालीत, त्यामुळे शारीरिक तक्रारी सुरु होऊन मानसिक स्वास्थही नाहीसे झाले आहे.

शारीरिक व मानसिक स्वास्थ उत्तम रहावे यासाठी योगाभ्यास साधना करणे अतिशय उपयुक्त आहे. हा अभ्यास अंतस्फुर्तीने, स्वेच्छापुर्वक करावयाचा असतो. शारीरिक व मानसिक आरोग्याचे निवारण व्हावे यासाठी नियमित योगासने करणे काळाची गरज आहे,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता, ज्याला ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्रांनी मंजुरी दिली. तेव्हापासून २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यामागे मुख्य उद्देश योगाचे फायदे जगभरात पोहोचवणे आणि लोकांना तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

२०२५ मध्ये आपण ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करत आहोत. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ( yoga for One Earth, One Health) ही यावर्षीची थीम असून या थीमचा मुख्य उद्देश वैयक्तिक आरोग्यासोबतच संपूर्ण पृथ्वीच्या आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करणे आहे.

सौ. कविता फाले-बोरीकर
माहिती व जनसंपर्क कार्यालय
नागपूर.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमात ही थीम जाहीर केली होती. ही थीम वसुधैव कुटुंबकम् या भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित आहे, ज्याचा अर्थ संपूर्ण जग एक कुटुंब आहे असा होतो. योगाच्या माध्यमातून आपण स्वतःला आणि पर्यावरणाला निरोगी ठेवू शकतो, हा संदेश या थीममधून देण्यात येत आहे.

योग हा भारताच्या प्राचीन परंपरेचा एक अमूल्य ठेवा आहे, जो शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो. शरीराला लवचिक, मजबूत आणि निरोगी बनवतो. तसेच, ताण कमी करून मानसिक शांती प्रदान करतो.

योगामुळे मन शांत होते, एकाग्रता वाढते आणि नकारात्मक विचार दूर होतात. यामुळे व्यक्ती अधिक सकारात्मक आणि उत्साही बनते. नियमित योगाभ्यासामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि अनेक गंभीर आजारांपासून बचाव होतो. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग यांसारख्या आजारांमध्येही योगासने फायदेशीर ठरतात.

योग म्हणजे निव्वळ व्यायाम आणि आसन नव्हे. हा भावनात्मक समतोल आणि अनंत तत्वाला स्पर्श करत अध्यात्मिक प्रगतीतील सर्व शक्यतांची ओळख करुन देणारे शास्त्र आहे. योगाचा उल्लेख नारदीय सुक्त आणि सर्वात प्राचीन अशा ऋग्वेदामध्ये आढळतो.

पतंजलीचे लेखन देखील अष्टांग योगसाठी आधार बनले आहेत. जैन धर्मातील पांच प्रतिज्ञा आणि बौध्द धर्मातील योगाचाराची बीजे पतंजली योग सूत्रामध्ये आहेत. योग जीवनशैलीचा उपयोग योगाच्या अंतिम लाभांचा अनुभव होण्यास सहाय्यभूत अश्या आपले लक्ष केंद्रित करणाऱ्या काही प्रक्रियांचा उल्लेख आहे.

योगाभ्यास म्हणजे आसने, सूर्यनमस्कार, प्राणायम, एवढेच आपल्या डोळ्यासमोर येते. परंतु योगाभ्यासाची व्याप्ती खूप मोठी आहे. यामध्ये प्रार्थना, पूरक व्यायाम, आसने, प्राणायाम, मुद्रा, बंध, शुध्दीक्रिया धारण, पौष्टिक आहार इत्यादींचा समावेश होतो.

शरीरशुध्दी ही योगाभ्यासाची पहिली गरज सांगितली आहे. योगाभ्यास सहजपणे व चांगल्या प्रकारे ग्रहण करता यावा यासाठी विशिष्ट क्रमाने शिकले पाहिजे. तंज्ञाच्या मार्गदर्शनाद्वारे शिकणे उत्तम, ८४ प्रकारची आसने, २५ मुद्रा, ५ बंध, ८ प्रकारचे प्राणायम, ८ कुंभकासह धौती, नेती इत्यादी शुध्दी क्रियांचा अभ्यास योजलेला आहे.

योगाच्या अभ्यासाची सुरुवात यम-नियम पालनापासून होते. त्यापासून अपेक्षित फल प्राप्ती हवी असेल तर यम-नियम पाळलेच पाहिजे. तेथे तडजोड नाही.

योग हा शब्द युज या संस्कृत धातू पासून बनलेला आहे, त्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. योग ही भारतातील पांच हजार वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. पुष्कळ लोकांचा असा समज आहे की योगाभ्यास म्हणजे शारीरिक व्यायाम आहे, त्यात शरीर ताणले, वाकवले, पिळले जाते आणि अवघड श्वसन प्रक्रियांचा अवलंब केला जातो. खरेतर मानवी मन आणि आत्मा यांची अनंत क्षमता जाणून घेणाऱ्या या विज्ञानाची ही योगाभ्यासाची केवळ वरवरची ओळख झाली. योगाभ्यासामध्ये जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो.

योग अशी परिपूर्ण जीवनशैली आहे ज्यामध्ये योगाच्या सर्व प्राचीन तत्वांचा अंतर्भाव आहे, जेणेकरुन शरीर कृतज्ञ आणि शिस्तबध्द रहात तसेच मन आणि आत्मा एकत्र होऊ शकतो. एका क्रमाने प्रभावी योगासने, प्राणायम आणि ध्यानाच्या आंतरिक अनुभवावर भर दिला जातो. कारण मानसिक स्वास्थ आणि मानवी अस्तित्वाच्या काही छुप्या तत्वासाठी हे गरजेचे आहे. तेव्हाचं त्यांचे जीवन शांत, सुखद आणि परिपूर्ण होते.

योगाचे वैशिष्टय हे आहे की तुम्ही युवक असा कि वयोवृध्द, निरोगी असा कि आजारी, योगाभ्यास सर्वांसाठी लाभदाई आहे आणि तो सर्वांना प्रगती पथाकडे घेऊन जातो. वयपरत्वे आली आसनांची समज अधिक परिपक्व होऊ लागते. मग आपण शारीरिक आसनांसोबत अंतर्गत सुक्ष्मतेवर अधिक कार्य करु लागतो.

योग हा आपल्यासाठी कधीही नविन नव्हता. आपण हे सर्व अगदी बालपणापासून करत आलो आहेत. मग ते पाठीचा कणा मजबूत करणारे माजार्रासन असो कि पचनशक्ती वाढवणारे पवनमुक्तासन.

आपण शिशूंना दिवसभर काही न काही योग क्रिया करतांना पाहतो. प्राणायम म्हणजे आपल्या श्वासोश्वासाचे नियंत्रण आणि विस्तारीकरण, श्वासोश्वसाच्या योग्य तंत्रांचा सराव केल्यास रक्तामधील आणि मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो. त्यामुळे प्राणशक्ती आणि जीवन ऊर्जा यांच्या नियंत्रणास मदत होते.

प्राणायम आणि योगासने हे एकमेकास पूरक आहे. या दोन योगतत्वांचा मिलाफ झाल्याचे शरीर आणि मनाच्या उत्तम प्रतीचे शुध्दीकरण व आत्म नियमन प्राप्त होते. प्राणायम ही ध्यानाच्या गहऱ्या अनुभवाची तयारी असते.

योग शिबिबरामध्ये विविध योग प्रक्रियांना शास्त्रोक्त, पूर्णपणे आणि सुलभतेने शिकवले जाते. या शिबिराद्वारे निरोगी शरीर, शांत मन, ध्यान लागणे आणि आत्मविश्वास बळावण्यासाठी सर्वांगीण समतोल प्राप्त होतो.

योगाचा नियमित सराव करणाऱ्यांच्या जीवनशैलीमध्ये उल्लेखनीय परिवर्तन होऊन त्यांचे जुने आजार नाहीसे होतात. योग आरोग्याचा आणि आनंदाचा मोठा खजिना आहे. योगाद्वारे शरीर निरोगी व मन प्रसन्न राहु शकते ही जाणीव निर्माण करुन स्व-परिवर्तनातून समाज परिवर्तन होऊ शकते.

२१ जून हा उत्तर गोलार्धातील वषार्तील सर्वात मोठा दिवस असतो, ज्याला 'ग्रीष्म संक्रांती' (Summer Solstice) असेही म्हणतात. या दिवशी सूर्यप्रकाश जास्त काळ असतो. या दिवशी शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये योगाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, जेणेकरून जास्तीत जास्त लोक योगाचे फायदे अनुभवू शकतील.

योग ही भारताला मिळालेली मोठी देणगी आहे. भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. प्रत्येक व्यक्तिला योगाचे वेगवेगळे महत्व आणि आवश्यकता आहे. योग प्रत्येकाच्या जीवनाची आदर्श दिशा ठरवण्यासाठी सहाय्य करायला दृढ संकल्प आहे. आपणही यात सहभागी होऊन निरामय आनंदी जीवन व्यथित करु या. मनाचा योग कसा साधला जातो. तुम्ही स्वतः आतून जोडून घ्या, मग मानसिक शांती कुठे बाहेर शोधावी लागत नाही....

■ ■ ■

# निरोगी आयुष्यासाठी योग..!


**भारत ही संत महंत ऋषि मुनी यांनी पावन झालेली भूमी आहे योग ही शरीराच्या मानसिक शारीरिक व आध्यात्मिक संवेदना सक्षम होण्यासाठी एक सहज केली जाणारी क्रिया असून शारीरिक दुर्बलता ठीक व्हावी यासाठी अनेक प्रकारच्या आसन व क्रियांद्वारे मानवी आरोग्य उत्तम राहुन आपल्या देशाचे सशक्त नागरिक तयार झाल्यास खरा बलशाली भारत निर्माण होण्यासाठी योग माध्यम पुरेसे आहे.**

--------------

योग हा संस्कृत शब्दाचा अर्थ जोडणे किंवा एकजूट होणे आहे म्हणजेच मनाची शांती व शारीरिक स्थिती जोड मिळाली की माणूस परिपूर्ण होतो ही ताकत योगात आहे

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र संघात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा व्हावा यासाठी ११ डिसेंबर २०१४ रोजी प्रस्ताव मांडला जो १९३ देशपैकी १७५ देशांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन हा दिवस संपूर्ण विश्वात आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून २१ जून २०१५ पासून साजरा होऊ लागला.

उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्णा विहार, नागपूर.
9518571138



यावर्षीची संकल्पना ही एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग अशी असून २१ जुन हा उत्तरी गोलार्धात सर्वात मोठा दिवस असल्यानं आपलं आरोग्य हेही सर्वात उत्तम, मोठं राहावे म्हणूनच या दिवसाची निवड करण्यात आली

भगवान शिव यांना योगाचे प्रवर्तक म्हणजे आदीगुरू म्हटल्या जाते त्यानंतर ऋषि मुनी पासून तर भगवान कृष्ण, महावीर, भगवान बुद्ध यांनीही योगचा विस्तार केला तो पुढे पतंजली ऋषी नी शास्त्रीय योग ग्रंथात सूत्रबद्ध केला .

भारतीय संस्कृतीत योगा हजारो वर्षे पूर्वी आपल्या ऋषी मुनी यांनी आपलं आरोग्य, तन मन, तसेच ध्यान एककेंद्रि राहावे यासाठी योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून जोपासला . निरोगी जीवनासाठी योगा चे शारीरिक व मानसिक फायदेही आहेत .

- मानसिक शांती व एकाग्र मन करते
- रोगप्रतिकारक शक्ति वाढविते
- शारीरिक क्षमता वाढीस लागते
- शरीराची लवचिकता वाढवते
- विविध प्रकारच्या व्याधी कमी करण्यासाठी योग प्रभावी
- निरोगी तन मन ठेवून सकारात्मक विचार वाढवते
- आत्मविश्वासाची वृद्धी करते

त्याचबरोबर योग सामाजिक स्वास्थ सुधारण्याबरोबर लोकांना जात पात धर्म सांप्रदाय विसरून एका छताखाली लोकांना एकत्र आणून एकसंघ ठेवते .

आरोग्य हीच संपत्ती असल्याने आपण सर्व रोजच्या जीवनशैली त योग करण्यासाठी वेळात वेळ काढला पाहिजे पूजा करताना ही योग करता येतो . आपली दैनंदिन कामे करता करता ही योग करता येतो . त्यासाठी काही ठिकाण, साहित्य, कोचिंग, यांची आवश्यकता नाही योग म्हणजे ध्यान, श्वासावर नियंत्रण, स्थिर बुद्धी, शरीर, मन ठेवणार प्रत्येक कृती म्हणजेच योग...

चालता बोलता उठता बसता अगदी झोपताना ही आपण काही क्रिया कृती केल्यास तोही योगच असतो. आपला भारत अधिक बलशाली सशक्त, निरोगी, सक्षम राहण्यासाठी योग आवश्यक आहे जीवनाचा निरोगी आनंद घेण्यासाठी शरिर निरोगी, मन प्रसन्न, उत्साह, स्फुर्ती, मनःशांती ही योगाच्या माध्यमातून मिळते हे सत्य नाकारता येत नाही। म्हणूनच योग करा व निरोगी राहा,

■ ■ ■

# आंतरराष्ट्रीय योग दिन

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला.



२१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो.

२१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला.

सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. या प्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली.

२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन जगभर साजरा करण्यात आला. भारतीय प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योगसाधना यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे.

तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो ; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो.

भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे. कोरोनारुपी महामारीच्या काळात तर योग दिनाला विशेष महत्व प्राप्त झाले होते. कोरोना सारख्या महामारीचा मुकाबला करायचा असेल तर आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित व्यायाम आणि योगासन यांनी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते.

योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे.

आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■

# पित्ताचे दगड म्हणजे काय?



आता पोट फुगणे, मळमळणे आणि पोटाच्या वरच्या भागात दुखणे यासारख्या समस्या आता ४० किंवा ५० वर्ष वयोगटातील लोकांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. आजकाल २० वयवर्ष वयोगटातील तरुणांमध्येही पित्ताशयाच्या दगडांची प्रकरणे झपाट्याने वाढत आहेत. याला पित्ताचे दगड असेही म्हणतात. याचे प्रमुख कारण म्हणजे झपाट्याने बदलणारी जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी.

पित्ताशयात तयार होणाऱ्या घन जमावटलाच पित्ताशयाचा दगड किंवा पित्ताशयाचा दगड म्हणतात. पित्ताशय हा एक लहान अवयव आहे जो यकृताच्या खाली स्थित असतो आणि शरीरातील चरबी पचविण्यासाठी पित्त साठवतो.

पित्ताचे दगड लहान पिंपल्सपासून ते गोल्फ बॉलइतके मोठे असू शकतात. काही लोकांना दगड झाल्यावर कोणतीही लक्षणे दिसत नाहीत, परंतु जेव्हा हा दगड पित्ताचा प्रवाह थांबवतो तेव्हा तीव्र वेदना आणि इतर गंभीर लक्षणे दिसू लागतात. ही स्थिती कधीकधी इतकी वेदनादायक बनते की रुग्णाच्या दैनंदिन कामावर वाईट परिणाम होऊ शकतो.

**फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले आहार**

बर्गर, पिज्झा, चिप्स, कोल्ड ड्रिंक्स सारख्या गोष्टींमध्ये फायबरची कमतरता असते आणि सॅच्युरेटेड फॅटचे प्रमाण जास्त असते. यामुळे पित्त जाड होण्याची आणि पित्ताशयात दगड तयार होण्याची शक्यता वाढते.

**क्रॅश डाएट आणि वेगाने वजन कमी करणे**

बरेच तरुण अचानक वजन कमी करण्यासाठी केटो आहार, अधूनमधून उपवास किंवा डिटॉक्स आहाराचे अनुसरण करतात. यामुळे यकृत अधिक कोलेस्ट्रॉल सोडते, ज्यामुळे दगड तयार होण्याची प्रक्रिया वेगवान होते.

**बसण्याच्या सवयी आणि ताण**

बराच वेळ काम करणे, ताण घेणे आणि वेळेवर न खाणे यावरही पचन आणि चयापचयावर परिणाम होतो, ज्यामुळे दगड होऊ शकतात.

**भूक लागणे आणि एकाचवेळी खूप खाणे**

जेव्हा आपण बराच वेळ उपाशी असतो आणि एकाच वेळी भरपूर अन्न खातो तेव्हा पित्ताशय व्यवस्थित आकुंचन पावत नाही, ज्यामुळे पित्त थांबते आणि दगड तयार होतात.

**पित्ताच्या दगडांची लक्षणे**

उजव्या बाजूला वरच्या ओटीपोटात तीव्र वेदना, विशेषतः तेलकट जेवणानंतर मळमळ किंवा उलट्या, पोटात सूज येणे पाठ किंवा खांद्यादरम्यान वेदना, पित्ताशयाची जळजळ, स्वादुपिंडाची जळजळ, जी प्राणघातक असू शकते. पित्ताशयाची फुटण्याची स्थिती, गंभीर रुग्णालयात दाखल करणे आवश्यक

**पित्ताच्या दगडांवर उपचार**

लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रियेद्वारे पित्ताच्या दगडांवर उपचार केले जातात. यामध्ये छोट्या छोट्या चीरांद्वारे पित्ताशय काढून टाकले जाते. ही एक सुरक्षित, प्रभावी आणि जलद रिकव्हरी आहे. एका आठवड्याच्या आत, ती व्यक्ती पुन्हा सामान्यपणे कार्य करू शकते. पित्ताशयाशिवायही शरीर सामान्यपणे कार्य करते.

■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## योग दिवस

**योग दिनाचे औचित्य साधुनी**
**गिरवू योगाचे धडे**
**शारीरिक मानसिक संतुलनाने**
**आनंदी जिवनाची वाट सापडे ..**

**योगदिनाच्या निमित्ताने**
**करू सुरु प्राणायाम**
**सातत्य टिकवून ठेवले तर**
**शरीर बनेल निरोग धाम...**

**हेल्थ इज वेल्थ**
**कोरोनाने केले सिद्ध**
**इम्युनिटी वाढविण्यासाठी**
**नित्य व्यायामाची ठेवू जिद्द**

# तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने ५३ वर्षीय महिलेवर जीवन वाचवणारी यशस्वी शस्त्रक्रिया केली गंभीर श्वसनमार्ग अडथळ्याच्या प्रकरणात यश

**नागपूर, २० जून :** चंद्रपूरच्या ५३ वर्षीय महिलेला गंभीर स्थितीत वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे दाखल करण्यात आले होते. तिच्या छातीत मोठा ट्युमर आढळून आला होता जो श्वासनलिका (ट्रॅकिया)वर दाब देत होता, त्यामुळे एक फुफ्फुस पूर्णपणे बंद झाले होते आणि दुसरे जवळपास पूर्णपणे बंद होण्याच्या स्थितीत होते.

ही महिला गेल्या १० दिवसांपासून तीव्र श्वास घेण्यास त्रास, खोकला व छातीत दुखणे यासारख्या त्रासांनी पीडित होती. तिची प्रकृती २ जून २०२५ रोजी अधिकच बिघडली. सुरुवातीला वरोरा येथील रुग्णालयात प्रथम दाखल झाल्यानंतर तिच्या डाव्या वोकल कॉर्डचे पक्षाघात झाले असल्याचे निदान झाले. तिचा श्वास घेण्याचा त्रास झपाट्याने वाढल्यामुळे तिला इंट्युबेट करून तातडीने वॉकहार्ट हॉस्पिटल, नागपूर येथे हलवण्यात आले..

वोक्हार्ट येथे तपासणी दरम्यान, सीटी स्कॅन आणि डायग्नोस्टिक ब्रॉन्कोस्कोपी करण्यात आली, ज्यामध्ये छातीच्या मध्यभागी (मीडियास्टिनममध्ये) एक मोठी गाठ आढळून आली जी तिच्या श्वसनमार्गावर दाब टाकत होती. यामुळे तिची श्वासनलिका जवळजवळ पूर्णतः बंद झाली होती आणि उजव्या मुख्य ब्रॉन्कसचा मार्ग पूर्णतः बंद झाल्यामुळे फुफ्फुस कोलमडले होते व त्यात हवा अडकली होती. तसेच डाव्या ब्रॉन्कसचाही मार्ग जवळजवळ पूर्ण बंद झालेला होता.

परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे एक अत्यंत गुंतागुंतीची व उच्च जोखमीची



शस्त्रक्रिया नियोजित करून यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. ही शस्त्रक्रिया ईसीएमओ तज्ञ डॉ. चेतन शर्मा, डॉ. राहुल हिवांज, डॉ. सुमित नारंग, डॉ. समीर अर्बट (इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट), डॉ. अवंतिका जयस्वाल, ॲनेस्थेटिस्ट, डॉ. बारोकर, डॉ. विजया लांजे आणि डॉ. बेलेकर यांच्या नेतृत्वाखालील बहुवैद्यकीय तज्ज्ञांच्या टीमने यशस्वीरीत्या पार पाडली.

५ जून २०२५ रोजी रुग्णावर रिजिड ब्रॉन्कोस्कोपिक क्रायोबायॉप्सी आणि इलेक्ट्रोकॉटरीद्वारे ट्युमर काढण्याची यशस्वी प्रक्रिया पार पडली. यावेळी श्वसनमार्ग खुला राहावा म्हणून वाय-आकाराचा एअरवे स्टेंट बसवण्यात आला. ही शस्त्रक्रिया व्हीव्ही-ईसीएमओ सपोर्ट (फुफ्फुसांना आधार देणारी विशेष तंत्रज्ञान) आणि यांत्रिक व्हेंटिलेशनच्या सहाय्याने पार पाडण्यात आली, कारण शस्त्रक्रियेच्या दरम्यान रक्तस्राव होण्याची आणि श्वासनलिका कोसळण्याचा धोका खूप मोठा होता.

शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि रक्तस्राव प्रभावीपणे नियंत्रणात ठेवण्यात आला. रुग्णाला आयसीयूमध्ये बारकाईने देखरेखीखाली ठेवण्यात आले तिच्या पुनर्प्राप्तीसाठी रक्त चढविणे व औषधोपचार देण्यात आले.. ७ जून रोजी करण्यात आलेल्या फॉलोअप ब्रॉन्कोस्कोपीमध्ये दोन्ही श्वसनमार्ग खुले असल्याचे स्पष्ट झाले आणि रुग्णाने उपचारांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

डॉ. समीर अर्बट यांनी सांगितले की, ही एक अत्यंत दुर्मिळ आणि जीवघेणी केस होती. वेळीच केलेली आधुनिक ब्रॉन्कोस्कोपी प्रक्रिया आणि ईसीएमओ सपोर्टमुळे रुग्णाचे प्राण वाचवता आले. त्यांनी या यशस्वी उपचारामागे असलेल्या संपूर्ण वैद्यकीय टीमच्या उत्कृष्ट समन्वय आणि कौशल्याचे विशेष कौतुक केले. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून कॅन्सरसाठी पुढील वैद्यकीय उपचार घेत आहे. ही केस वेळेवर निदान, प्रगत पल्मोनोलॉजी प्रक्रिया आणि काळजीपूर्वक क्रिटिकल केअर उपचार यांचे महत्त्व अधोरेखित करते जे अशा आपत्कालीन प्रसंगात जीव वाचवण्यास महत्त्वाचे ठरतात.

## कैकयीमध्ये कणखरपणा, प्रामाणिकपणा आणि ममता हे गुण होते, पण तिच्यातील महत्त्वाकांक्षाच सगळ्यांच्या लक्षात राहते : हुनर हाली गांधी



**मुंबई, २० जून :** बाल हनुमनाच्या जीवनाचा आढावा घेणाऱ्या सोनी सबवरील वीर हनुमान या पौराणिक मालिकेत कैकयीची व्यक्तिरेखा उत्कृष्ट साकारल्याबद्दल हुनर हाली गांधीचे कौतुक होत आहे. अभिनयातील भावनिक गहनता आणि डौल यांच्याबद्दल ओळखल्या जाणाऱ्या हुनरने लोकांच्या तिरस्कारास पात्र ठरलेल्या कैकयीच्या व्यक्तिरेखेतील बारकावे सुंदर पद्धतीने दाखवले आहेत.

दिलखुलास गप्पांच्या ओघात हुनरने राणी कैकयीची भूमिका करण्याचा तिचा अनुभव आणि हनुमानाबद्दल आपल्याला वाटणारी श्रद्धा याविषयी आणि इतरही बरेच काही सांगितले.

१. जेव्हा तुला राणी कैकयीची भूमिका देऊ करण्यात आली तेव्हा तुझी प्रतिक्रिया काय होती?

मला खूपच आनंद झाला. चार वर्षांपूर्वी रुक्मिणीची भूमिका केल्यानंतर पुन्हा पौराणिक मालिकेत काम करण्याची माझी इच्छा होती. आणि त्याच वेळी वीर हनुमान मालिकेतील कैकयीच्या भूमिकेचा प्रस्ताव मला मिळाला. येथील कामकाजाचे वातावरण पोषक आणि व्यावसायिक आहे; खरोखर एका विशेष मालिकेचा भाग असल्यासारखे वाटते.

२. राणी कैकयीची भूमिका करण्यातील सर्वात समाधानकारक आणि कठीण भाग कोणता आहे?

या मालिकेत खूप बारीक सारिक तपशीलांवर लक्ष दिले आहे. शूटिंग करताना अवजड आभूषणे, विग, मुकुट आणि पोशाख परिधान करणे हे उन्हाळ्याच्या दिवसात फारच त्रासदायक असते. तरीही मी चेहऱ्यावर हसू कायम ठेऊन हे करते, कारण त्याद्वारे प्रेक्षकांशी जे नाते जुळते, तेच माझे बक्षीस असते. प्रेक्षक जेव्हा भावनिक स्तरावर तुमच्या व्यक्तिरेखेशी जोडले जातात, तेव्हा कष्टांचे चीज झाल्याचे समाधान मिळते.

३. कैकयी या भारतीय पुराण कथांमधील सुपरिचित आणि गुंतागुंतीची व्यक्तिरेखा असलेल्या भूमिकेत शिरण्यासाठी तू काय तयारी केलीस?

पौराणिक कथा सादर करताना एक ठहराव, डौल आणि उच्चार आणि हालचाली यांच्यात अचूकता अपेक्षित असते. कैकयी एक उत्कृष्ट योद्धा होती. त्यामुळे फिटनेस आणि समतोल गरजेचा होता. तिचे भावनिक विश्व, तिची भक्ती, श्रीरामाविषयीचे तिचे प्रेम आणि मनातील अंतर्द्वंद्व यावर मी लक्ष केंद्रित केले. बऱ्याचदा कैकयीकडे एका ठराविक दृष्टिकोनातून पाहिले जाते. पण श्रीरामाला वनवासात पाठवण्याच्या तिच्या निर्णयाच्या पलीकडे देखील तिचे व्यक्तिमत्व व्यापक आहे. ती प्रेमळ होती आणि शूर होती.

४. एक आई आणि राणी म्हणून कैकयीच्या कृतींशी तुझे भावनिक संधान कसे आहे? तिने केलेल्या निवडीबद्दल तुला सहानुभूती वाटते का?

होय. मला हे जाणवते की, बऱ्याचदा आपल्या एका चुकीवरून जग आपली परीक्षा करत असते. त्याच्या समोर इतर अनेक सत्कृत्य विसरली जातात. कैकयीच्या बाबतीत नेमके हेच झाले आहे. तिचे सामर्थ्य, प्रामाणिकपणा, ममता यांसारखे गुण असूनही ती फक्त तिच्यातील महत्त्वाकांक्षेबद्दलच ओळखली जाते. वीर हनुमान मालिकेत तिच्यातील सौम्य बाजू देखील दाखवली आहे. छोट्या श्रीरामासोबतची माझी जी दृश्ये आहेत त्यात आपलेपणा आणि प्रेम ओतप्रोत भरलेले आहे. कैकयीच्या रूपात मला एक बहु-आयामी माता आणि स्त्री दाखवण्याची संधी मिळाली आहे.

५. पौराणिक मालिकांमध्ये भरजरी पोशाख, भारदस्त भाषा आणि सेट्स असतात. सेटवर पहिल्या दिवशी या सगळ्यांचा अनुभव घेताना तुला काय वाटले?

मी अवाक झाले होते! मी स्वतः माता नसताना साक्षात श्रीरामाची माता होणे ही भावनिक आनंद देणारी बाब आहे. हीच तर अभिनयातील गंमत आहे. खऱ्या जीवनात तुम्हाला कधीही अनुभवता येणार नाही, अशा भूमिका आणि नाती तुम्हाला अभिनयाच्या माध्यमातून जगता येतात. कैकयीचा लुक आणि उपस्थिती यामुळे मला भारदस्त, कणखर वाटले आणि त्या पत्राशी मी अगदी पहिल्या दिवसापासून तद्रूप झाले.

६. या मालिकेत हनुमानाचा पराक्रम, ताकद आणि भक्ती या गुणांवर प्रकाश टाकला आहे. तुला त्यापैकी कोणता गुण सर्वाधिक प्रिय आहे?

हनुमान हा निष्ठा, निःस्वार्थता आणि विनम्रता यांचे प्रतीक आहे. दुर्दैवाने ही मूल्ये आजच्या जगात लुप्त होत चालली आहेत. विश्वास खूप क्षणभंगुर असू शकतो. घट्ट मैत्री अचानक तुटताना मी अनुभवली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणा आणि इमानदारी हे गुण मला फार मौल्यवान वाटतात. नात्यामधील निखळपणा आणि अहंकाराशिवाय सेवा करण्यातील ताकद हनुमान आपल्या चारित्रातून दाखवतो.

७. तू अलीकडेच शूटिंग सुरू केले आहेस, तुझ्या सहकलाकारांशी तुझे नाते कसे आहे?

छोट्या श्रीरामाची भूमिका करणारा तन्मय ऋषी भलताच गोड आहे. पडद्यावर त्याच्याशी नाते अस्सल दिसावे, यासाठी मी त्याचे त्याच्या खऱ्या आईशी असलेले नाते समजून घेतले. तो खूपच गोड आहे आणि पटकन मदत करतो. इतक्या लहान वयात त्याच्यात जी व्यावसायिकता आहे, ती कौतुकास्पद आहे. सेटवर सगळ्यांशी मिळून मिसळून राहण्याचा आणि कामकाजाचे वातावरण सकारात्मक ठेवण्याचा माझा प्रयत्न असतो.

## ऑरिक, आयएसएके, फिक्स माय कर्ल्स हे ठरले ॲमेझॉनच्या प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे विजेते



नवी दिल्ली, १८ जून २०२५: ॲमेझॉन इंडिया ने आज ऑरिक, आयएसएके, फिक्स माय कर्ल्स या ब्रँडना ॲमेझॉन च्या प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे विजेते म्हणून जाहीर केले. हा उपक्रम भारतीय ब्रँड्सना डी टू सी (डायरेक्ट टू कंझ्यूमर) भागात ई-कॉमर्स एक्स्पोर्टर्सद्वारे जगभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी समर्पित पाठबळ देण्याच्या दृष्टीने डिझाइन करण्यात आला आहे. दीपक अग्रवाल यांनी स्थापन केलेला ऑरिक, विदुषी विजयवर्गीय यांनी स्थापन केलेला आयएसएके फ्रॅग्रन्स आणि अंशिता मेहरोत्रा यांनी स्थापन केलेला फिक्स माय कर्ल्स या तिन्ही ब्रँडना एकत्रितपणे ॲमेझॉन कडून १ लाख अमेरिकन डॉलर इतकी इक्विटी फ्री ग्रँट देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या जागतिक पातळीवर विकास करण्याच्या प्रयत्नांसाठी ही ग्रँट देण्यात आली आहे.

ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग इंडिया प्रमुख श्रीनिधी कल्वापुडी म्हणाले, प्रोपेल ग्लोबल बिझनेस ॲक्सेलरेटर सीजन ४ चे सर्व विजेते आणि अंतिम फेरीत आलेल्या ब्रँडचे मी हार्दिक अभिनंदन करतो. भारतभरातून जागतिक ब्रँड्स उभारण्यासाठी दिसणारी नवकल्पना आणि महत्वाकांक्षा पाहून खूप प्रेरणा मिळते. ई-कॉमर्स एक्स्पोर्टर्सचा वेगाने होत असलेला अंगिकारच यातून दिसून येतो. भारतीय उद्योजकांना ही संधी उपलब्ध करून देण्यासाठी आमच्या भागीदारांनी दिलेल्या पाठबळाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. आमचा उद्देश विविध प्रकारच्या व्यवसायांना जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा आहे. प्रोपेल ची सुरुवात उदयोन्मुख कंपन्यांना जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी झाली. गेल्या चार वर्षांत आम्ही मिनिमलिस्ट, सिरोना, शूमी, पीएलआईएक्स, बटरफ्लाय एज्यु, कॉन्फेक्ट यांच्यासह १२० हून अधिक भारतीय डी२सी ब्रँड्सना पाठबळ दिले. प्रोपेल एस५ च्या माध्यमातून आम्ही यावर्षी आणखी १०० भारतीय डी२सी ब्रँड्सना जागतिक बाजारात प्रवेश मिळवून देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. २०३० पर्यंत भारतातून ८० अब्ज अमेरिकन डॉलरच्या ई-कॉमर्स एक्स्पोर्ट्सचे उद्दिष्ट साध्य करण्याचा हा एक महत्त्वाचा भाग आहे.

## ॲमेझॉन इंडिया भारतभरातील आपल्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये वाढ करण्यासाठी २००० कोटी रूपयांहून अधिक गुंतवणूक करणार

**नागपूर, २० जून :** भारतात सर्वात सुरक्षित, सर्वात गतीशील आणि सर्वात विश्वसनीय ऑपरेशन्स नेटवर्क निर्माण करण्यासह ऑपरेट करण्याप्रती आपल्या कटिबद्धतेचा भाग म्हणून ॲमेझॉन २०२५ मध्ये २००० कोटी रूपयांहून अधिक (जवळपास २३३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) गुंतवणूक करणार आहे. ऑपरेशन्स पायाभूत सुविधा विस्तारित व अपग्रेड करण्यासाठी, सहयोगी सुरक्षितता व स्वास्थ्य उपक्रमांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कंपनीच्या फुलफिलमेंट नेटवर्ककरिता नवीन टूल्स व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी या गुंतवणूकीचा वापर करण्यात येईल. ही नवीन गुंतवणूक अमेझॉनच्या ऑप्स नेटवर्क तयार करण्याच्या गुंतवणूकीवर आधारित आहे, जी कंपनीला भारतातील सर्व सेवायोग्य पिन-कोडपर्यंत पोहोचण्यास मदत करते.

भारतात दशकाहून अधिक काळापासून कार्यरत असण्यासह आम्ही दर्जात्मक लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, जी देशभरातील ग्राहकांना सुरक्षितपणे, त्वरित, मोठ्या प्रमाणात आणि विश्वसनीयरित्या सेवा देते. या नवीन गुंतवणूकांमधून आमच्या फुलफिलमेंट, सॉर्टेशन आणि डिलिव्हरी नेटवर्कमधील ऑपरेशन्स सतत विस्तारित व अपग्रेड करत राहण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. आमच्या पायाभूत सुविधा क्षमता प्रबळ करत, प्रक्रिया क्षमता वाढवत आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करत आम्ही ॲमेझॉनला भारतभरातील ग्राहकांना उत्तमप्रकारे सेवा देण्यासाठी सुसज्ज करत आहोत, तसेच या सर्व प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण असलेले आमचे कर्मचारी, सहयोगी व भागीदारांना पाठिंबा देत आहोत,'' असे ॲमेझॉन इंडिया व ऑस्ट्रेलियाच्या ऑपरेशन्सचे उपाध्यक्ष अभिनव सिंग म्हणाले.

पायाभूत सुविधा विस्तारीकरण आणि अपग्रेडेशन

ॲमेझॉनची या गुंतवणूकांचा फायदा घेत नवीन साइट्स लाँच करण्याची आणि त्यांच्या फुलफिलमेंट, सॉर्टेशन व डिलिव्हरी नेटवर्कमधील विद्यमान सुविधा अपग्रेड करण्याची योजना आहे. ही गुंतवणूक प्रक्रिया क्षमता वाढवेल, फुलफिलमेंट गती सुधारेल आणि कंपनीच्या ऑपरेशन्स नेटवर्कमध्ये कार्यक्षमता वाढवेल, ज्यामुळे ॲमेझॉनला भारतभरातील ग्राहकांना जलदपणे आणि अधिक विश्वसनीयरित्या सेवा देण्यास मदत होईल. ॲमेझॉनच्या विद्यमान व नवीन ऑपरेशन्स नेटवर्कमधील बिल्डिंग्स अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कार्यक्षम बिल्डिंग सिस्टम्ससह डिझाइन करण्यात आल्या आहेत, जेथे ऊर्जा वापर कमी केला जातो. ॲमेझॉन फुलफिलमेंट सेंटर्स विकलांग व्यक्तींसाठी सुरक्षित व अधिक सहजसाध्य असण्याकरिता डिझाइन करण्यात आले आहेत. कंपनी स्वास्थ्य व सुरक्षिततेच्या खात्रीसाठी कूलिंग सोल्यूशन्स, सुरक्षितता उपक्रम आणि विश्रांती कक्षांमध्ये सुधारणा करण्यावर सतत लक्ष केंद्रित करते, तसेच सर्वोत्तम कामाचे वातावरण देते. या धोरणात्मक गुंतवणूकांमधून भारतभरातील आपली ऑपरेशनल उपस्थिती मजबूत करण्यावर, तसेच विक्रेत्यांना सक्षम करण्यावर, ग्राहक सोयीसुविधा वाढवण्यावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थांसाठी विकासाला गती देण्यावर ॲमेझॉनचा सातत्यपूर्ण फोकस दिसून येतो.

## कोटक सिक्युरिटीजतर्फे कोटक स्टॉकशाळेचा शुभारंभ

**मुंबई, २० जून :** भारतातील आघाडीच्या ब्रोकरेज घराण्यापैकी एक असलेल्या कोटक सिक्युरिटीजने देशभरातील गुंतवणूकदार तसेच शेअरबाजारात समभाग आणि वायदा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना (ट्रेडर्स) भांडवल बाजाराचे शिक्षण देण्यासाठी 'कोटक स्टॉकशाळा' या मोफत बहुभाषिक शिक्षण मंचाचा प्रारंभ करत असल्याची घोषणा केली आहे. कोटक निओ पवरही हा मंच उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. हा मंच दोन स्वरूपात उपलब्ध आहे:

१. व्हिडिओ-आधारित अभ्यासक्रम: हा त्रिस्तरीय अभ्यासक्रम असून त्यामध्ये लहान आणि सहज समजण्यायोग्य प्रकरणे आहेत. त्यात प्रामुख्याने मूलभूत आणि प्रगत संकल्पना समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. हा अभ्यासक्रम सध्या हिंग्लिशमध्ये उपलब्ध आहे. तो लवकरच इंग्रजीमध्ये सुरु केला जाणार आहे.

२. मजकूर-आधारित अभ्यासक्रम: समजण्यास अतिशय सोप्या असलेल्या २०० हून अधिक प्रकरणांमध्ये हा व्यापक अभ्यासक्रम विभागलेला आहे. तो इंग्रजी आणि हिंदीमध्ये उपलब्ध आहे. लवकरच अतिरिक्त प्रादेशिक भाषेतही हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे.

भारतात मार्च २०२५ पर्यंत ४.९२ कोटींहून अधिक सक्रिय डीमॅट खातेधारक आहेत. त्यामुळे बहुस्तरीय आणि व्यावहारिक गुंतवणूक शिक्षणाच्या पर्यायांची गरज वाढवली आहे. भारताच्या विविध प्रदेशातून शेअरबाजारात सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींना कोटक स्टॉकशाळा आर्थिक साक्षरता तसेच भांडवली बाजारांबाबत उच्च-गुणवत्तापुर्ण तसेच समजण्यास सोपी, सुटसुटीत व सुलभ सामग्री उपलब्ध करुन देत ही मागणी पूर्ण करत आहे.

या नाविन्यपूर्ण शैक्षणिक व्यासपीठाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कोटक सिक्युरिटीजचे एमडी आणि सीईओ श्रीपाल शाह म्हणाले की, आर्थिक सक्षमीकरणाचा प्रारंभ ज्ञानापासून सुरू होतो, यावर कोटक सिक्युरिटीजचा ठाम विश्वास आहे. आमचे नवीन शैक्षणिक व्यासपीठ कोटक स्टॉकशाळेमध्ये व्यापक व्हिडिओ आणि मजकूर-आधारित मोफत सामग्री आहे. या सुविधेतून आम्ही प्रत्येक भारतीयासाठी, मग त्यांची पार्श्वभूमी किंवा अनुभव काहीही असो, गुंतवणूक शिक्षण अतिशय सुलभ आणि सोपे करत आहोत. अतिशय जटिल संकल्पना कोणीही समजू शकेल आणि त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करू शकेल, अशा सोप्या, आकर्षक धड्यांमध्ये विभागून आत्मविश्वासू गुंतवणूकदारांना ज्ञानी करणे हे आमचे ध्येय आहे.

भांडवली बाजारातील ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्यासाठी कोटक स्टॉकशाळेची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक गुंतवणूकदार आणि ट्रेडर्सला त्यांची गुंतवणूक आणि शेअरबाजाराबाबतची समज अधिक विस्तृत होईल. तसेच त्यांचा गुंतवणूक प्रवास प्रदीर्घ काळ सुरु राहण्यास मदत होईल. वर्षाच्या अखेरीस १० अभ्यासक्रमांचा समावेश करण्यासाठी या मंचाचा विस्तार करण्याचे फर्मचे उद्दिष्ट आहे.

कोटक सिक्युरिटीजचे अध्यक्ष आणि मुख्य डिजिटल व्यवसाय अधिकारी आशिष नंदा म्हणाले, आजच्या गतिमान आर्थिक परिस्थितीत, सतत शिकणे हा केवळ एक फायदा नव्हे तर ती एक गरज आहे. आमचा नवीन मंच नवख्या आणि अनुभवी ट्रेडर्सना सेवा पुरविण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे. बाजारात प्रथमच प्रवेश करणाऱ्यांचा पाया मजबूत करण्यासाठी आम्ही विविध स्तरात त्यांना समजण्यास सोपी शैक्षणिक सामग्री प्रदान करत आहे. तर अनुभवी ट्रेडर्सची धोरणे सुधारण्यासाठी आणि बाजारातील प्रवाहांच्या ते सदैव पुढे राहण्यासाठी आम्ही त्यांच्यासाठी प्रगत मॉड्यूल तयार करण्याची योजना आखत आहोत. प्रत्येक गुंतवणूकदाराला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानाने सक्षम करण्याची आमची वचनबद्धता या उपक्रमातून प्रतिबिंबित होते.

## ईस्टमन कंपनीने प्रगत सौर उत्पादनांच्या श्रेणीसह महाराष्ट्रात केला अक्षय ऊर्जा क्षेत्रात विस्तार

**नागपूर, २० जून :** सौरऊर्जा उत्पादनांच्या क्षेत्रातील आघाडीची कंपनी ईस्टमन ऑटो ॲण्ड पॉवर लिमिटेड ने महाराष्ट्रात उच्च कार्यक्षमतेच्या सौरऊर्जा उत्पादनांच्या व्यापक श्रेणीसह विस्तार सुरू केला आहे.राज्यातील विश्वासार्ह आणि शाश्वत ऊर्जेची वाढती गरज लक्षात घेता, ईस्टमन आता ग्रीड टाय इन्व्हर्टर, हायब्रिड इन्व्हर्टर, ऑफ-ग्रीड इन्व्हर्टर, लीड-ॲसिड व लिथियम बॅटऱ्या आणि सौर पॅनेल्स यांचा समावेश असलेली उत्पादनांची सशक्त श्रेणी सादर करत आहे. ही सर्व उत्पादने निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहेत. ईस्टमनची इन्व्हर्टर श्रेणी रूफटॉप सौर प्रणालीशी अखंडपणे एकत्रित होईल, अशा प्रकारे डिझाइन करण्यात आली आहे. या प्रणालीच्या साहाय्याने वापरकर्त्यांना अतिरिक्त सौरऊर्जा निर्माण करून ती ग्रीडमध्ये पाठविता येते. परिणामी, वीज बिलात लक्षणीय घट होते आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन मिळते. महाराष्ट्र आपल्या सौरऊर्जा प्रयत्नांना गती देत असताना, ईस्टमनच्या प्रगत सौर उपायांचा उद्देश पारंपरिक ऊर्जा स्रोतांवरील अवलंबित्व कमी करणे आणि राज्याच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांमध्ये योगदान देणे हाच आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नागपूर, लातूर, सांगली आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये वेगाने वाढणारी उपस्थिती असलेल्या ईस्टमनने, मजबूत डीलर नेटवर्कद्वारे सर्व सौरऊर्जा उत्पादनांची सहज उपलब्धता सुनिश्चित केली आहे. हा एकच समाधानकारक दृष्टिकोन तुमच्या सर्व सौरऊर्जेशी संबंधित गरजांची पूर्तता करतो, ज्यास तज्ज्ञांचे तांत्रिक सहाय्य आणि शहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये विश्वासार्ह विक्री-पश्चात सेवा लाभते.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी आणि तिची भावंडे युगच्या घरात राहायला जाणार म्हणजे नक्कीच गोंधळ माजणार!

**मुंबई, २० जून :** सोनी सबवर नुकत्याच सुरू झालेल्या उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेचे आगळेवेगळे कथानक आणि त्यातील जिवंत पात्रे, यांच्यामुळे ही रोमॅंटिक मालिका लोकांना आवडते आहे. अगदी सुरुवातीपासून आता कथानकात काय घडणार याची प्रेक्षकांना उत्कंठा वाटू लागली आहे. त्यात युग सिन्हा (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी शर्मा (आशी सिंह) यांच्यात तणाव वाढतो आहे आणि भूतकाळातील वादळाने त्यांना घेरले आहे. अलीकडच्या भागांमध्ये, कैरी युगला कोर्टात हरवते त्यामुळे त्याचा बदला घेण्याचे सत्र सुरू होते. पण हे सगळे काही अचानक बदलते, जेव्हा युगच्या आईला कैरीमध्ये तिच्या दिवंगत मुलीची-लताची झलक दिसते!

मायरी (सुप्रिया शुक्ला)चा अपघात होतो आणि कैरी तिच्या मदतीस धावून येते. त्यामुळे युगला त्याच्या मनाविरुद्ध, कैरीला त्यांच्या घरी आणण्यासाठी ती भाग पाडते. युग कैरी आणि तिच्या भावंडांना आपल्या घरी घेऊन येतो. आता सिन्हा आणि शर्मा एका छताखाली आल्यामुळे भयंकर, अनियंत्रित गोंधळ माजतो. हा गोंधळ कमी करण्यासाठी युग त्यांना आउटहाऊस मध्ये राहण्याची जागा देतो. पण तरीही शांतता मिळत नाहीच. युग आणि कैरी यांच्यात चकमक होतच राहते. कधी खेळकरपणे तर कधी घोटाळा होऊन ते एकमेकांचे कपडे घालतात. नकळत त्यांच्यात एक नाते निर्माण होऊ लागते. त्याच वेळी कैरीचे वडील कुंदन (माधवेंद्र झा) धमकी देऊन जातात की तिच्या भावंडांना ते हिरावून नेतील. युगला नाईलाजाने आपल्या क्लेशदायक भूतकाळाशी सामना करावा लागतो, ज्यामध्ये त्याच्या भावंडांबद्दलचे काही तरी गुपित आहे, खोट्या सह्या केल्याचे प्रकरण आहे आणि लखनौशी संबंधित एक कहाणी आहे. रोमान्स आणि भीती यांची टक्कर होते आणि युग आणि कैरी यांना आपल्या प्रियजनांसाठी काय पणाला लावावे लागणार आहे हा प्रश्न उभा राहतो.


## आज का अंदाज

शनिवार २१ जून २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ७ | ८ | ० |
| १५६ | २३० | १६९ | २३४ | १५७ | २६९ | १२५ | १९० |
| २३७ | ३५७ | २४० | ४५० | ३३७ | २४० | २२४ | २८० |
| ३३६ | १२२ | ३५८ | ३६० | २२९ | ४४९ | ३७८ | ४६० |
| २३ | ५३ | ६४ | ९४ | ३२ | ७१ | ८२ | ०३ |
| २१ | ५१ | ६० | ९० | ३५ | ७३ | ८५ | ०४ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३६ | ७८ | ८९ | ०५ |

२१ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०६ | १६ | ४४ | ७७ |
| ०९ | १९ | ४५ | ७५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाजयाकडून मार्गदर्शन आणि आदर मिळाल्याने तुम्ही भारावून जाल. प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांवरील विश्वास आणि प्रेम वाढेल. दारूपासून दूर राहा.

**वृषभ :** आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून चांगली बातमी मिळेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना परदेशात जाण्याचे आमंत्रण मिळेल. प्रगती होईल आणि यशही मिळेल.

**मिथुन :** आज संपत्ती आणि मालमत्तेत वाढ होईल. कामासोबत इतर जबाबदारीमुळे तुम्हाला थकवा जाणवेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल. चैनीच्या वस्तूंवर जास्त पैसे खर्च कराल.

**कर्क :** आज तुम्हाला व्यवसायात किंवा नोकरीत अडथळे येऊ शकतात. कामाच्या ठिकाणी संघर्षानंतर काही यश मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या स्वत:च्या चुकांमुळे तुम्हाला नुकसान सहन करावे लागू शकते.

**सिंह :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे काही प्रमाणात कमी होतील. जवळच्या सहकाजयांशी मतभेद निर्माण होऊ शकतात. काळजीपूर्वक वागा. समन्वय बिघडू देऊ नका.

**कन्या :** आज आरोग्याशी संबंधित समस्या असतील. हाडे, पोट आणि डोळ्यांशी संबंधित आजारांपासून सावधगिरी बाळगा. निष्काळजीपणा गंभीर समस्येला आमंत्रण देऊ शकतो, तब्येतीची काळजी घ्या.

**तुळ :** आज तुम्हाला एखाद्या नको असलेल्या प्रवासाला जावं लागण्याची शक्यता आहे. तुमचे वरिष्ठ जे काही सांगतात ते नेहमी मान्य करा. आज तुमच्या कामात बदल होऊ शकतो.

**वृश्चिक :** आज एखादी अशी घटना घडू शकते ज्यामुळे कामाच्या ठिकाणी तुमचा प्रभाव वाढेल. राजकीय लोकांना उच्चपदस्थ व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळेल. सरकारमधील लोकांशी जवळीक वाढेल.


**धनु :** नोकरीसाठी दिलेल्या मुलाखतीत किंवा परीक्षेत तुम्हाला यश मिळू शकते. तुमच्या कमकुवतपणा सुधारण्याचा प्रयत्न करा. समस्या जास्त वाढू देऊ नका. त्या लवकर सोडवण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** तुमच्या कामात सुरू असलेल्या समस्या सुटतील. प्रगती आणि लाभाचे मार्ग खुले होतील.प्रवासादरम्यान तुम्हाला नवीन मित्र मिळतील. शेतीच्या कामातील अडथळे दूर होतील.

**कुंभ :** अनोळखी व्यक्तीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. कार्यक्षेत्रात प्रगती आणि नफा मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या कामाला सकारात्मक दिशा द्या.

**मीन :** आर्थिक बाबींमध्ये, भांडवली गुंतवणूक इत्यादी काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या. नवीन मालमत्ता खरेदी आणि विक्रीसाठी हा काळ चांगला असेल. पैसे परत मिळण्यास उशीर झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २१४२



**आडवे शब्द :-**

१) हाकलून देणे
७) सद्वर्तनी, शीलयुक्त
१०) वधू
११) गोजी, पाडी
१३) पोळी भाजण्याचे पात्र
१४) पंख
१६) कपाची जोडीदार
१७) धुणे
१९) कावळा
२१) वेल
२३) वकिलीचे प्रमाणपत्र
२६) प्रज्वलित, तापलेले
३०) सुंदर युवती
३२) हिंदीत मोठेपणा
३३) दारुचा एक प्रकार
३४) हावरटपणा
३५) रस्ता, मार्ग
३६) दाभाड, तोंड
३७) जिवलग मित्र
३८) वृद्धत्व
३९) नम्र, वाकलेला
४०) बालक, मूल
४१) नाग
४२) जैन साधु
४४) दहा
४६) दया, कीव
४८) रवाळ
५०) सेवक
५१) रम्य
५४) चिमण्यांचा मंजूळ आवाज
५७) मेंढा, अज
६०) मज्जाव
६२) अन्न जळू लागणे
६३) चरण
६४) अपमान
६६) गुणाकार
६७) वेदनेची उसळी
६८) गणपती
७०) गाय
७१) बायको
७३) किंमत
७५) पुष्परस
७६) मृत्तिका पात्र
७९) माशी
८०) रविवासर
८१) शपथ
८२) सडपातळ

**उभे शब्द :-**

२) कानाजवळचा भाग
३) बारीक केस
४) कसोटी, चाचणी
५) टरफल
६) मुख
७) चंद्र
८) सत्ता
९) बारा वर्षाचा काळ
११) अरण्य
१२) वड
१५) पंचवीसाव्या वर्धापन दिवसाचा सण
१८) लसुणाची पाकळी
२०) पुष्कळ
२२) धुंद, मस्त, जहाजातून आणलेला माल
२४) ओलसर हवा
२५) मनसोक्त
२७) फळांपासून केलेले पेय
२८) रक्तवाहिनी
२९) खाऱ्या पाण्याचा समुद्र
३१) चामखीळ
३५) स्तुती
३६) पिता, सीतेचे वडील
३७) पचपचीत
४०) माराची उमटलेली खूण
४३) क्वचित
४५) मंदवासर
४६) कौशल्य
४७) चकणी
४९) कीर्ती, आवाज
५२) बंदी
५३) जावळा
५५) चिकटणारा, लगटणारा
५६) फुटपाथवरील छोटेसे दुकान
५८) ललाट
५९) अभिप्राय
६१) अनेक प्रकार
६४) सुरुवातीला, प्रथम
६५) गुप्तपणे शत्रुची माहिती काढणारा
६६) धरणे, स्वयंपाक घरातील एक चिमटा प्रकार
६७) युक्ती
६९) एक शब्दालंकार
७२) प्रवेशकर
७४) सूर्याचे एक नाव
७५) करपलेला भाग
७७) कुंतल
७८) दोन मैलाचे अंतर

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी कचरा व्यवस्थापन

**अमरावती :** शहरात स्वच्छतेसाठी महानगरपालिका विविध उपक्रम राबवत आहे. यात नियमित साफसफाई, कचरा व्यवस्थापनासह जनजागृतीचा समावेश आहे. शहरात स्वच्छतेसाठी महानगरपालिकेच्या वतीने केली जाणारी कार्यवाही जसे की, शहरातून कचरा नियमितपणे उचलणे. कचरा वर्गीकरण आणि पुनर्वापर प्रकल्प. कचरा प्रक्रिया केंद्र (वेस्ट प्रोसेसिंग प्लॅन्ट) उभारणे, ठरलेल्या वेळेत आणि मुख्य ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवणे, नागरिकांचा सहभाग घेणे, स्वच्छता विषयक जनजागृती कार्यक्रम, कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरणे, कचरा जाळणे किंवा खत बनवणे, कचरा साठवणुकीसाठी योग्य व्यवस्था करणे, सार्वजनिक ठिकाणी, उद्यानांमध्ये स्वच्छता ठेवणे, शौचालये स्वच्छ ठेवणे, पावसाळ्यात विशेष स्वच्छता मोहिम राबवणे, या सार्वत्रिक प्रयत्नांमुळे अमरावती शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असून प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाल्याचे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले.

स्वच्छतेबाबत कुणीही तडजोड करता कामा नये. शिवाय, सार्वजनिक स्वच्छता केवळ महापालिकेची जबाबदारी असल्याची मानसिकताही बदलण्याची गरज आहे. आपले शहर स्वच्छ असावे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. याबाबत सकारात्मक मानसिकता नागरिकांमध्ये तयार होण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांनी केले. स्वच्छता अभियानात नागरिकांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे. स्वच्छता राखण्यासाठी नियमांचे पालन करणे. आपल्या परिसरातील स्वच्छता जपण्याची जबाबदारी नागरिकांनी घेणे. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेबाबत संकल्प करावा, असे आवाहनही महानगरपालिका अतिरिक्त आयुक्तांनी केले आहे. प्रभाग क्रमांक २२ नवी वस्ती अंतर्गत येणाऱ्या मिलचाल येथे धुवारणी करण्यात आली. पुर्व झोन क्र. ३ अंतर्गत गगलानी नगर प्लॉट नं. ६४ तुळजा भवानी मंदिर परिसरातील कचऱ्याचे ढिग उचलण्याची कार्यवाही करण्यात आली. कामगारांसोबत संवाद प्रभाग क्रमांक १३ अंबापेठ येथे एसबीएम अंतर्गत क्षमता बांधणी कामकाज करणाऱ्या फीडबॅक फाउंडेशनच्या सदस्यांनी हजेरी स्थळी कामगारांसोबत संवाद साधून त्यांना काम करताना येणाऱ्या अडचणीचे निराकरण केले. तसेच त्यांचे काम करण्याच्या पद्धतीविषयी माहिती जाणून घेतली. त्यांना फिल्डवर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. यावेळी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधवब, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, एसबीएम समन्वयक श्वेता बोके तसेच स्वास्थ निरीक्षक, बिटप्यून व मनपा तसेच कंत्राटदार यांचे सफाई कामगार उपस्थित होते.


## 'स्टॉप डायरिया' अभियानाला सुरुवात

**अमरावती:** राज्यात २ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येत असून, या अभियानाचा शुभारंभ जिल्ह्यातील नांदगावपेठ ग्रामपंचायतीमध्ये झाला. या मोहिमेचे अंतिम ध्येय अतिसारामुळे होणारे बालमृत्यू 'शून्यावर' आणणे हे आहे. 'अतिसारावर करा मात, स्वच्छता आणि ओआरएसची घेवूनी साथ' हे या अभियानाचे घोषवाक्य आहे. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहा राऊत, मंगला मोहोड, विस्तार अधिकारी श्रीमती लकडे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वनिता शिंदे तसेच आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पालकवर्ग, ग्रामसदस्य आणि आरोग्य कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आशा सेविकांनी ओआरएस (जठड) द्रावण कसे बनवायचे आणि हात कसे धुवायचे याचे प्रात्यक्षिक दाखविले, ज्यामुळे उपस्थित लोकांना अतिसार प्रतिबंधाचे सोपे आणि प्रभावी उपाय समजले. डॉ. प्रवीण पारिसे म्हणाले, 'स्टॉप डायरिया' अभियानात आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, पंचायत विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग यांसारखे विविध शासकीय विभाग सहभागी आहेत. ० ते ५ वयोगटातील बालकांच्या एकूण मृत्यूंपैकी ४.८ टक्के मृत्यू हे अतिसारामुळे होतात. अतिसाराची लक्षणे दिसताच, ओआरएस, झिंक गोळ्या किंवा घरगुती पेये वापरून आपण त्यावर सहज उपचार करू शकतो आणि बालमृत्यू रोखू शकतो. अभियानातंर्गत आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन अतिसाराने ग्रस्त असलेल्या बालकांना ओआरएस आणि झिंक गोळ्यांचे वाटप करतील. गरजेनुसार त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात संदर्भीत केले जाईल. तसेच, लोकांना ओआरएस बनवण्याची आणि हात धुण्याची योग्य पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे शिकविली जाईल. 'स्टॉप डायरिया' अभियान २०२५ जिल्ह्यात दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. टप्पा-१मध्ये २ ते १५ जून २०२५ या दरम्यान मोहिमेचे नियोजन, विविध विभागांमध्ये समन्वय, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, जिल्हा व तालुका कृती दलाची स्थापना, आयईसी आराखडा निश्चित करणे आणि ओआरएस व झिंक गोळ्यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची खात्री करणे या बाबींचा समावेश आहे. टप्पा-२अंतर्गत१६ जून २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत निव्वळ स्तनपानास प्रोत्साहन, रोटा व्हायरस लसीकरण, हातांची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची व्यवस्था, ओआरएस आणि झिंकचे वितरण, सर्व आरोग्य संस्था आणि अंगणवाड्यांमध्ये ओआरएस-झिंक कॉर्नरची स्थापना आणि अतिसारावरील उपचार यावर भर दिला जाईल.

## डॉ नंदकिशोर पाटील यांच्या 'जल चिकीत्सा' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

### आमदार गजानन लवटे यांच्या हस्ते प्रकाशन

■ **महासागर प्रतिनिधी, अंजनगाव सुर्जी, दि. २० :**
येथील इतिहास लेखक डॉ. नंदकिशोर पाटील यांचे निसर्गोपचार मधील 'जल चिकीत्सा' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन आमदार गजानन लवटे यांच्या हस्ते २१ जुन रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त नगर परिषद मैदानावर सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आले आहे. यावेळी शहरातील विशेष गणमान्य पाहुणे उपस्थित राहणार आहेत. 'जल चिकीत्सा' या पुस्तकात पाण्याद्वारे करण्यात येणाऱ्या विविध उपचार विषयी सविस्तर माहिती लेखकांनी मांडलेली आहे. जल चिकीत्साचा इतिहास, संशोधन, ग्रंथ -पुराण मधील दाखले, पाण्याचे महत्त्व, जल प्रदुषण, उपचार करतांना घ्यायची काळजी आदी सर्व माहिती दिलेली आहे. योग निसर्गोपचार तज्ञ डॉ.




नंदकिशोर पाटील यांनी आपल्या १५ वर्षाच्या अनुभवातून सदर पुस्तकाचे उत्कृष्ट लेखन केले आहे.

पंचमहाभूत मधील जल तत्वाची इत्यंभूत माहिती जनतेपर्यंत पोहुचविण्यासाठी सदर पुस्तकाचे महत्त्वपूर्ण योगदान राहील. जल चिकीत्सा पुस्तक ऑनलाईन अमेझॉन, फ्लिपकार्ट व गुगलव्दारे घरपोहोच मिळवता येते. सकाळी शासकीय योग प्रोटोकॉल नंतर सदर पुस्तकाचे जाहिर प्रकाशन होणार आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डॉ नंदकिशोर पाटील यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

## अमरावती विभागात 'जिवंत सातबारा' मोहिमेला यश
## पालकमंत्री बावनकुळे यांचे कौतुक

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. २० :**
महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केलेल्या 'जिवंत सातबारा' मोहिमेला अमरावती विभागात चांगला प्रतिसाद मिळाला असून, यामुळे मृत खातेदारांच्या वारसांना मोठा दिलासा मिळाला आहे. वारसांची नोंद शेतजमिनीच्या कागदपत्रांमध्ये, विशेषतः सातबारा उताऱ्यावर, वेळेत न झाल्यामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी ही मोहीम अत्यंत प्रभावी ठरली आहे. या यशस्वी उपक्रमाबद्दल सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांनी पालकमंत्री महोदयांचे आभार मानले आहेत.

मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीच्या संदर्भात दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद विहित मुदतीत अधिकार अभिलेखात न झाल्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन श्री. बावनकुळे यांनी संपूर्ण राज्यात 'जिवंत सातबारा' मोहीम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. गावातील सर्व मृत खातेदारांच्या वारसांच्या सातबारातील नोंदीची प्रक्रिया पूर्ण करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. अमरावती विभागात' १०० दिवस कृती आराखडा' कार्यक्रमांतर्गत ही मोहीम अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात आली. प्राप्त आकडेवारीनुसार, अमरावती विभागातील ५६ तालुक्यांमध्ये एकूण ३२ हजार १९५ खातेदार मृत असल्याचे निदर्शनास आले. यापैकी तब्बल १९ हजार १५० वारसांच्या नावे यशस्वीपणे नोंद घेण्यात आली आहे.

अमरावती विभागातील ५६ तालुक्यांमध्ये एकूण ३२ हजार १९५ मृत खातेदार आढळले. २० हजार ५०२ वारस नोंदीसाठी अर्ज दाखल झाले, तर २० हजार ३०१ प्रकरणांवर निर्णय घेण्यात आला.

एकूण २० हजार १९२ फेरफार दाखल झाले, त्यापैकी १९,१५० फेरफार मंजूर झाले, तर केवळ १४३ फेरफार नामंजूर झाले आहेत.

'जिवंत सातबारा' मोहिमेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या कागदपत्रांबाबत समस्या दूर होण्यास मदत होत आहे.

### पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ९६ सुशिक्षित बेरोजगार

### उमेदवारांची विविध पदांवर प्राथमिक निवड

**अमरावती :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने नुकताच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह २) संपन्न झाला. या रोजगार मेळाव्यामध्ये उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऑनलाइन तसेच ऑफलाईन १९० उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी १४० उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन मुलाखती दिल्या. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ९६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. रिम्सचे प्रतिनिधी स्नेहा मुने, टाईम्स ग्रुपचे दिपंषु कोतांगले, एम. के किचन वेअरचे ललित डोले, प्लास्ती सर्जचे सयुजा काळे व जना फायनान्सचे अमोल भूजांडे, जाधव ग्रुप ऑफ कंपनीजचे चंद्रकांत वाघमारे उद्योजक म्हणून उपस्थित होते. मेळाव्यामध्ये सर्व खाजगी आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

## जूनच्या शेवटच्या सप्ताहापर्यंत २०% पेरण्या

**यवतमाळ :** यंदा मान्सून नियोजीत वेळेच्या पुर्वीच हजेरी लावणार हा हवामान खात्याचा अंदाज चुकल्यामुळे अद्याप अनेक तालुक्यांमध्ये जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत केवळ २० टक्के पेरण्या झाल्या आटोपल्या असल्याचे दिसून येत आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास पेरण्या उशीरा होवुन खरिपाच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होण्याची दाट शक्यता जाणकारांकडून वर्तवण्यात येत आहे. मान्सून वेळेपूर्वी दाखल होणार असल्याचा अंदाज सर्वत्र वर्तवण्यात येत असल्याने कृषी विभागाने खरिपाच्या पेरणीचे नियोजन आधीच केले होते. त्यात जिल्ह्यात तब्बल ८ लाख ९७ हजार हेक्टरवर खरिपाची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यात सर्वाधिक ४.९१ लाख हेक्टरवर कपाशी, २.६५ लाख हेक्टरवर सोयाबीन तर १.८ लाख हेक्टरवर तुरीच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. काही दिवस बरसलेल्या या पावसाने उन्हाळी पिकांचे नुकसान झाले होते. त्यानंतर मात्र पाऊस कायम राहुन मान्सून मे महिन्याच्या अखेर हजेरी लावणार असल्याचे सांगण्यात आले. असे असताना पावसाने मात्र जुन महिन्यात दडी मारली. तालुक्यात पाऊसच झाला नसल्याने खरिपाच्या नियोजनाच्या केवळ २०.८ टक्के पेरण्या आतापर्यंत झाल्या आहेत. त्यात ज्वारी, मका असे तृणधान्य ७० हेक्टरवर, तुर, मुग, उडीद असे कडधान्य ३७६१४ हेक्टर, भुईमुग, सुर्यफुल, सोयाबीन असे गळीत धान्य ३२३२६ हेक्टर, कापूस ११९२४६ हेक्टर, ऊस ३४ हेक्टर अशा एकुण १८९२२० हेक्टरवर पेरणी झाली आहे.

## सायकल चालवणाऱ्यांची संख्या वाढीसाठी पंढरपूर वारी



■ **महासागर प्रतिनिधी, आर्णी , दि. २० :**
सायकल चालवणाऱ्यांची संख्या वाढावी व त्याचा प्रसार गावोगावी व्हावी या हेतूने आर्णी सायकलिंग क्लबच्या आयोजित पर्यावरण पूरक व आध्यात्मिक असणारी आर्णी-पंढरपूर सायकल वारी बुधवार, दि. १८ जून रोजी पंढरपूरकडे रवाना झाली. सायकलिंग क्लब हा तालुक्यात पर्यावरण पुरक उपक्रम राबवण्यासाठी नेहमी अग्रेसर राहतो.

दरवर्षी अनेक उपक्रमात पंढरपूर सायकल वारी चा उपक्रम सुध्दा सातत्याने आर्णी सायकलिंग क्लब कडून राबविला जातो. सायकल चालवा, पर्यावरण राखा, प्रदूषण कमी करा, झाडे लावा झाडे जगवा, हा संदेश देत आर्णी सायकलिंग क्लब चे पाच सायकलस्वार सायकलने तर एक पायी पंढरपूरसाठीच रवाना झाले. यामध्ये प्रमोद बुटले, सुनिल जयस्वाल, अमोल देशमुख, सुनिल राणे, सतीश पाचखंडे, शंकर दाभाडकर यांचा समावेश आहे. आर्णी सायकलिंग क्लबचे सदस्य मागील चार वर्षांपासून पर्यावरण वाचवा, प्रदूषण कमी करा, सायकल चालवा आयुष्य सुदृढ करा असा संदेश देत पंढरपूर वारी करीत आहे.

आर्णी ते पंढरपूर असा ४६६ किलोमीटरचा प्रवास करत हे सदस्य ६ जुलै रोजी पंढरपूरला पोहचून विठूरायाचे दर्शन घेणार असल्याची माहिती आर्णी सायकलिंग क्लब ने दिव्य मराठीला दिली आहे. पंढरपूर वारीकरिता सदस्यांना रवाना करताना यावेळी हरिओमसिंह बघेल, रणजित राठोड, विठ्ठल देशमुख, अमोल बेलगमवार, हरिष राठोड, संतोष नालमवार, प्रविण मुंदूलवार, राजू पाचखंडे, अभिजीत अंदूरे, बळीराम खरडे, विलास वातिले, विजय रावते, रविन्द्र जगताप, अमोल देशमुख, नवनीत दाभाडकर, गुड्डू काकाणी, विनोद चव्हाण, राजू नालमवार, श्रीपाल कोठारी, अमोल दूदलवार, गजू तायडे, प्रविण येरावार, राजेश बोंमपील-वार, आदी सदस्य उपस्थित होते.

> पंढरपुर वारीकरिता आर्णी सायकलिंग क्लबचे पाच सदस्य सायकलने वारी ला गेलेले आहेत. पंढरपूर येथे पहिल्यांदाच सायकल रिंगण होणार आहे. येथेच सायकल संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यात सहभागी होण्यासाठी आर्णी सायकलिंग क्लब चे सदस्य या वारी करिता गेलेले आहेत. आर्णी सायकल चालवा प्रदुषण टाळा, पर्यावरण संवर्धन या संकल्पनेचा पसार आणी प्रचार हा मुख्य उद्देश या पंढरपूर वारी मधुन साधल्या जाणार आहे..
>
> **संदिप ढोले, अध्यक्ष, आर्णी सायकलिंग क्लब**

## पिंपळनेरात वन बीज लागवड
### ग्रामीण मुक्ती संस्थेचा उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी, आर्णी , दि. २० :** ग्रामीण समस्या मुक्ती संस्था, यवतमाळ यांच्या वतीने, आर्णी तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भाग असलेल्या पिंपळनेर येथे सोमवार, दि. १६ जून रोजी वन बीज लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने वन बीज लागवड करण्यात आली. यावेळी प्रकल्प समन्वयक मोहन जाधव मार्गदर्शन केले. संस्थेद्वारे जिल्हयातील २२० सामूहिक वन हक्क प्राप्त गावात शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा प्रकल्प राबवला जात आहे.



निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान आयुष्यात १०० झाडे लावायला पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्यामुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट या संस्थे अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

पर्यावरण सप्ताह वन बीज लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे त्यात हवा पाणी जमीन जंगल आणि सर्व सजीवांचा समावेश आहे. असे प्राणी पक्षी नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करून आपल्या उपयोगिता कशा वाढवू शकतो. वन बीज बियाण्यांचे महत्त्व यावेळी नागरिकांना पटवून देण्यात आले. जसे की, बिबा हे एक औषधी असून याचा उपयोग गंभीर आजारासाठी होतो. संचालन व प्रास्ताविक अक्षय कुमरे यांनी केले. तर आभार म गेश नेवारे व सतीश राठोड यांनी मानले. यावेळी सरपंच संगीता खडसे, वन समितीचे अध्यक्ष खंडू वाघमारे, सचिव रिता ईगळे, खजिनदार मंदा इंगळे, पोलिस पाटील सोनाली ईगळे, अजय खडसे, लोणबेहळचे सचिव लिगाजी मगाम, दत्तात्रय खडसे, तुकाराम ढोले यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती. कडुलिंब अनेक औषधी कडुलिंब अनेक औषधी करिता वापरले जातात.

## मातोश्री वृद्धाश्रमात वृक्षारोपणासह मनसैनिकांकडून अन्नदान वितरण

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती , दि. २० :**
अमरावती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस जिल्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. स्थानिक मातोश्री वृद्धाश्रमात जिल्ह्यातील मनसैनिकांनी एकत्र येऊन वृद्धांना अन्नदान करत वृद्धाश्रमाच्या परिसरात वृक्षारोपण केले. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी नेहमीच समाजकारणाला प्रथम प्राधान्य देण्याची शिकवण दिली. त्याअनुषंगाने आम्ही त्यांचा वाढदिवस साजरा केल्याची भावना मनसेचे जिल्हाध्यक्ष राज पाटील यांनी व्यक्त केली.



राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी मातोश्री वृद्धाश्रमात एकत्र आले. त्यांनी मातोश्री वृद्धाश्रमाच्या परिसरात विविध वृक्षांची रोपे लावून तसेच त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. सामाजिक उपक्रमांची रेलचेल सुरू ठेवून समाजात पक्ष वाढवण्याचा देखील निर्धार केला. या वेळी वृद्धाश्रमाचे अध्यक्ष राष्ट्रपती उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक सुखदेव राऊत यांनी देखील राज ठाकरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन आजच्या राजकारणात राज ठाकरे यांच्यासारख्या कणखर नेतृत्वाची गरज समाजाला असल्याची भावना व्यक्त केली.



त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आशीर्वाद दिलेत. या वेळी प्रसिद्ध चित्रकार तथा प्राचार्य विजय राऊत तसेच मनसेचे जिल्हाध्यक्ष राज पाटील, जनहित संघटनेचे संघटक प्रवीण डांगे, मनसे उपजिल्हाध्यक्ष गजानन काजे, नितीन लुंगे, तालुकाध्यक्ष मनोज तायडे, कामगार सेना प्रमुख विकी थेटे, अक्षय काजे, नीलेश मुधोळकर, दिलीप नवलकर, प्रशांत देशमुख, प्रथमेश राऊत, सतीश शिरभाते, विजय साखरे, सचिन बावनेर, विशाल वर्हेकर, प्रणव देशमुख, विशाल शिरभाते आदी मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कचरा कुंडी गायब झाल्याने दुर्गंधी नागरिकांना त्रास

**दिग्रस :** शहरात नगर पालिकेच्या वतीने मुख्य चौकासह इतरही ठिकाणी लोखंडी कचरा कुंडी अस्तित्वात होत्या. त्या कचरा कुंडी गायब झाल्यामुळे दिग्रस शहरात शहरात दुर्गंधी सुटली आहे. त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. त्या ठिकाणी गोळा असलेला कचरा मोकाट जनावरे, कुत्रे त्यामधील अन्न शोधताना कचऱ्याची अस्ताव्यस्त होऊन कचरा सर्वत्र पसरत असल्याने आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेक भाजीपाला विक्रेते आपल्या जवळ असलेल्या वेस्टेज भाजीपाला जनावरांसाठी रस्त्यावर फेकून देतात. कधी जनावरे ते खातात तर कधी जनावरे तेथे येतच नसल्याने ते जागीच खराब होतात. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न उद्भवत आहे. हॉटेल चालक तर चक्क रस्त्यावर घाण पाणी फेकताना नागरिक उघड्या डोळ्यांनी बघत आहे. पोलिस वसाहतीजवळ तर नगर पालिकेच्या वतीने या ठिकाणी कोणी कचरा व घाण टाकून परिसर अस्वच्छ केल्यास रुपये ५ हजार ते २५ हजार रुपये पर्यंत दंड आकारण्यात येईल असे फलक असलेल्याच ठिकाणी कचरा व घाण टाकून परिसर अस्वच्छ केल्या जात आहे. परंतु त्या ठिकाणी परिसर अस्वच्छ करणाऱ्यांवर आतापर्यंत कोणताच दंड नगर पालिकेच्या वतीने ठोठावलेला नाही.


## कार्यालय नगरपरिषद रामटेक जिल्हा नागपुर

**Email id m.c.ramtek@gmail.com**

मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक जि-नागपुर यांचे वतीने वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान रामटेक नगरपालिका क्षेत्रातील स्विमिंग पुलचे उर्वरित कामे करणे द्वितीय वेळ या कामासाठी ई-निविदा ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. निविदेसंबंधी सविस्तर माहिती, निविदा प्रपत्र किंमत, अनामत रक्कम, अटी व शर्ती व लागू असल्यास पुढील शुद्धीपत्रके ही http://mahatenders.gov.in संकेत स्थळावरच दिनांक २०/०६/२०२५ ला सकाळी १0.00 वाजेपासून उपलब्ध आहेत.

स्वा/-
मुख्य अधिकारी
नगरपरिषद, रामटेक

### Change Of Name

MY OLD NAME WAS **SHAIKH MOHAMMAD SAJJAD HARUN.** NOW MY NEW NAME IS **SHAIKMOHHAMMAD SAJJAD HAROON.**
**ADD :** PLOT NO 49 NEAR ASHARFIYA MASJID KORADI ROAD SMURTI NAGAR NAGPUR 441111

MY OLD NAME WAS **JAIBUNISA BEGUM JAKAULLA KHA.** NOW MY NEW NAME IS **JAIBUNISA KHANAM MOHAMAD FAIM.**
**ADD :** WARD NO. 6, HINGANGHAT FAIL PULGAON WARDHA - 442302

MY OLD PASSPORT NO. **S1042772.** MY OLD NAME WAS **NADEEM AHMAD.** NOW MY NEW NAME IS **NADEEM AHMAD MATEEN AHMAD.**
**ADD :** TAJPURA WARD UMARKHED DISTRICT YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **NAZIA TABASSUM/ NAZIA TABASSUM MOHAMMAD IRSHAD SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **NAZIA TABASSUM MOHAMMAD IRSHAD.**
**ADD :** NEAR WATER TANK GANDHIBAGH NAGPUR 440032

MY OLD NAME WAS **MOHAMMAD IRSHAD SHEIKH / MOHAMMAD IRSHAD SHEIKH MOHAMMAD SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD IRSHAD PARVEZ.**
**ADD :** PLOT NO, 1064, NEAR WATER TANK GANDHIBAGH NAGPUR 440032

MY OLD NAME WAS **MEHMOODA BANO MAHAMMAD ISRAIL.** NOW MY NEW NAME IS **MAHEMUDA PARVEEN SHAKIL KHAN.**
**ADD :** PLOT NO.25, BANDE NAWAZ NAGAR , UPPALWADI , NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **AASTHA MAHESHKUMAR BATRA.** NOW MY NEW NAME IS **AASTHA MAHESH BATRA.**
**ADD :** BATRA BHAVAN, SUBNIS PLOT, RUKHMINI NAGAR NAGPUR 444606.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SHAKEEL.** NOW MY NEW NAME IS **SHAKIL SALIM HASMI.**
**ADD :** PLOT NO.21/A GROUP SHIV NAGAR WAJRA LAYOUT NAGPUR.
PASSPORT NO. **N6565590.**


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अरण्यऋषी!



**मराठी भाषेला शब्दांची देणगी**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजी शब्दांना मराठीत दिलेले पर्यायी शब्द आज रुळलेत. तसेच कार्य जंगलाच्या बाबतीत मारुती चितमपल्ली यांनीही करून ठेवले आहे. अरण्य आणि त्याभोवताल विणल्या गेलेल्या विश्वातील कितीतरी घटकांना चितमपल्ली यांनी आपल्या शब्दांमध्ये गुंफले आहे.

पक्षी असोत? की वनस्पती, कितीतरी नवी नावे केवळ त्यांच्यामुळे मराठी साहित्यात नोंदली गेली आहेत. या मूळ तेलगू भाषिक माणसाने मराठीला सुमारे एक लाख शब्दांचा खजिना उपलब्ध करून दिला आहे. चितमपल्लींनी पक्षिशास्त्रातील अनेक संज्ञांचे मराठी नामकरण केले आहे. जसे कावळ्यांच्या वसाहतीला इंग्रजीत रूकरी असा शब्द आहे. चितमपल्लींनी त्यासाठी काकागार हा शब्द योजला. तसेच हेरॉनरी (बगळे, ढोकरी ह्या पक्ष्यांची वीण वसाहत) ला सारंगागार असा समर्पक शब्द मराठीत तयार केला आहे. रूस्टिंग प्लेससाठी रातनिवारा हा शब्द वापरला आहे. टणटणी (घाणेरी) चे रायमुनिआ (हिंदीभाषक) तर बहाव्याचे अमलताश हे नाव चितमपल्लींमुळे नागरी वाचकांस माहित झाले.

**संशोधन आणि संस्थांमधील सहभाग**

मारुती चितमपल्ली यांनी वने, वन्यप्राणी, वन्यजीव व्यवस्थापन, आणि पक्षि जगताविषयी उल्लेखनीय संशोधन केले; आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि निबंधवाचन केले.

सेवाकाळात आणि निवृत्तीनंतर अनेक संस्था, समित्या यांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. राज्य वन्यजीव संरक्षण सल्लागार समिती, मराठी अभ्यासक्रम समिती (औरंगाबाद) चे ते सदस्य होते. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचेही ते संचालक होते.

**वन्यजीव लेखन**

मारुती चितमपल्ली यांना त्यांच्या निसर्ग क्षेत्रातील अभ्यासामुळेच पक्षितज्ज्ञ व निसर्गलेखक ही ओळख मिळाली. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली.

**पुरस्कार आणि सन्मान**

पद्मश्री (२०२५)
मारुती चितमपल्ली यांना भारती विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार मिळाला आहे.
नागपूरच्या सिटिझन्स फोरमचा नागभूषण पुरस्कार (२००८)
एस.डी. पाटील ट्रस्टचा ह्रखासदार एस.डी. पाटील समाजसेवक पुरस्कारह्ल (२०१२)
त्यांना सहकारमहर्षी (कै) शंकरराव मोहिते पाटील प्रतिष्ठानचा सहकार महर्षी साहित्य पुरकारही मिळाला आहे.
रानवाटा (१९९१) - ह्या पुस्तकाला ९१-९२ सालचा उत्कृष्ट साहित्यानिर्मितीचा राज्य पुरस्कार, भैरू रतन दमाणी साहित्य पुरस्कार व मृण्मयी साहित्य पुरस्कार मिळालेले आहेत. १९९३ साली या पुस्तकाची आकाशवाणी पुणे केंद्रावर वाचण्यासाठी निवड झाली होती तसेच पाठ्यपुस्तकात देखील यातील अरणी ही कथा होती.
पुण्याची ॲडव्हेंचर फाउंडेशन ही संस्था २००६पासून निसर्ग संशोधनाचे किंवा निसर्ग संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्तीला 'मारुती चितमपल्ली' यांच्या नावाचा निसर्गमित्र पुरस्कार देते.
इ.स.२००६ मध्ये सोलापूरला झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद
महाराष्ट्र राज्याच्या मराठी विभागाकडून दिलेला विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (२०१७)
१२व्या किर्लोस्कर चित्रपट महोत्सवाचा जीवनगौरव पुरस्कार (८-१-२०१८)

**चितमपल्ली यांनी लिहिलेली पुस्तके**

आनंददायी बगळे (संस्कृत साहित्यातील काही पक्षी), (२००२)
चकवाचांदण : एक वनोपनिषद, (आत्मचरित्र)
रातवा, (१९९३), (१९९३-९४चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार)
नवेगाव बांधचे दिवस
आपल्या भारताचे साप
केशराचा पाऊस
घरट्यापलीकडे, (१९९५)
चित्रग्रीव - एका कबुतराची कथा
चैत्रपालवी, (२००४)
जंगलाची दुनिया (२००६)
निळावंती, (२००२)
निसर्गवाचन
पक्षिकोश, (२००२)
पक्षी जाय दिगंतरा, (१९८३)
मृगपक्षिशास्त्र, (१९९३)
शब्दांचं धन, (१९९३)
सुवर्णगरुड, (२०००)
रानवाटा, (१९९१), (१९९१-९२चा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार), (भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार-१९९१), (मृण्मयी साहित्य पुरस्कार-१९९१)
जंगलाचं देणं, (१९८५) (महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार प्राप्त-१९८९), (विदर्भ साहित्य संघ पुरस्कार-१९९१)श
आगामी
मत्स्यकोश, वृक्षकोश, वृक्षायुर्वेद, वगैरे

उत्तरार्ध

## मारुती चितमपल्ली यांची खास वाक्ये

- निसर्ग हा पुस्तकापेक्षा मोठा गुरू आहे, तो रोज शिकवतो आणि रोज नव्याने समजतो.
- पक्ष्यांच्या किलबिलाटात माणसाने शांत राहायला शिकावं.
- माणसाने निसर्गाकडे पाहण्याची नजर बदलली, की तो देवाकडेही नव्यानं पाहू लागतो.
- शिकारीची नशा हे एक वेड आहे; पण वन्यजीव पाहण्याचं वेड म्हणजे शुद्ध आनंद आहे.
- पानगळ म्हणजे झाडाची वृत्ती – जुनं झडून नवं उगमायला तयार होणं.
- मी जंगलात गेलो की, मला माज्या आतल्या माणसाचा आवाज ऐकू येतो.
- माणसाला माणूस बनवायला शहर नाही लागत, जंगल पुरेसं असतं.

# शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज!





ज्या अजित पवार यांनी शिवसेनेतून बंडखोरी करणारे कधीही निवडून येत नाहीत, असे राणा भीमदेवी थाटात विधानसभा सभागृहात सांगितले आणि ज्या एकनाथ शिंदे यांच्या साथीदारांनी अजित पवार यांच्या बद्दल तक्रारी केल्या होत्या त्याच अजितदादांच्या नेतृत्वाखाली शरद पवार यांच्या पक्षातून बंड करीत फडणवीस शिंदे सरकार मध्ये जाऊन बसले.

१३ मे २०२२ रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने तयार झालेल्या धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे चित्रपटाचे उद्घाटन केले आणि २० मे २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांना विचारले की, एकनाथ, तुम्हाला मुख्यमंत्री व्हायचंय का ? तेंव्हा ते एकदम आश्चर्यचकित होत नाही नाही असे म्हणू लागले.

उद्धव ठाकरेंनी माज्यावर, माज्या मुलावर उपकार केले आहेत, मी त्या उपकारांची परतफेड करु शकत नाही, असे ठासून सांगितले. पण त्यांचे तर ठरलेलेच होते. त्याबरहुकूम पुढच्या चाली खेळल्या गेल्या. ५ डिसेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री पदावरुन उपमुख्यमंत्री पदावर यावे लागले आणि पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार मध्ये नाखुशीनेच जावे लागले.

पुन्हा अजित पवार यांच्या कडून तुटपुंज्या निधीवर बोळवण होऊ लागली. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. पण शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नांवाने शिव्याशाप देण्याची अहमहमिका लागली. बाळासाहेब ठाकरे असते तर त्यांनी उद्धव ठाकरे यांना माफ केले नसते, त्यांनी कधी कॉंग्रेस बरोबर जाण्याचे धाडस केले नसते, अशा वल्गना केल्या आहेत.

इतकेच नव्हे तर धर्मवीर २ च्या माध्यमातून धर्मवीर आनंद दिघे यांच्या सांगण्यावरून शिवसेना फोडली, असे भासविण्याचा, संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. राज ठाकरे यांनी स्वतंत्र संघटना काढली, एकनाथ, तू काय करणार आहेस? असे आनंद दिघे यांनी सांगतांनाच एका खांद्यावर हिंदुत्व आणि एका खांद्यावर शिवसेना घेऊन तू वाटचाल कर, असा जणू आदेशच दिघेसाहेबांनी आपल्या पट्टशिष्य म्हणवणाऱ्या एकनाथ शिंदे यांना दिला असल्याचा देखावा धर्मवीर २ मध्ये उभा केला आहे. प्रत्यक्षात आनंद दिघे काय होते? त्यांचे तत्त्व काय होते? बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची वाटचाल कशी झाली? २००२ साली नरेंद्र मोदी यांच्यावर बाळासाहेब ठाकरे यांनी अडवाणी यांच्या माध्यमातून अटलबिहारी वाजपेयी यांच्याकरवी होणारी कारवाई रोखायला लावून नरेंद्र मोदी यांना वाचविले.

६ एप्रिल १९८० रोजी स्थापन झालेल्या भारतीय जनता पक्षाला बाळासाहेब ठाकरे यांनी वारंवार पाठिंबा देत गगनभरारी घेण्यासाठी सहकार्य केले. दिल्लीत भाजप शिवसेना आणि महाराष्ट्रात शिवसेना भाजप असे बाळासाहेब ठाकरे यांनी ठासून सांगितले होते. या उपकाराची कोणत्या पद्धतीने परतफेड होत आहे, हे देशवासिय जाणून आहेत.

आज वाजपेयी अडवाणी यांचा भाजप राहिलेला नाही. या संदर्भात शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज आज निर्माण झाली आहे. ज्यांनी कधी मातोश्रीचा उंबरठा पाहिला नाही, ज्यांनी कधी आनंद दिघे यांना पाहिले नाही, ते आता त्यांची मोठमोठाली छायाचित्रे लावून प्रचार प्रसार करण्याच्या गोष्टी करीत आहेत.


वारंवार शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसणारे उद्धव ठाकरे यांच्यावर धोका दिल्याचा आरोप करताहेत. परंतु १९६६ चा व बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी भारलेला, भारावलेला हिंदू, मराठी माणूस कडवा शिवसैनिक हे कधी सहन करणार नाही. योग्यवेळी योग्य निर्णय घेणारच. सध्या सत्ताधारी उपभोगताहेत आणि सर्वसामान्य मराठी, हिंदू भोग भोगतोय. हेही दिवस निघून जातील. कुणीही अमरपट्टा घेऊन आलेला नाही. तूर्तास इतकेच ! जय महाराष्ट्र !!

उत्तरार्ध



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

बाजपाईजी, नरेंद्र मोदी को हाथ मत लगावो, मोदीको मत हटावो, मोदी गया तो समझो गुजरातसे बीजेपी गया !‛ आशा सुस्पष्ट शब्दांत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी लालकृष्ण अडवाणी यांच्या मार्फत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना निरोप दिला. २००२ साली आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना वाचविले. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे हे विधान आजही गुजरातच्या प्रत्येक निवडणुकीत ऐकविण्यात येते. त्याची परतफेड श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना फोडून करताहेत काय ? असा संतप्त सवाल हिंदुस्थानातील तमाम हिंदु बांधव, मराठी माणूस आणि शिवसेनाप्रेमी जनता करीत आहे.



# मन:शांती आणि निरोगी जीवन देणारी योगविद्या!



**सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर.**
**९९७५५३६९०३**

विसाव्या शतकाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेतील सर्वधर्म परिषदेत सहभाग घेऊन भारतीय तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांची दिव्य गुढी उभारून भारताच्या गौरवशाली आणि वैभवशाली संस्कृतीची खरीखुरी ओळख संपूर्ण जगाला करून दिली.

आपल्या याच गौरवशाली आणि वैभवशाली संस्कृतीचा भाग असलेल्या योगशास्त्राचे महत्त्व जगभरातील इतर देशांना आता पटलेले आहे. २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. गेली १ वर्षाहून अधिक काळ कोरोनामुळे संपूर्ण जगाला ग्रासलेले असताना आयुर्वेद, योग, प्राणायाम यांचा अवलंब केल्याने अनेकांना कोरोनावर मात करता आली. योगाचे असंख्य फायदे असून मनःशांती आणि निरोगी जीवन देणाऱ्या योगविद्येविषयी या लेखात थोडक्यात पाहूया.

**जगाला मनःशांती आणि व्याधीमुक्त जीवन प्रदान करणारी योगविद्या!**

भारतीय ऋषिमुनींच्या दैवी चिंतनातून, आत्मसाक्षात्कारातून आविष्कृत झालेली ही योगविद्या म्हणजे कोणताही धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद न करता संपूर्ण मानवजातीचे कल्याण इच्छिणारे एक ईश्वरी वरदानच आहे. संसाररूपी भट्टीत पोळलेल्यांना मनःशांती देणारी, व्याधीग्रस्तांना शारीरिक आणि मानसिक तापापासून मुक्त करणारी, योगसाधकांना जीव-शिवाची भेट घडवून आणणारी, मानवाची मोक्षपदाची अंतिम इच्छा पूर्ण करणारी, ही योगविद्या आहे.

आमच्या परोपकारी पूर्वजांनी जगाच्या कल्याणासाठी जतन करून ठेवलेला हा अनमोल खजिना आहे. अशा या अनमोल खजिन्याचे आम्ही वारसदार असून या योगभूमीत आम्ही जन्मलो, हे आमचे सौभाग्य आहे; पण असे असूनही बहुतेक भारतीय आजही योगविद्येपासून दूर राहिले आहेत, हे आमचे दुर्दैव आहे. जगातील इतर राष्ट्रांनी मात्र या योग खजिन्याचा भरपूर लाभ घेतलेला आहे आणि घेत आहेत.

भोगवाद, भौतिकवाद आणि अनेक प्रकारच्या व्याधींनी ग्रस्त असलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांतील जनतेला मनःशांती आणि निरोगी जीवन हवे आहे. यासाठी संपूर्ण जग भारताकडे आशेने पहात आहे; कारण योगविद्येसारखे रामबाण औषध असलेल्या भारताविना अन्य कोणताही देश जगाला मनःशांती आणि व्याधीमुक्त जीवन प्रदान करू शकत नाही.

भारतीय योगविद्येमध्ये एवढे मोठे दिव्य सामर्थ्य आणि क्षमता आहे, याची विदेशी पंडितांनी प्रत्यक्ष अनुभूती अन् प्रचीती घेतलेली आहे.

दुर्बल शरिराची कार्यक्षमता वाढवण्याचे सामर्थ्य योगाभ्यासामध्ये असणे रासायनिक विषारी खते आणि कीटकनाशके फवारून पिकवलेले कडधान्य, फळे, भाजीपाला आदी खाऊन स्वतःचे शरीर कळत-नकळत हळूहळू व्याधीग्रस्त होत चालले आहे. त्यामुळे स्वतःची शारीरिक आणि मानसिक दुर्बलता वाढली आहे, हे बहुतेकांना ठाऊकच नाही.

अशा वेळी ही योगविद्या फारच उपयुक्त ठरते. विषारी द्रव्ये बाहेर टाकून दुर्बल शरिराची कार्यक्षमता वाढवण्याचे सामर्थ्य या योगाभ्यासामध्ये आहे.

शरीर एक पवित्र यज्ञकुंड असून त्याचे पावित्र्य राखणे आवश्यक

स्वतःचे शरीर एक पवित्र यज्ञकुंड आहे. या यज्ञकुंडातील जठराग्नीत मांसाहार, दारू, तंबाखू, फास्ट फूड आदी पदार्थ टाकून (खाऊन) हा पवित्र यज्ञ कोणीही भ्रष्ट करू नये. असे करणाऱ्या व्यक्तींकडून केलेली योगसाधना सफल होत नाही.

मोक्षप्राप्ती हे नरदेहाचे अंतिम ध्येय आहे. परमात्मा परमेश्वराची कृपादृष्टी संपादन करण्यासाठी, मोक्षपदाचा अधिकारी होण्यासाठी योगसाधकाने स्वतःचे आचार, विचार आणि उच्चार यांतून या पवित्र यज्ञकुंडाचे पावित्र्य राखावे.

योगी होऊन परोपकारी आणि पारमार्थिक जीवन जगण्यामध्येच नरजन्माचे सार्थक ह्ययोगह्ल या शब्दाचा भावार्थ ह्यआपल्या आत असलेल्या जीवात्म्याची चराचरात असलेल्या परमात्म्याशी भेट घडवून आणणे, एकरूप होणे किंवा मिलन होणे अथवा समरस होणे, असा आहे.

या सृष्टीतील ८४ लक्ष योनीला (जीवमात्राला) सृष्टीकर्त्या परमेश ?वराकडून ऊर्जा पुरवली जाते. त्यामुळेच तुम्ही-आम्ही सर्व आता या क्षणापर्यंत जिवंत आहोत. या ऊजेर्लाच ह्यजीवात्मा-अंशात्माह्ल म्हणतात. आमच्या भोगवादी वृत्तीमुळे, ह्यमीह्लपणाच्या अहंकारामुळे, भक्तीभावाच्या अभावामुळे आमच्या शरिरातील या दिव्य शक्तीचे, आमच्या देहचालकाचे आम्हाला विस्मरण झालेले असते. योगविद्येच्या माध्यमातून योगसाधकाला ह्यआपण परमात्मा परमेश ?वराचे अंश आहोतह्ल, याचे स्मरण होते. स्वतः प्रकाशित होऊन दुस ?यांनाही प्रकाशित करण्याचे दैवी सामर्थ्य या योगसाधनेमध्ये आहे. भोगी होऊन रोगी जीवन जगण्यापेक्षा, योगी होऊन परोपकारी आणि परमार्थिक जीवन जगण्यामध्येच नरजन्माचे सार्थक आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी योगसाधकाने स्वानुभवी योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगसाधना करावी.

**योग साधनेतूनच आध्यात्मिक दृष्टी आणि राष्ट्रभक्तीने भारावलेले भूमीपुत्र निर्माण होणे**

गौरवशाली, वैभवशाली, सुसंस्कारित, व्याधीमुक्त, आत्मनिर्भर, स्वावलंबी आणि जगद्गुरुपदाला लायक असा भारत घडवायचा असेल, तर त्यासाठी लागणारे सद्गुण, तेजस्वी विचारधारा, देव-धर्म, देश, संस्कृती आस्था, आध्यात्मिक दृष्टी आणि राष्ट्रभक्ती यांनी भारावलेले भूमीपुत्र या योग साधनेतूनच घडणार आहेत.

अशा या शारीरिक आणि मानसिक व्याधीतून मुक्त करणाऱ्या, कोरोनासारख्या विषाणूला यशस्वीपणे प्रतिकार करू शकणाऱ्या, मोक्षप्राप्तीचे ध्येय साध्य करून जीव-शिवाची भेट घडवून आणणाऱ्या, जगद्गुरुपदाची इच्छा पूर्ण करू शकणाऱ्या या सर्वगुणसंपन्न योगविद्येचा देश-विदेशांत निष्काम वृत्तीने प्रसार-प्रचार करणाऱ्या सर्व भारतीय संस्था, योगाचार्य, योग साधक आणि योगकार्यात तन-मन-धनाने योगदान देणारे हितचिंतक यांचे योगदिनानिमित्त अभिनंदन!

# आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.

योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो. योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.

योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे. त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती. आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे. अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात. कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.

अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात. पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.

अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात. परंतू शरीर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे. योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.

आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.

आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.

यामुळे डोक्यावर ताण येणे, डोळे दुखणे, मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो. परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे, व्यायाम करणे, जिमनॅस्टिक किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.

आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु- युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी, साधु-संत, महायोगी, तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची.

परंतु आज वाढते प्रदुषण, धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो. त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे.

भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे. त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.

योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी घर तीथे झाड ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. आरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे.

आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी.

जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे. याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे.

यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे. कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे.

योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे. त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे. कारण आरोग्य हिच संपत्ती हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे. त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी अनमोल रत्न व संजिवनी सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे.

योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा संकल्प करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी, तपस्वी, महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया. जय हिंद!

# राज्यभरातील शाळांची होणार तपासणी

## लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी कठोर उपाययोजना : तक्रार पेटी ठेवणे बंधनकारक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

उन्हाळ्याच्या सुटीनंतर पूर्व विदर्भातील जिल्ह्यात २३ जून पासून शाळा सुरू होणार असून शाळांमध्ये नियमांची अंमलबजावणी केली की नाही? याची झाडाझडती घेण्यात येणार आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या शाळांमध्ये बदलापूर येथील शाळेतील दोन चिमुरड्यांवर झालेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, तक्रार पेटी, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शाळा व्यवस्थापनाने नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास आधी समज देण्यात येणार असून जर अंमलबजावणीकडे शाळेने कानाडोळा केला तर संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा शालेय शिक्षण विभागाने दिला आहे.

काही महिन्यांपूवी राज्यातील बदलापूर येथील एका खासगी शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचाराची घटना घडली होती. या घटनेनंतर महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल करण्यात आला. या प्रकरणातील संशयित आरोपी अक्षय शिंदेचा एनकाऊंटर झाला आणि न्यायालयाने या घटनेवर महायुती सरकारवर ताशेरे ओढले होते.

घटनेची दखल घेत पुन्हा राज्यात अश्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी राज्य शालेय शिक्षण विभागाने कठोर पावले उचलली आहेत.

**अत्याचाराची माहिती पोलिसांना कळवणे बंधनकारक**

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ हा केंद्र शासनाचा कायदा व सदर कायद्याखालील नियमावली केंद्र शासनाने १४ नोव्हेंबर २०१२ पासून लागू केलेली आहे. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी १८ वर्षे वयोगटापर्यंतच्या व्यक्तीस बालक म्हणून समजण्यात आले आहे.

मुलांवर लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती आल्यास संबंधित शैक्षणिक संस्था व्यवस्थापन, शिक्षक व शाळा यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार स्थानिक पोलीस स्टेशन अथवा विशेष किशोर पोलीस पथक यांना कळविणे बंधनकारक असणार आहे.

**विद्यार्थ्यांवर अत्याचार झाल्यास तक्रार करावी**

शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणाऱ्या अत्याचाराची तक्रार पास्को इ-बॉक्स व चिराग या ॲपवर करणे यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे आवश्यक ठरणार आहे.

सर्व शाळा परिसरात कंपाऊंड वॉल, सकाळ, दुपारी व शाळा सुटताना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद घ्यावी, विद्यार्थी अनुपस्थित असल्यास पालकांना मेसेज करावा, विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणे बंधनकारक आहे.

विद्यार्थी ज्या बसमधून ये-जा करणार त्या बसचालकाची पडताळणी, बसमध्ये जीपीएस प्रणाली बसवणे, प्रसाधनगृह व स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता ठेवणे आदी गरजेचे आहे. शिक्षण विभागासह इतरही काही विभाग आता शाळांवर लक्ष ठेवून असतील आणि तपासणी करतील.

# पुण्यात वारकऱ्यांचे आगमन सुरू



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालख्यांच्या प्रस्थानानंतर आता पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांनी पुण्यात दाखल होण्यास सुरुवात केली आहे. पायी वारी करत असलेले हजारो वारकरी शहरातील विविध भागात पोहोचत असून, पुण्यात उत्साहाचे आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

संत तुकाराम महाराजांच्या पालखीच्या आगमनानंतर पिंपरीतील भक्ती-शक्ती चौकात 'अर्थ' आणि 'पिंची' या दोन संस्थांनी स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने ही मोहीम राबवण्यात येत आहे.

वारीनंतर निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा प्रश्न गंभीर असतो, हे लक्षात घेऊन 'स्वच्छता हा खरा धर्म आहे' या संत गाडगे महाराजांच्या तत्त्वाला अनुसरून हा उपक्रम राबवला जात आहे. यामध्ये दोन्ही संस्थांच्या १५० महिला स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

'अर्थ' एनजीओच्या सीईओ प्रविणा कलमे आणि 'पिंची' च्या संस्थापक पूनम परदेशी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'स्वच्छ भारत अभियान'ला सहकार्य करण्याच्या हेतूने तसेच विठोबाप्रती भक्ती आणि सामाजिक जाणिवेची अभिव्यक्ती म्हणून ही मोहीम महत्त्वाची असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. भक्तीसोबत पर्यावरणाची जबाबदारी जपण्याचा संदेशही यातून दिला जात आहे.

# तेजस्वी घोसाळकर यांचा भाजप प्रवेश निश्चित?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :





शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनोद घोसाळकर यांच्या स्नुषा तेजस्वी घोसाळकर यांची मुंबई जिल्हा बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती झाली आहे. त्यामुळे ठाकरे गटावर कथित नाराज तेजस्वी यांचा भाजपमध्ये प्रवेश निश्चित झाल्याचा दावा केला जात आहे.

तेजस्वी घोसाळकर या गत काही महिन्यांपासून ठाकरे गटावर नाराज असल्याची चर्चा आहे. त्यांनी मध्यंतरी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यात त्यांची नाराजी दूर झाल्याचे समजले जात होते.

पण शुक्रवारी अचानक त्यांची मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याने त्या भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा नव्याने सुरू झाली. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवंगत अभिषेक घोसाळकर हे मुंबई बँकेच्या संचालकपदी होते. त्यांच्या जागी आता त्यांच्या पत्नी तेजस्वी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रवीण दरेकर यासंबंधी म्हणाले, अभिषेख घोसाळकर हे मुंबई बँकेचे संचालक होते. त्यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या जागेवर नेमणूक करण्याचा अधिकार संचालक मंडळाला असतो. त्यानुसार सद्भावना म्हणून संचालक मंडळाने एकमताने तेजस्वी घोसाळकर यांची संचालक म्हणून बँकेवर नियुक्ती केली. ही रिक्त जागा भरणे कायदेशीररित्या क्रमप्राप्त होते. त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबै बँक ही मुंबईतील सहकार क्षेत्रातील एक अग्रणी बँक आहे. या बँकेच्या संचालक मंडळावर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आदी विविध पक्षांचे नेते आहेत. पण तेजस्वी घोसाळकर यांची नियुक्ती ऐन मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आल्यामुळे भाजपने तेजस्वी यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांना झटका देण्याची व्युहरचना आखल्याचे स्पष्ट होते.

## अपघातग्रस्त विमानाच्या खरेदीबाबत

# कॅगचा होता आक्षेप

## नाना पटोलेंकडून प्रफुल्ल पटेलांकडे अंगुलीनिर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :



तत्कालिन केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या कार्यकाळात विमानांच्या खरेदीबाबत लेखा व परीक्षण अहवालात आक्षेप घेण्यात आले होते. त्यावेळी खरेदी झालेल्या विमानांपैकी एक विमान अहमदाबादेत दुर्घटनाग्रस्त झाले. केंद्र सरकारने या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

अहमदाबाद येथे झालेल्या विमानाची खरेदी २०११-१२ मध्ये झाली. कॅगने या खरेदीत गडबड असल्याचा ठपका ठेवला होता. कॅगच्या अहवालात प्रफुल्ल पटेल यांच्यावर ताशेरे ओढण्यात आले होते. आता पटेल हे मोदी सरकारसोबत आहेत. विमान अपघाताची जबाबादारी सरकारने घेतली पाहिजे, असेही ते म्हणाले.

पटोले नागपूर पत्रकार क्लब येथे शुक्रवारी बोलत होते. काँग्रेस सरकारच्या काळात रेल्वे अपघात किंवा इतर दुर्घटना घडल्यास राजीनामा मागणारे भाजपचे नेते देशात विमान, हेलिकॉप्टर, रेल्वे, रस्ता अपघात शेकडो लोकांचे प्राण जात आहे. परंतु त्यांची जबाबदारी घेण्यास तयार नाही, असेही ते म्हणाले.

**मतांची चोरी लपवण्यासाठी नियमात बदल**

मतांची चोरी लपावी म्हणून सीसीटीव्ही फुटेज उमेदवारांना उपलब्ध करून देणारा निवडणूक आयोगाच्या नियम क्रमांक ९३ मध्ये बदल करण्यात आला.

केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्य निवडणूक आयोगाला पत्र पाठवून ४५ दिवसांनंतर निवडणूक प्रक्रियेचे संपूर्ण फुटेज नष्ट करण्याचे निर्देश दिले आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

ते म्हणाले, हरियाणा राज्यातील निवडणुकीत गडबड झाल्याचे प्रकरण उच्च न्यायालयात गेले. पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेचे सर्व सीसीटीव्ही फुटेज संबंधितांना उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळे मतांची चोरी उघडकीस येईल म्हणून ही बाब निवडणूक आयोगाने केंद्र सरकारला कळवली. उच्च न्यायालयाच्या निकालास ४८ तास होत नाही तोच केंद्र सरकारने नियम क्रमांक ९३ मध्ये बदल केला.

केंद्र सरकारने निवडणूक आचारसंहितेत बदल करून निवडणुकीची काही कागदपत्रे सार्वजनिक न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कॅमेरा आणि वेबकास्टींग फुटेज सार्वजनिक करण्यास मनाई करण्यात येत आहे.

अशाप्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रातील सरकार आणि निवडणूक आयोगाने लोकशाहीची थट्टा चालवली आहे. मतांची चोरी करायची आणि ती लपवण्याची व्यवस्था केली आहे, असेही ते म्हणाले.

### राज ठाकरे- फडणवीस यांची मिलीभगत

हिंदीची सक्ती ही आगामी महापालिका, नगरपालिका आणि जिल्हापरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय लक्ष विचलित करण्याची योजना आहे, असा आरोप काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची मिलीभगत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

पटोले पुढे बोलताना म्हणाले की, मराठी भाषेची संस्कृती जपलीच पाहिजे. पहिलीपासून विद्यार्थ्यांवर हिंदीचे ओझे नसावेच, याबाबत दुमत नाही; पण हिंदी भाषेचा वाद हा शैक्षणिक मुद्दा न करता त्याला राजकीय स्वरूप देण्यात आले आहे. सरकारने काही दिवसांपूर्वी पहिलीपासून हिंदी अनिवार्य करणार नाही, असे सांगितले; पण मुख्यमंत्र्यांनी राज ठाकरेंची भेट घेताच वादग्रस्त जीआर कसा निघाला? नाना पटोले म्हणाले की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये मतविभाजन करून त्याचा फायदा भाजप व मनसेला व्हावा, हा यामागे हेतू असून मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर, असा प्रकार आहे. या मुद्यामागे महायुती सरकारचे राजकारण असून फडणवीस-राज ठाकरे या दोघांनाही विद्यार्थी शिक्षण व भाषा याबद्दल काहीही देणेघेणे नाही, असेही ते म्हणाले.

## : साप्ताहिक संवाद :
# पहिली पासून हिंदीला विरोधच हवा

लोकरंग

राज्याच्या शिक्षण धोरणाचा एक भाग म्हणून पहिली इयत्तेपासून हिंदी विषय सर्व शाळांमधून सक्तीचा करण्याचा अतार्किक निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी अचानक जाहीर केला आणि लागलीच महाराष्ट्राच्या मायबोली मराठीला दुय्यम लेखून हिंदीला महत्व देणाऱ्या या निर्णयाविरोधात सर्व स्तरातून कडाडून विरोध होऊ लागलेला आहे. सर्व शाळांमधून सक्तीच्या हिंदीच्या या निर्णयाबद्दलच जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**पहिलीपासून हिंदी भाषेला नेमका विरोध का आहे?**

○ महाराष्ट्र वगळता गुजरात,आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, बिहार अशा कोणत्याही राज्यांमध्ये हिंदी भाषेची सक्ती नाही. मग हिंदी हि राष्ट्रभाषा नसताना आणि केवळ एका ठराविक राज्याची भाषा असताना आपल्या मातृभाषेला डावलून हिंदी भाषेलाच सक्ती आणि तीही महाराष्ट्रातच का? हा खरा मार्मिक प्रश्न आहे.

शासन निर्णयामध्ये अनिवार्य हा शब्द वगळण्यात आला आहे म्हणजेच सरकारला छुप्या पद्धतीने हिंदीची सक्ती करायची आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यात पहिलीपासून तिसरी भाषा हिंदी शिकविण्याचा कुठेही उल्लेख नाही. म्हणूनच या धोरणाला सर्वांचा विरोध आहे.

**हिंदी भाषेची सक्ती करण्यामागे राज्याच्या शिक्षण विभागाचा नेमका हेतू काय आहे?**

○ लहान मुले नव्या गोष्टी पटापट शिकतात. विशेषतः नवीन भाषा मुलं अगदी पटकन आत्मसात करतात. मराठी आणि इंग्रजी या माध्यमांच्या खेरीज अन्य म्हणजे उर्दू, कन्नड, गुजराथी, हिंदी आदी माध्यमांच्या विद्यार्थ्यांना पहिलीपासून त्यांची माध्यम भाषा मराठी आणि इंग्रजी या तीन भाषा शिकवल्या जात आहेत. त्यामुळे मराठी आणि इंग्रजी या शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी तिसरी भाषा हिंदी सक्तीने आणली जात आहे. हाच शिक्षण विभागाचा हेतू आहे मात्र तो चुकीचा आहे.

**मातृभाषेतून शिक्षण या सरकारच्या उपक्रमाची हिंदीच्या सक्तीमुळे वाट लागणार का?**

○ नक्कीच. शासनाच्या शिक्षण विभागाने यापूर्वीच विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण हा अभिनव उपक्रम सुरु केला आहे. या शासन निर्णयात एका तुकडीतील किमान २० विद्यार्थ्यांनी इतर भाषेचा पर्याय स्वीकारल्यास ती भाषा शिकवली जाईल, असे म्हटले आहे.

मात्र प्रत्यक्षात राज्यात २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या सहा हजारांच्या घरात आहे. त्यामुळे या सहा हजार शाळांमध्ये हिंदी शिवाय इतर पर्यायी भाषा शिकवली जाणे शक्यच नाही. म्हणजेच मातृभाषेतून शिक्षण या सरकारच्या उपक्रमाला यामुळे हरताळच फसला जाणार आहे.

■ ■ ■

# मिल्टेनी बायोटेक आणि बीआयआरएसीत जीन थेरपी परिसंस्थेकारिता सामंजस्य करार



भारताच्या अत्याधुनिक बायोथेरप्यूटिक्समधील नेतृत्वाला बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मिल्टेनी बायोटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि बायोटेक्नॉलॉजी इंडस्ट्री रिसर्च असिस्टन्स कौन्सिल यांनी इक्ष्ह इंटरनॅशनल कन्व्हेन्शन 2025 दरम्यान एक धोरणात्मक समजुतीचा करारावर स्वाक्षरी केली.

ही परिषद याच आठवड्यात बॉस्टनमध्ये सुरू झाली आहे. यामध्ये बहुआयामी सहकार्याची रूपरेषा मांडण्यात आली आहे, ज्याचा उद्देश भारताच्या सेल आणि जीन थेरपी क्षमतेला पुढे नेणे हा आहे. या सहकार्याच्या माध्यमातून क्षमता निर्माण, क्लिनिकल संशोधनाला चालना देणे आणि स्थानिक पातळीवर सेल थेरपीजचे उत्पादन करून अपूर्ण वैद्यकीय गरजांवर उपाय शोधणे यावर भर दिला जाणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मिल्टेनी बायोटेक इंडिया यांना BIRAC आणि जैवतंत्रज्ञान विभाग यांच्या वरिष्ठ प्रतिनिधींसह इंडिया पॅव्हिलियनचे उद्घाटन करण्याचा सन्मान मिळाला.

या भागीदारीद्वारे, मिल्टेनी बायोटेक आणि BIRAC यांचे उद्दिष्ट CGT उत्पादन, विश्लेषण आणि गुणवत्ता नियंत्रण या क्षेत्रांमध्ये डॉक्टर, संशोधक आणि तंत्रज्ञ यांच्यासाठी संरचित प्रशिक्षण आणि क्षमता-विकास कार्यक्रम राबवून राष्ट्रीय क्षमता निर्माण करणे आणि वैज्ञानिक कौशल्ये विकसित करणे, भारतामध्ये अपूर्ण वैद्यकीय गरजांवर उपाय शोधण्यासाठी, विशेषतः कर्करोग, स्वयंप्रतिरक्षात्मक आजार आणि दुर्मिळ आजारांमध्ये, पुढील पिढीच्या उपचारांवर लक्ष केंद्रित करून शैक्षणिक संस्था आणि मल्टी-सेंटर अभ्यासांचे सह-विकास माध्यमातून ट्रान्सलेशनल रिसर्च उपक्रम विस्तारणे,मिल्टेनीचे क्लिनीएमएसीएस प्रॉडिजी सारखे स्वयंचलित उत्पादन प्लॅटफॉर्म वापरून भारतभर पॉइंट-ऑफ-केअर केंद्रे स्थापन करणे, जेणेकरून वैयक्तिकृत उपचार अधिक किफायतशीर आणि मोठ्या प्रमाणावर सहज उपलब्ध होतील हे आहे.

■ ■ ■

# चला पर्यटनाला किल्ले जयपूर

जयपूर शहर, गुलाबी शहर म्हणून प्रसिद्ध, राजस्थानची राजधानी आहे आणि विविध आकर्षणांसाठी ओळखले जाते. जयपूरच्या दोलायमान शहरामध्ये शाही भव्यता आणि वास्तुशास्त्रीय भव्यतेपासून ते स्ट्रीट फूड आणि रंगीबेरंगी बाजारपेठांपर्यंत अनेक गोष्टी आहेत.

जयगड किल्ला हा जयपूरकडे दुर्लक्ष करणारा सर्वात प्रेक्षणीय किल्ला आहे. जगातील सर्वात मोठी तोफ मानल्या जाणाऱ्या जैवना तोफेसाठी ती प्रसिद्ध आहे. जयगड किल्ला १७२६ मध्ये सवाई जयसिंगने आमेर किल्ल्याच्या संरक्षणासाठी बांधला होता. त्याच्या बिल्डरच्या नावावर, ते म्हणून देखील ओळखले जाते. विजयाचा किल्ला कारण तो कधीही जिंकलेला नाही.

जयगड हे काटेरी झुडपांनी आच्छादलेल्या टेकड्यांमध्ये उभे आहे आणि मुख्य गेट, डुंगर दरवाजापर्यंत जाणारे खडे रस्ते.

हा किल्ला अरवली पर्वत रांगेत चील का तीला (ईगलच्या टेकडी) वर स्थित आहे, माओठा तलाव आणि आमेर किल्ला दिसतो.

दिवा बुर्ज, मध्ययुगीन काळातील एक रचना आणि 'चील का तीला' नावाचा टेहळणी बुरूज हे लोकप्रिय पर्यटन आकर्षणे आहेत जे तुम्हाला संपूर्ण शहराचे विलोभनीय दृश्य देतात.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# विघातक शक्तींचा वारीत हस्तक्षेप?

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लाखो वारकऱ्यांचा समावेश असलेली पंढरपूर वारी सुरू झाली आहे. पण गेल्या काही वर्षांपासून देवाला न मानणाऱ्या नास्तिक संघटनांचे पदाधिकारी-सदस्य, हिंदूंच्या देवी देवतांना शिवीगाळ करणाऱ्या संघटनांचे अनुयायी, लोकायतसारखी नक्षलवादी व्यक्तींना सहकार्य करणारी संस्था व तत्सम संघटना वारीत दाखल होत आहेत. पंढरपूर वारीमध्ये विघातक शक्ती हस्तक्षेप करण्याबाबत पोलिस आयुक्तांना लेखी पत्र तुषार दामगुडे यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना दिले आहे.

दामगुडे म्हणाले, याठिकाणी घडलेला एक हिंसाचार राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर दखलपात्र होऊ शकतो याची पोलिसांनी दखल घ्यावी. पालखी सोहळ्यात पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवावा, अनुचित प्रकार होणार नाही, याकडे लक्ष पुरविण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## राज्य सरकारचा निषेध
# सात हजारांवर शाळांचा वेगळा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

दीर्घ सुट्यांचा आनंद उपभोगून शाळेत येणा?या बालकांना शाळा हवीहवीशी वाटावी, यासाठी नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी ह्यशाळा प्रवेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

मात्र, शिक्षणसंस्थाचालकांच्या मागण्यांकडे राज्य शासने हेतुपुरस्पर सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत विदभार्तील सात हजारांवर शाळांनी ह्यशाळा प्रवेशोत्सवाह्लवर बहिष्कार टाकत २३ जूनपासून शाळा सुरू न करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाह रविंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

शिक्षणसंस्था महामंडळाच्या शाळा न सुरू करण्याचा निर्णय घेत प्रवेशोत्सवावरही बहिष्कार टाकला आहे. त्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे आधीच कळविण्यात आले आहे, असे रविंद्र फडणवीस म्हणाले. या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, शिक्षण विभागाशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न शासनाकडे प्रलंबित असून त्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार आणि निवेदनांद्वारे पाठपुरावा करूनही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.

निवेदनात मालमत्ता करातून शैक्षणिक संस्थांना सूट, अनुदानित शाळांना निवासी वीज दर, सौर ऊर्जा सुविधा विनामूल्य देणे, शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत शाळांना एकदाच कायमस्वरूपी मान्यता देणे, आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूतीर्चे थकीत २४०० कोटी रुपये शासनाने त्वरीत वितरित करणे आणि लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचा?यांची नियुक्ती यांसारख्या मागण्या नमूद करण्यात आल्या आहेत. तसेच, १५ मार्च २०२५ च्या अन्यायकारक संच मान्यतेचा आदेश तातडीने रद्द करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

महामंडळाने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने वेळेत योग्य प्रतिसाद दिला नाही, तर नवीन शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते वर्गशिक्षणापर्यंत सर्व प्रक्रिया रोखण्यात येईल.

# मृत्यूनंतरही भोगाव्या लागताहेत नरक यातना

■ नरेश भार्गव, आष्टी शहीद, दि. २० :

मृत्यूनंतर स्मशानभूमिपर्यंतचा अखेरचा प्रवास सुखकर व्हावा, अशी अपेक्षा तिरडीवरचे कलेवर बाळगत नसले तरी ते घेवून जाणारे मात्र निश्चितच बाळगतात. परंतु, वर्धा जिल्ह्याच्या कारंजा घाडगे तालुक्यातील सुसंद्रा हेटी येथील गावकऱ्यांच्या नशिबी तेही नाही.

पावसाळ्याच्या दिवसात गावात येणारा आणि स्मशानभूमिकडे जाणारा एकमेव मार्ग पाण्याखाली राहत असल्याने मृत्यूनंतरही त्या पार्थिवाची फरफटच होते.

सुसुंद्रा हेटी हे अंदाजे २०० लोकसंख्येचे आदिवासी खेडे गाव आहे. त्या गावांमध्ये जाण्या-येण्याकरिता एकमेव रस्ता असून याच रस्त्याने गावातील जवळपास २५ ते ३० विद्यार्थी जिल्हा परिषद शाळा सुसुंद्रा व संत भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा येथे शिकण्याकरिता येतात. पावसाळ्यातील चार महिन्याच्या कालावधीत फक्त दोनच महिने हे विद्यार्थी शाळेत येऊ शकतात.

शाळेतून परतीच्या वेळेला जर आभाळ किंवा पाऊस आला तर यांना नाल्याचा पूर उतरेपर्यंत तीन-चार तास कधी कधी दिवसभर पूर उतरेपर्यंत सुसुंद्रा येथे थांबावे लागते. मुले घरी येईपर्यंत पालकांच्या जीवात जीव नसतो. त्यांचे सतत शाळेतील शिक्षकाशी संपर्क सुरू असते.


सुसुंद्रा या गावाची स्मशानभूमी याच हेटी रोडवर आहे. पावसाळ्यात अंत्यविधी करताना सर्वांना जीव मुठीत घेऊन रस्ता पार पाडावे लागतात. या दिवसांमध्ये कुणी आपल्या अंतिम प्रवासाला जाऊच नये असे येथील लोकांना मनोमन वाटते. मरणोपरांतही इथला संघर्ष संपत नाही.

यापूर्वी अनेक निवेदने देऊन राज्यकर्त्यांना हा पूल आणि पक्का रस्ता व्हावा अशी सद्बुद्धी सुचली नाही, ही खरी शोकांतिका आहे. येथील ग्रामस्थांनी आशा, अपेक्षा सोडलेल्या आहे. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्नही विचारला जात आहे. शेकडो हेक्टर शेती याच मार्गालगत असल्याने शेतकऱ्यांना मोठा गंभीर प्रश्न असून, जगण्याकरिता आवश्यक असणारे किराणा इतर वस्तू आणणे कठीण झालेले आहे. गरोदर महिलांना चार महिने आधीच माहेरी पाठवावे लागते.



येथे जाण्याकरिता रहदारीचा मार्ग नव्हता, सामाजिक न्याय विभाग व आर्थिक बजेट या हेडमधून सुसंद्रा ते हेटी व आजूबाजुच्या गावाला जोडण्यासाठी रस्ता खडीकरण ते काही भागातील डांबरीकरण व समाज मंदिराकरिता २० लाख, ६० लाख व १५ लाख निधी आमदार असताना मी दिला. परंतु स्मशानभूमीत जाण्याकरिता मध्ये नाला असून, रस्त्याकरिता शासनाकडे जागा नाही. शेतातून जाण्यासाठी मार्ग काढण्याकरिता रस्ता व पूलाचे प्रयोजन होते. परंतु आमच्या कुटुंबाला शासकीय नोकरी द्या, भूसंपादनाचा योग्य मोबदला द्या अशा नानाविध मागण्या गावकऱ्यांकडून पुढे आल्याने हा मार्ग होवू शकला नाही. स्मशानभूमीवर प्रेत नेण्याकरिता आजही नाल्यातून जावे लागते ही विदारक परिस्थिती आहे, शाळकरी मुलांनाही अडचणी आहेत, अशी खंत माजी आमदार तथा विधान परिषद सदस्य दादाराव केचे व माजी जि. प. अध्यक्ष सरिता गाखरे यांनी प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. या संदर्भात उपसरपंच राहूल फुले यांचेशी संपर्क साधला असता त्यांचा भ्रमणध्वनी बंद होता.

महासागर
नागपूर वृत्तसागर
शनिवार, दिनांक २१ जून २०२५



# पावसाळ्यात ग्रामीण भागात जीर्ण घरांना धोका....!!!!

## मातीचे घरे 'जैसे थे', अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी ग्रामस्थांची कसरत

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २० :



प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ग्रामीण भागात घरकुल योजनेची लाभार्थ्यांना लॉटरी लागली आहे. त्यानुसार पावसाळ्यापूर्वी घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याची घाई सुरू आहे. परंतु, मातीचे जुने व जीर्ण घर 'जैसे थे' ठेवण्यात येत असल्याने ही घरे पावसाळ्यात धोकादायक ठरत आहेत. लहान मुले खेळताना भिंती कोसळल्याने जखमी झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावर तातडीने मातीचे निकामी घरे भुईसपाट करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे.

तालुक्यातील अनेक गावात निरूपयोगी असलेले मातीची जीर्ण घरे निदर्शनास येत आहेत. नव्या घरात प्रवेश करूनही अनेकांनी जुनी घरे ठवली तशीच कायम पडून आहेत. पावसाळ्यापूर्वी घरकुलांचे बांधकामाला गती लाभार्थ्यांकडून दिली जात आहे. घरकुल योजनेचा लाभ घेताना बहुतांश लाभार्थ्यांनी जुने मातीची जीर्ण घरे जैसे थे ठेवली आहेत. नव्या घरात प्रवेश केल्यानंतर लाभार्थी जुन्या जीर्ण घराकडे ढुंकूनही पाहत नाही. यानंतर पावसाळ्याचे पाणी जीर्ण घरांचे भिंतीवर कोसळत असल्याने भिंती कोसळत आहेत. ही घरे पावसाळ्यात आणि अन्य ऋतूत धोकादायक ठरत असतात.

यामुळे अशा निरूपयोगी घरांना जमिनदोस्त करणेच गरजेचे आहे. परंतु, अतिवृष्टीमुळे शासनाकडून मिळत असलेला निधी लाटण्यासाठी काही ग्रामस्था असे घर पाडण्याऐवजी साबूत ठेवतात. त्यामुळे धोका होण्याची शक्यता वर्तविली जाते. परिणामी तालुक्यातील ग्राम पंचायत प्रशासनाने या प्रकाराकडे लक्ष देवून गावात जीर्ण घरांचे सर्वेक्षण करावे व धोकादायक असलेली घरे जमिनदोस्त करण्याच्या संबधितांना सुचना देण्यात यावे, अशी मागणी केली जात आहे.

**अतिवृष्टीच्या लाभासाठी खटपट**

पावसाळ्यात दरवर्षी अतिवृष्टी होत असल्याने शासन स्तरावरून घरे आणि भिंती कोसळल्याचे सर्वेक्षणाचे आदेश दिले जात आहेत. भिंती अथवा घरे कोसळल्यास शासन स्तरावरून नुकसान भरपाई दिली जात आहे. एकच भिंतीला अनेक वेळा मदत दिली गेली आहे. घरांच्या चार भिंती असताना चारही भिंतीचे वेगवेगळेः अनुदान लाटण्यात आले आहे.

यामुळे मातीचे मातीचे जीर्ण घरे वास्तव्यास नसताना लाभार्थी भुईसपाट करीत नाहीत. पावसाळ्यात अतिवृष्टीचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची खटपट सुरू झाली आहे. धोकादायक भिंती आणि घरे असताना लाभार्थी मनावर घेत नाही. कुणाचे जीव गेले तरी चालेल, असेच चित्र ग्रामीण भागात दिसून आले आहे.

**तालुक्यातील ग्रामपंचायत सरसावणार काय?**

घरकुल लाभार्थ्यांना योजनेचा लाभ प्राप्त करून देणारी ग्रामपंचायत प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था आहे. गावातील घरकुल बांधकामावर ग्रामपंचायतचे नियंत्रण आहे. जीर्ण आणि धोकादायक घरांचे स्थानिक पातळीवर चौकशी करण्याची जबाबदारी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतची आहे. घरकुल लाभार्थ्यांना जुने जीर्ण घरे भुईसपाट करण्यासाठी पुढाकार घेतले पाहिजे. असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतने दुर्लक्ष केल्यास जीवित हानी नाकारता येणार नाही.

# युको बँकेच्या नवीन शाखेच्या उद्घाटनानिमित्त

## कार्यकारी संचालक विजयकुमार कांबळे यांचा नागपूर दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. २० :



भारत सरकारची आघाडीची बँक असलेल्या युको बँकेचे कार्यकारी संचालक विजयकुमार निवृत्ती कांबळे यांच्या उपस्थितीत युको बँक धरमपेठच्या नवीन शाखेचे उद्घाटन करण्यात आले. युको बँकेचे झोनल प्रमुख आनंद कुमार माहेश्वरी, उपझोनल प्रमुख सौरभ श्रीवास्तव, धरमपेठ शाखा प्रमुख तुषार वंजारी उपस्थित होते.

कांबळे यांनी आपल्या भाषणात धरमपेठ शाखा ही ग्राहकांनी युको बँकेवर दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे वर्णन केले, ज्यामुळे युको बँक आपल्या शाखा विस्तारासह प्रगतीशील प्रगतीच्या मार्गावर पुढे जात आहे. दुसऱ्या एका कार्यक्रमात, कांबळे यांनी युको बँकेच्या नागपूर झोन शाखांच्या शाखा प्रमुख परिषदेचे अध्यक्षपद भूषवले, जिथे युको बँकेच्या नागपूर झोन अंतर्गत येणाऱ्या शाखांचे शाखा प्रमुख उपस्थित होते. नागपूर भेटीदरम्यान, कांबळे यांनी युको बँकेच्या ग्राहकांशी बैठक घेतली आणि मुख्य कार्यालय स्तरावरील मंजुरी दिली.

हे उल्लेखनीय आहे की विजयकुमार कांबळे यांनी ०९ ऑक्टो.२०२३ रोजी युको बँकेत कार्यकारी पदाची सूत्रे स्वीकारली आणि त्यानंतर ग्राहक सेवेसाठी समर्पित युको बँक प्रगतीशील प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करत आहे, जे २०२४-२५ या आर्थिक वर्षातील बँकेच्या व्यवसाय निकालांमध्ये देखील दिसून येते जिथे युको बँकेचा निव्वळ नफा ४७.८० टक्क्यांनी वाढून २,४४५ कोटी रुपये झाला आणि एकूण उलाढाल वार्षिक आधारावर १४.१२ टक्क्यांनी वाढून ५,१३,५२७ कोटी रुपये झाली.

# काटोलमध्ये शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिन साजरा




■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २० :

स्व बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्र च्या हिताकारिता येवंम मराठी माता बघीनी च्या हिता करिता 1 संघटना निर्माण करून आदरणीय एकनाथजी शिंदे यांच्या नेतृवात समस्त भारतात महाराष्ट्रची ऐक ओळख निर्माण केली आज या शिवसेना पक्षाच्या स्थापनेला 59 वर्षं पूर्ण झाले.

या निमित्य पूर्व विदर्भ संघटक मा.किरण पांडव यांच्या मार्गदर्शनात काटोल मधील सर्व शिवसैनिक एकत्र येऊन हा सोहळा मोठ्या आनंदात आणी खेळीमेळीच्या वातावरनात साजरा केला. प्रसंगी किशोर सरायकर, अरविंद बेले, नमाजी अली, दिलीप गायकवाड, प्रशांत माणकर, प्रशांत बारई, माधव अनवाने, आशिष जयस्वाल,यादव बगडदे,अनिल नेहारे, गंगाधर वंजारी, विपुल देवपूजारी, संजय भोंडे, अरुण कोल्हे, रवी नाईक, रमेश गुंदी, मंगेश बाळबुधे , विक्रम सावळकर, किशोर खोजरे, आधी सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

# पंचायत समिती रामटेक येथे सर्पदंश व उपायावर कार्यशाळा



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २० :

दि.१९ जूनला पंचायत समिती रामटेक येथील शेतकरी भवन येथे विषारी व बिनाविषारी सर्प ओळख, विषात्त लक्षण, प्राथमिक उपचार, योगा व ध्यान यावर कार्यशाळा आयोजीत केली होती. कार्यशाळेचे आयोजन बाईल्डलाईफ वेल्फेर सोसायरी नागपूर द्वारा आयोजीत केली होती.

या कार्यक्रमाचे अध्यक्षा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्मिता काकडे होत्या तर कार्यशाळे मध्ये हार्टफुलनेस सेंटरचे डॉ. दिक्षीत यांनी योगा व ध्यान यावर मार्गदर्शन केले. यावेळी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, आशा गटप्रर्वक, तालूक्यातील सर्व आशा स्वयसेविका, सर्पमित्र उपस्थित होते. कार्यशाला यशस्वीतेकरीता आरोग्य कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# कावळापेठ युआरबीचे काम सुरू



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

कावळपेठ शांतीनगर येथे मागील दोन वर्षापासून स्थानिक नागरिकांची रेल्वे अंडरब्रीजची मागणी होती, बहुजन समाज पार्टीच्या नेत्यांनी व स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी 9 मे ला पत्र परिषद घेतली, रेल्वेचे डिआरएम दीपक कुमार गुप्ता यांचीही 14 मे ला भेट घेऊन अंडरब्रिज करण्यासाठी त्यांना निवेदन दिले होते. त्याला विलंब झाल्यास रेलरोको ची धमकीही दिली होती. रेल्वेने ब्लॉक मिळत नसल्याचे कारण सांगून कामात अडथळे निर्माण केले होते. 27 मे 6 जून ला रेल्वे ब्लॉक करण्याचे आदेशही दिले होते, परंतु तांत्रिक कारणामुळे ते काम होऊ शकले नाही.

आज त्या बहुचर्चित, पेंडिंग व जनोपयोगी असलेल्या यूआरबी (अंडरब्रिज) च्या कामाची सुरुवात झाली. बहुजन समाज पाटीर्चे प्रदेश महासचिव पृथ्वीराज शेंडे, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, जिल्हा सचिव अभिलेश वाहने, उमेश मेश्राम, विनोद नारनवरे, सामाजिक कार्यकर्ते धरमभाऊ किरपान, अनिल खोब्रागडे आदींनी रेल्वेचे अभिनंदन करून या परिसरातील सर्वसामान्यांच्या हिताचे काम विनाविलंब पूर्ण करावे.

## निधन

# सुधाकर भलमे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :



येथील आदर्श नगर निवासी सुधाकर भलमे यांचे निधन झाले आणि ते ७४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.

त्यांच्या पार्थीवावर टेकडी वाडी स्मशान भुमीत शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आला. ते आदर्श नगर श्री गणेश नवदुर्गा हनुमान मंदिर सेवा समितीचे अध्यक्ष प्रफुल भलमे व युवासेना जिल्हा सरचिटणीस कपिल भलमे यांचे वडील होत.

# तिकीट तपास मोहिमेत एकाच दिवशी १२.५६ लाखांचा महसूल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

तिकीटविना आणि अनियमित प्रवासावर अंकुश ठेवण्यासाठी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाच्या वाणिज्य विभागाने दिनांक 19 जून 2025 रोजी व्यापक तिकीट तपास मोहीम राबवली.

ही मोहीम विभागीय प्रमुख तिकीट निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेत 80 तिकीट तपासणी कर्मचारी, 4 आरपीएफ कर्मचारी आणि 2 वाणिज्य निरीक्षक सहभागी होते. नागपूर, अमळा, बेतूल, वर्धा आणि बल्लारशा यांसारख्या प्रमुख स्थानकांवरून धावणाऱ्या 22 चालत्या गाड्यांमध्ये तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान एकूण 1933 प्रकरणे उघडकीस आली आणि एकाच दिवशी 12,56,650/- इतका विक्रमी महसूल मिळविण्यात आला. उत्कृष्ट कामगिरी करणारे कर्मचारी पुढीलप्रमाणेः चिंटुकुमार - 48 प्रकरणांतून 43,830 वसूल. रितेश सेवनिया - 60 प्रकरणांतून 35,000 वसूल. आलोक झा - 40 प्रकरणांतून 31,950 वसूल. वरील सर्व कर्मचारी 12721, 12296, 16031 या लांब पल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्यांमध्ये नियुक्त होते. तिकीट तपासणी मोहीम नागपूर विभागाच्या महसूल वाढीसाठी सकारात्मक पाऊल आहे.

# तेजस संस्थेकडून अन्न आणि किराणा सामानाचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २० :



तेजस बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी दानवीर मनोज बत्रा यांचा १९ जून २०२५ रोजी वाढदिवस होता संस्थेचे संचालक व संस्थेचे दानवीर किंवा संस्थेच्या परिवारा तील कोणाचाही वाढदिवस असो या वाढदिवस निमित्ताने लोकांना त्याच निमित्याने काही जरुरी सामान संस्था तर्फे आणून देत आहे. वाढदिवस निमित्ताने २० जून २०२५ रोजी कुंभारे कॉलोनी, जय भीम चौक, कादर झेंडा मज्जिदच्या मागे, भाजी मंडी, कन्हान सत्रापूर इथे भुकेल्यांना अन्न आणि किराणा सामानाचे वाटप करण्यात आले.

भुकेल्यांना मदत करणाऱ्यांमध्ये कामठी कॅन्टचे माजी उपाध्यक्ष महेंद्र भुटानी, नागपूरचे विदर्भ नेते सीए सुनील चोखरे, सीए शिल्पी टिबडीवाल, तिवारी गॅस एजन्सीचे संचालक बबलू तिवारी, सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र उर्फ मोंटू भुटानी, राजू अग्रवाल जीडी, महाराष्ट्र टेक्सटाईल सेंटर कामठीचे मनोज बत्रा, चौधरी हॉस्पिटलच्या संचालक डॉ राजेंद्र चौधरी, उपजिल्हा रुग्णालय कामठीच्या प्रभारी डॉ. नयना दुफारे, सामाजिक कार्यकर्त्या रजनी पिल्ले मॅडम व राजस्थान झालावाढ पोलिस मध्ये हवालदार पदम वर्मा, संस्थाचे मार्गदर्शक एम ए जब्बार , सदस्य अर्जुन उपासे, उपाध्यक्ष देवीदास पेटारे, संस्थाचे संस्थापक/अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांच्याकडून अन्न व किराणा सामान गोळा करतात आणि हा गोळा केलेला अन्न व किराणा असे लोकांना वाटप करत आहे ज्यांचे दुनिया मध्ये कोणताही सारा नसतात, अन्न किराणा वाटप करताना संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पिटारे, मार्गदर्शक एम ए जब्बार, सदस्य अर्जुन उपासे उपस्थित होते.

अरगुलेवार यांनी जनताला दोन्ही हात जोडून विनंती केली की, या लोकांच्या कोणताही आधार नाही आहे आणि काही लोकांना दोन्ही डोळेना काय दिसत नाही कोणाचे दोन्ही पाय काम करत नाही. तेजस संस्था तर्फे आणि ज्यांना अन्न व किराणा सामान देत आहे असे प्रत्येक लोकांच्या काही ना काही मोठा त्रास आहे. यांच्या त्रास कमी करण्याकरिता यांच्यासाठी कामठी मध्ये एक वृद्ध आश्रम ची स्थापना करायची आहे यानिमित्त मी आपले सगळे सन्माननीय गन दोन्ही हात जोडून विनंती करतात की आमचे कॅम्पेनिंग मध्ये आम्हाला तनमन धनाने संयोग करा हीच माझी विनंती आहे. यांच्या साठी वृद्धाश्रम बांधण्यासाठी मदत करण्याची विनंती केली.

# विज्ञान कथाकार डॉ. जयंत नारळीकरांना विज्ञान कथाकथनाद्वारे आदरांजली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

'मैत्र 'तर्फे जागतिक ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ, पद्मविभूषण, विज्ञान कथाकार डॉ. जयंत नारळीकरांना विज्ञानकथाकथनाद्वारे नेहमी साहित्य विषयक नवनवीन उपक्रम राबवणाऱ्या 'मैत्र ' परिवारातर्फ नवदृष्टी सभागृहात स्व. जयंत नारळीकर यांना कथारूप आदरांजली अर्पण करण्यात आली. डॉ. श्रीकांत गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मैत्र ग्रुपच्या डॉ.अरुंधती वैद्य यांनी डॉ. जयंत नारळीकरांच्या विज्ञानकथांची वैशिष्ट्ये व मयार्दा यांवर प्रकाश टाकला. नारळीकरांच्या जाण्याने विज्ञान विश्वातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला. डॉक्टर नारळीकरांनी कथात्मक लेखनाला आयुष्यभर एखाद्या व्रतासारखं सांभाळलं.

समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, अंधश्रद्धा दूर व्हावी म्हणून त्यांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले, असे आपल्या प्रास्ताविकात अरुंधती वैद्य म्हणाल्या. अध्यक्ष डॉ. श्रीकांत गोडबोले यांनी लेखकांचे असमाधान हीच त्यांची प्रबळ प्रेरणा आहे असे नमुद केले. विज्ञान कथालेखनाचा प्रयत्न करणाऱ्या सहभागी लेखिकांचे अभिनंदन केले.

स्मीता सदावर्ते यांनी निरंजन घाटे यांची 'एका कथेची कथा' तर निमा बोडखे यांनी डॉ. जयंत नारळीकर यांची गाजलेली धोंडू ' ही कथा, अंजली पांडे यांनी स्वलिखित 'खळांची व्यंकटी सांडो 'ही कथा कथन केली. अपर्णा विचोरे आठल्ये यांनी 'विज्ञानाचा जन्म ' आणि डॉ. नुतन देव यांनी 'गुरुत्वशुन्यतेत हरवलेले गाव 'या स्वलिखित विज्ञानकथा सादर केल्या. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे उपस्थितांना नारळीकरांच्या जीवनावर आधारितपाच प्रश्न विचारण्यात आले.

या प्रश्नमंजुषेत श्री. उपस्थित असलेल्या दत्तप्रसाद शिरसाठ यांनी प्रश्नांची अचुक उत्तरे दिलीत. त्यांना स्मिता सदावर्तेतर्फे छोटीशी भेट देण्यात आली. यावेळी सहभागी सदस्यांचे स्वागत कार्यक्रमाच्या आयोजक डॉ. अरुंधती वैद्य आणि डॉ. गोडबोले ह्यांनी केले. डॉ. नुतन देव यांचे स्वागत के.डी. देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. अंजली भांडारकर यांनी उत्तम रित्या केले.

# वंचितच्या पूर्व विदर्भपदी रवींद्र शेंडे यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :



वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष रवींद्र शेंडे यांची पक्षाच्या पूर्व विदर्भ समन्वय समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रवींद्र शेंडे हे मागील सात वर्षांपासून वंचित बहुजन आघाडी मध्ये कार्यरत आहेत. आंबेडकर चळवळीचे आंदोलनकारी नेते म्हणून ते ओळखले जातात. खैरलांजी प्रकरणात त्यांची महत्त्वाची भूमिका होती.

भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या महाबोधी विहार मुक्ती आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. या निवडीबद्दल जिल्हा प्रभारी कुशल मेश्राम, माजी नगरसेवक राजू लोखंडे, विनोद हाडके, प्रफुल्ल माणके, सिद्धांत पाटील, धम्मदीप लोखंडे यांनी शेंडे यांच्या अभिनंदन केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ३४ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :



महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. शुक्रवार (ता.२०) रोजी शोध पथकाने ३४ प्रकरणांची नोंद करून ३१,३००/- रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० /- दंड) या अंतर्गत १७ प्रकरणांची नोंद करून ६,८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता,फुटपाथ,मोकळी जागा,अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.१००/-) या अंतर्गत ०१ प्रकरणांची नोंद करून १००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ०५ प्रकरणांची नोंद करून २,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली.

मॉल,उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल सिनेमाहॉल,मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्त्यावर कचरा टाकणे (रू.२,०००/-) या अंतर्गत ०२ प्रकरणांची नोंद करून ४,०००/- रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ०६ प्रकरणांची नोंद करून ६,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 0१ प्रकरणांची नोंद करून रू.१,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्त्यालगत ,फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचामलबा/ कचरा या अंतर्गत ०३ प्रकरणांची नोंद करून प्रत्येकी ५,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १२ प्रकरणांची नोंद करून २,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 0४ प्रकरणांची नोंद करून ४,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. लीविनाद- १८ इन्फ्रा यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल एकुण रु.10,000/- चे दंड वसुल करण्यात आले. तसेच कॉम्मेर्चेस क्लास्सेस यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु.5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. रघुकुल कान्स्त्रक्षण यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल एकुण रु.10,000/- चे दंड वसुल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे. सहयोग हॉस्पिटल व धीरज इन्फ्रास्ट्रक्चर यांच्याकडून बांधकाम साहित्य टाकल्याप्रकरणी प्रत्येकी रू. १०,००० हजार असे एकूण रू.२०,०००/- चा दंड वसूल करण्यात आला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. याग्येश स्टडी सर्कल यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु.5,000/- चे दंड वसुल करण्यात आला.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. इंडिअन डेरी यांच्याकडून प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याप्रकरणी रू.५,०००/- दंड वसूल करण्यात आला. मंगळवारी झोन अंतर्गत संजय मोटघरे यांच्याकडून प्रतिबंधात्मक यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल एकुण रु.10,000/- चे दंड वसुल करण्यात आले.


## जाहिरनामा

कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर

सक्सेशन केस नं. ०३/२०२५ — पे. ता. : २३/०७/२०२५

प्रोसेस नं. ७४६/२०२५ (२०/०६/२५)

Applicants :- 1) Nilambar Paduchand Naik, Age about 55
2) Chandrakala Nilambar Naik, Age 45 yrs
All Good Shed Road Ramgad, Kampted, Tah Kamptee Dist. Nagpur
.. V/S..
Non applicant :- Nil

सदरहू अर्जदारांनी **Late. Roshan Nilambar Naik** यांचा मृत्यु दिनांक २६/११/२०२४ रोजी झाली असुन यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख माननिय कोर्ट विद्यमान २ रे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांनी दि. २३/०७/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि घ्या लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न आल्यास अर्जदारांना **Late. Roshan Nilambar Naik** याचा मृत्यु दिनांक २६/११/२०२४ यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

# पिंपळधरा येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ ची मशाल फेरीने सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २० :

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत लोकसहभाग पद्धतीने सूक्ष्म नियोजनातून ग्रामस्तरीय हवामान अनुकूल आराखडा तयार करण्यासाठी तालुक्यातील पिपळधरा येथे मशाल फेरीचे आयोजन करून गावात प्रकल्प बाबत जनजागृती करण्यात आली.




या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे ,अध्यक्षपदी ग्राम कृषी विकास समिती अध्यक्ष व सरपंच कृष्णा ताडम उपस्थित होते. याप्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय येडे, तालुका कृषी अधिकारी दिपाली कुंभार, मंडळ कृषी अधिकारी संजय काळसर्पे, उप कृषी अधिकारी एन. व्ही. गहूकर, सहाय्यक कृषी अधिकारी एस. एम. गायधनी, प्रणय फुले, सुभाष बावनकर, स्वप्निल इडोळे, स्वप्निल गवळी, महेश बाळ, गोपाल इडोळे, आकाश ढोणे विद्या वाघ, अचल मेश्राम व प्रेरणा जाधव उपस्थित होते.

याप्रसंगी रवींद्र मनोहरे यांनी लोकसहभागातून सूक्ष्म नियोजनाने ग्रामस्तरीय हवामान अनुकूल आराखडा तयार करण्यासाठी पाण्याचा ताडेबंद, मृद व जलसंधारण कामाचे नियोजन, हवामान अनुकूल आराखडा, शेतकरी गट आणि उत्पादक कंपनी करिता कृषी व्यवसाय वैयक्तिक लाभाच्या बाबी आणि पर्यावरण संरक्षण, याबाबतचे सूक्ष्म नियोजन करण्यासाठी कोणत्या बाबी समावेश करता येईल याबाबत मार्गदर्शन केले, तसेच अॅग्री स्टॅग व फार्मर आयडी काढण्याबाबत सर्वांना आवाहन केले, प्रास्ताविकात संजय काळसर्पे यांनी शेतकऱ्यांना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना आपल्या गावासाठी कशी फायदेशीर आहे व त्यामुळे आपल्या गावाचा कसा विकास होणार आहे याबाबत प्रस्तावित मार्गदर्शन केले या कार्यक्रमास ग्राम कृषी विकास समितीचे सर्व सदस्य, कृषी ताई, स्वयंसेवक, प्रगतशील शेतकरी, व गावातील महिला शेतकरी, भजन मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सुर्वे नगर गार्डन येथे योग दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

भारतीय जनता पार्टी त्रिमूर्ती नगर भागातर्फे आज सकाळी ६ वाजता सुर्वे नगर गार्डन येथे योग दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला होता. त्यामध्ये जवळपास १०० नागरिकांनी सहभाग घेतला. योग गुरु मधुकर महल्ले व माया हाडे यांनी सर्वांकडून योग प्रात्यक्षिके करून घेतली. भाजपा त्रिमूर्ती नगर मंडळाचे अध्यक्ष ईश्वर डेंगळे,नगरसेविका मीनाक्षी तेलगोटे योग संयोजक शेखर भागवत, व माया हाडे या उपस्थित होत्या.

केमिस्ट आघाडी दक्षिण पश्चिम नागपूरचे अध्यक्ष नरेश पांडे यांच्याकडून हेल्थ ड्रिंकचे वाटप करण्यात आले. प्रमुख वार्डातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते बूथ प्रमुख सपना रोडी, उषा पटले, हर्षा आयचीत, साधना दाते, मधुराणी छांगानी, योगेश भाऊ उपस्थित होते. वर्षा भोयर यांनी विशेष परिश्रम या कार्यक्रमासाठी घेतले.

# पंढरपूर आषाढी एकादशी वारी मेळ्यासाठी चार विशेष गाड्या चालविण्यात येणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

आषाढी एकादशी (मुख्य दिवस - ६ जुलै २०२५) निमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या वारी मेळ्यादरम्यान यात्रेकरूंची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर आणि मिरज दरम्यान चार विशेष गाड्या (गाडी क्र. 01205/01206) चालविण्यात येणार आहेत. या गाड्या ट्रेन ऑन डिमांड (योजनेअंतर्गत @1.3 भाडे दर योजना राबवून चालविण्यात येतील. महत्वाची माहितीः गाडी क्र. 01205 (नागपूर - मिरज विशेष) दिनांक 04.07.2025 आणि 05.07.2025 रोजी सकाळी 08:50 वाजता नागपूर स्थानकावरून प्रस्थान करील व दुसऱ्या दिवशी 11:55 वाजता मिरज स्थानकावर आगमन करेल. गाडी क्र. 01206 (मिरज -नागपूर विशेष) दिनांक 06.07.2025 आणि 07.07.2025 रोजी दुपारी 12:25 वाजता मिरज स्थानकावरून प्रस्थान करील व दुसऱ्या दिवशी 12:55 वाजता नागपूर स्थानकावर आगमन करेल.



मार्गातील थांबेः अजनी, वर्धा, पुलगाव, धामणगाव, चांदूर, बडनेरा,मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहमदनगर, दौंड, कुडूवाडी, पंढरपूर, सांगोला,म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठे महांकाळ, सलगर, अरग आणि मिरज. कोच संरचनाः 10 शयनयान डबे, 4 सामान्य श्रेणी डबे, 2 वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे व 2 गार्ड-कम-लगेज डबे, एकूण 18 डबे.

यात्रेकरूंनी प्रवासाची योग्य वेळी आखणी करून या विशेष गाड्यांचा लाभ घ्यावा. आरक्षणासाठी प्रवासी जवळच्या आरक्षण केंद्रात संपर्क साधू शकतात किंवा कक्ष्ळळउ च्या संकेतस्थळावर ऑनलाईन आरक्षण करू शकतात.

# त्रिभाषा सूत्रांची सक्ती मागे घ्या

## एस.एफ.आय. व डी.वाय.एफ.आयच्या वतीने निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २० :

सरकारने वीस विद्यार्थ्यांची अट टाकून काढलेले हिंदी सक्तीचे शुद्धिपत्रक मागे घ्यावे व त्रिभाषा सूत्र पहिलीपासून लागू करू नये अशी मागणी विविध संघटनेच्या वतीने निवेदनात रामटेक तहसीलदार रमेश कोडपे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.




महाराष्ट्रात इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत तिसरी भाषा सक्ती करणे म्हणजे बालवयात मुलांच्या खांद्यावर तीन भाषा शिकण्याचा ओझा टाकून ताण वाढवणे होय. त्याचप्रमाणे तिसरी भाषेची म्हणजेच आता हिंदी भाषेची सक्ती म्हणजे मराठी भाषा, महाराष्ट्राच्या स्वाभिमान व मराठी संस्कृतीवर हल्ला आहे.

स्टुडन्ट फेडरेशन ऑफ इंडिया, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया, शेतमजूर युनियन चा वतीने राजू हटवार, संदेश रामटेके व अमित हटवार यांनी सादर केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे.

पूर्वीच, नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी व पदव्युत्तर शिक्षणात ही नवनवीन विषयाचा ओझा टाकण्यात आला आहे आणि त्यामुळे अनेक विद्यार्थी विषयात नापास होऊन व अभ्यासाच्या ताण घेऊन शिक्षण प्रवाहातून बाहेर फेकले जात आहे. आता हे त्रिभाषिक सूत्र राबवून प्राथमिक स्तरावरही विद्यार्थ्यांना ताण देण्याच्या प्रयत्न सुरू आहे.

याव्यतिरिक्त महाराष्ट्रात मराठी शाळा बंद पडत आहेत, अनेक महत्त्वाचा विषय शिकवणाऱ्या शिक्षकांची पदे रिक्त आहे, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराचा संधी नाही या मुद्याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया चे जिल्हाध्यक्ष अमित हटवार यांनी म्हंटले आहे.

# बैतूल स्थानकावर आरोग्य तपासणी शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

20 जून 2025 रोजी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रमुख वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली बैतूल स्थानकावर एक सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. हे शिबिर रेल्वे कर्मचाऱ्यांचे, सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्य संरक्षणासाठी आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये बीएमआय, डोळ्यांची तपासणी, रँडम ब्लड शुगर, रक्तदाब तपासणी व सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार अधिक रक्त तपासण्या करण्यात आल्या व गंभीर रुग्णांना उच्च वैद्यकीय केंद्रात पाठविण्यात आले. गरजू रुग्णांना आवश्यक औषधे मोफत वितरित करण्यात आली. हायपरटेन्शन, मधुमेह आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणारे सत्र आयोजित करण्यात आले. याशिवाय, डॉ. सुमित साठपुते (DMO/नागपूर) यांनी उढफ आणि प्राथमिक उपचारांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. उष्माघात, अपस्मार (मिर्गी) आणि बँडेजिंग अशा आपत्कालीन परिस्थितींमध्ये काय करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे आयोजन डॉ. सुमित साठपुते, मंजुषा माटे (DEE/नागपूर), महेश लांडे (Sr.NS/नागपूर), कैलाश माथनकर (CHI/आमला), रौनक हारोडे (Sr. Pharmacist/नागपूर), तसेच अफरीन आणि भारत मीणा (अटेन्डंट्स/नागपूर) यांनी केले. ही उपक्रम मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याण व आरोग्याबाबतच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

## नागपूर-मडगाव विशेष रेल्वेला ६ तास विलंब

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

आठवड्यात दोनदा धावणारी गाडी क्र. ०११३९ नागपूर-मडगाव ही विशेष रेल्वे नेहमीच ६ तास विलंब धावत असल्याने प्रवाशांना विनाकारण मनसंताप सहण करावा लागतो, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

नागपूर-मडगाव प्रवासाकरिता तासाऐवजी आता ३० तास लागत असल्याने प्रवाशांचे नियोजन विस्कळीत होते. नागपूर-मडगाव या रेल्वेमध्ये एकूण २४ डबे असतात. त्यातील एक डबा २ टायर एसी, ३ टायर एसीचे ५ डबे, ११ डबे, जनरलचे ५ डबे व २ डबे मिळून २४ डबे असतात.

# अर्थशास्त्र व नीतीशास्त्रावर शिक्षक प्रशिक्षण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

भारतीय ज्ञान परंपरेचा आधुनिक शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आयोजन म्हणून, अर्थशास्त्र व नीतीशास्त्र या विषयावर दोन दिवसीय शिक्षक प्रशिक्षण सिंबायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट स्टडीजमध्ये आयोजित करण्यात आले होते.

आयोजन जगद्गुरू श्री देवनाथ इंस्टिट्यूट ऑफ वैदिक सायन्स अँड रिसर्च व सिंबायोसिस टीचिंग लर्निंग रिसोर्स सेंटर यांच्या संयुक्तविद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला.

प्रशिक्षक डॉ. भरत दाश यांनी अर्थशास्त्र व नीतीशास्त्र या प्राचीन भारतीय ग्रंथांद्वारे शासनप्रणाली, नेतृत्व व नीतिमूल्ये यावरील मूलभूत तत्वांचा अभ्यास करण्यात येऊ शकतो यावर भर दिला. विशेष आकर्षण चाणक्य यांचे सप्ताह सिद्धांत हे होते, ज्यात त्यांनी आधुनिक व्यवस्थापन व संघटनात्मक संरचनेत या तत्त्वांचा प्रभावीपणे संदर्भ दिला.

जगद्गुरू श्री देवनाथ इंस्टिट्यूट ऑफ वैदिक सायन्स अँड रिसर्च सेंटरचे संचालक आचार्य श्रेयस कुङ्हेकर व अनुराग देशपांडे, सिंबायोसिस टीचिंग लर्निंग रिसोर्स सेंटरचे संचालक डॉ. समीर पिंगळे, समन्वयक डॉ. झेरिचो मारक, डॉ. भालचंद्र हरदास, डॉ. प्रफुल्ल साबळे, निरंजन देशकर यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## बागेतील बाक नागरीकांनी नेले घरासमोर न.प.कडून पुन्हा मैदानात ठेवण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

वाडी नगर परिषद अंतर्गत असणाऱ्या प्रत्येक सार्वजनिक बागेमध्ये नागरीकांच्या विश्रांतीसाठी बाक ठेवण्यात आले होते. मात्र, अलीकडील काही महिन्यांपासून या बागेतील बाक क्रमशः गायब होऊ लागले आणि तेच बाक आता परिसरातील काही रहिवाशांच्या घरासमोर दिसून येत आहेत.

नागरी सुविधांसाठी उभारण्यात आलेल्या या बाकांचा गैरवापर होत असून, काही लोकांनी ते स्वतःच्या उपयोगासाठी बेकायदेशीररित्या आपल्या वस्तीमध्ये नेऊन ठेवले आहेत.

त्यामुळे बागेत येणाऱ्या नागरीकांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था उपलब्ध नाही, परिणामी वृद्ध, महिला आणि लहान मुलांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक नागरीक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात नगर परिषद प्रशासनाचे लक्ष वेधले असून, बागेतील बाक परत मिळवून पुन्हा मैदानात ठेवावेत, अशी मागणी केली आहे.

याबाबत नगर परिषदेकडून लवकरच कारवाई करण्यात येईल आणि जे नागरीक बेकायदेशीररित्या बाक आपल्या घरासमोर ठेवून आहेत, त्यांच्यावर आवश्यक ती कायदेशीर पावले उचलण्यात येतील, अशी माहिती सूत्रांनी दिली. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि योग्य वापर हे सर्वांच्याच जबाबदारीचे असल्याचे नागरिकांनी लक्षात ठेवावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

वैद्यकीय मदत कक्षाचे संस्थापक मंगेश चिवटे वैद्यकीय मदत कक्षाचे कार्यध्यक्ष रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शनात वं. बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष पूर्व विदर्भ संपर्क प्रमुख प्रविण लता बालमुकुंद शर्मा नागपूर जिल्हा प्रमुख सचिन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली १९ जून रोजी शिवसेना वर्धापन दिन ५९ वा साजरा करण्यात आला.

वैद्यकीय मदत कक्ष विदर्भ कार्यालय धंतोली नागपूर येथे आणि वर्धापन दिनानिमित्त एक संकल्पना पण घेण्यात आली. वैद्यकीय मदतकक्षा तर्फे प्रत्येक एक रुग्णाला वेळोवेळी मदत मिळायलाच पाहिजे आणि योजनेचा लाभ मिळाला पाहिजे.

प्रत्येक कार्यालयात वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित विदर्भ प्रमुख प्रवीण शर्मा, नागपूर जिल्हा प्रमुख सचिन शर्मा, नागपूर जिल्हा शहर संपर्क प्रमुख राहुल हेडाऊ, नागपूर दक्षिण उपशहर प्रमुख राजेंद्र तिवारी, प्रेम (हितेश) मुंदाफळे समाजसेवक आणि सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# बेसा-पिपळा नगरपंचायत परिसरात रुग्णवाहिनी सेवेस सुरुवात



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २० :

नागपूर तालुक्यातील बेसा-पिपळा नगरपंचायत नागरिकांचे आरोग्य सुरळीत राहावे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी या हेतूने परिसरात २४ तास रुग्णवाहिनी सेवा सुरू करण्यात आली. या रुग्णवाहिनीचे लोकार्पण राज्याचे महसूलमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

हा उपक्रम केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रेरणेतून आणि पिपळा येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश चिंचुलकर यांच्या पुढाकारातून देशगौरव प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविण्यात आला आहे. या सेवेचा लाभ पिपळा, घोगली, बेसा आणि बेलतरोडी येथील नागरिकांना मिळणार आहे.

कोणत्याही गरजवंत व्यक्तीसाठी २४ तास रुग्णवाहिनी सेवा उपलब्ध असून ७७७४८४९६८६आणि ७७९६२०१२९६ या क्रमांकावर संपर्क साधून सेवा मिळवता येणार आहे.

बेसा-पिपळा नगरपंचायतचे मुख्याधिकारी भारत नंदनवार, देशगौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि माजी सरपंच नरेश भोयर यांनी नागरिकांना सामाजिक तत्त्वांना प्रोत्साहन देत आपत्कालीन काळात या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

यावेळी निखिल भोयर, हरिशंकर तिवारी, अंकुश धाडसे, निलेश चिंचुलकर, सुरेश पवनीकर, अमोल धनुष्कर, विठ्ठल नानवटकर आणि ह.भ.प. चारुदत्त मोडक उपस्थित होते.

## हिवरी नगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

पूर्व नागपूर परिसरातील हिवरी नगर येथे माजी नगरसेवक दुनेश्वर पेठे व मित्रपरिवाराच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री अनिल देशमुख, सुप्रसिद्ध कवी शब्बीर अहमद विद्रोही , मारवाडी संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम मालू, आदर्श विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सारडा,तिरळे कुणबी समाज संस्थेचे सचिव सुरेश जिचकार , ईस्टर्न पॉईंट शाळेचे संचालक प्राध्यापक श्रीकांत घोगरे, रवीनीश पांडे प्रामुख्याने उपस्थित होते.

## ब्रह्माकुमारीतर्फे रविवारी योग दिन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विद्यालयातर्फे वर्धा मार्गावरील जामठास्थित विश्व शांती सरोवरमध्ये रविवारी 22 जूनला सकाळी 8 वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन आयोजित करण्यात आला आहे.योग प्रशिक्षक डॉ. भरत गुप्ता, शोभा भागिया प्राणायामाची जाणीव करून देतील.

ब्रह्माकुमारी राजयोगिनी डॉ. दामिनी दीदी अध्यात्म व संगीत यांच्यात संतुलन राखून स्वतःवर कसे उपचार करावे, याबाबत मार्गदर्शन करतील. त्या पहिल्यांदाच नागपूरला येत आहेत. त्याच दिवशी संध्याकाळी 6 वाजता वसंतनगरातील सेवाकेंद्रात पॅरेंटिंग टुल्स फॉर ब्युटीफुल बाँडिंग या विषयावर त्यांचे व्याख्यान होईल. विशेष निमंत्रितांसाठी हा कार्यक्रम आहे. 23 जूनला येथेच संध्याकाळी 6 वाजता डेकोरेट युवा फ्युचर या विषयावर तरुणांसाठी कार्यक्रम आहे. 16 ते 30 वर्षे वयोगटातील तरुणांना प्राधान्य दिले जाईल. या दोन्ही कार्यक्रमांसाठी नोंदणी मोफत व अनिवार्य आहे.

## दोन हरवलेल्या महिलांची आरपीएफने केली यशस्वी सुटका



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :

19 जून 2025 रोजी सकाळी सुमारे 05:00 वाजता नागपूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वर ऑपरेशन डिग्निटी अंतर्गत आरपीएफ पोस्ट नागपूरने दोन महिलांना भांबावलेल्या अवस्थेत सापडल्यावर त्यांची सुटका केली.

उपनिरीक्षक विजयपाल सिंह यांच्या नेतृत्वाखालील आरपीएफ पथकाने गस्त दरम्यान या महिलांना संशयास्पद अवस्थेत पाहून चौकशी केली. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्यांना आरपीएफ पोस्टमध्ये आणून सहाय्यक उपनिरीक्षक बी. के. सरपाटे यांनी अधिक चौकशी केली. चौकशीत महिलांनी सांगितले की त्या दोघी सुमारे 10 दिवसांपूर्वी घरातून कोणालाही न सांगता निघून आल्या होत्या. त्यांची ओळख पटवून, बालाघाट जिल्ह्यातील संबंधित पोलीस स्थानकांशी संपर्क साधण्यात आला. तेथे त्यांच्या बेपत्ता होण्याची नोंद असल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर बालाघाट पोलीस पथक नागपूरला दाखल झाले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून, दोन्ही महिलांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. नागपूर आरपीएफच्या या तत्पर आणि संवेदनशील कारवाईमुळे दोन्ही महिलांची सुटका शक्य झाली आणि सार्वजनिक सुरक्षेबाबत आरपीएफची कटिबद्धता पुन्हा अधोरेखित झाली.

# प्रा. विजयकुमार यांचे योगदान अविस्मरणीय : प्रा. हरेराम त्रिपाठी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या वेदविद्या विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि महर्षि पाणिनी संस्कृत आणि वैदिक विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू प्रो. सी. जी. विजयकुमार विद्यापीठातून औपचारिकरित्या निवृत्त झाले. त्यांना निरोप देण्यासाठी बुधवार, १८ जून रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. हरेराम त्रिपाठी यांची उपस्थिती होती. सत्कार समारंभात वैदिक अभ्यास विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि सत्कामूर्ती प्रा. सी. जी. विजयकुमार, रामटेक कॅम्पसचे संचालक प्रा. हरेकृष्ण अगस्त्य, संस्कृत भाषा आणि साहित्य विभागप्रमुख प्रा. कविता होले, प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानविकी विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. कृष्णकुमार पांडे, भारतीय धर्म, तत्वज्ञान आणि संस्कृती विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. कलापिनी अगस्त्य यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक प्रा. हरेकृष्ण अगस्त्य यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी विद्यापीठातर्फे अधिष्ठाता प्रा. विजयकुमार यांना "संस्कृतविजयी" पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू प्रा. हरेराम त्रिपाठी यांच्या हस्ते प्रा. विजयकुमार यांना एक विशेष कौतुक पत्र देण्यात आले. हे कौतुक पत्र डॉ. जयवंत चौधरी यांनी वाचून दाखवले.

केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी यांनी एका विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे प्रा. विजयकुमार यांच्या गुणांमुळे आणि उत्साही व्यक्तिमत्त्वामुळे ते कधीही निवृत्त होणार नाहीत, तर काम करत राहतील आणि सर्वांना आनंद देत राहतील, अशी भावना व्यक्त केली आणि निवृत्तीनंतरच्या त्यांच्या भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रा. विजयकुमार यांचा विविध विभागांनी सत्कार केला. तसेच, डीन, विविध विभागप्रमुख, प्राध्यापक आणि अधिकाऱ्यांनी त्यांच्याबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू प्रा. हरेराम त्रिपाठी यांनी विद्यापीठाच्या स्थापनेत आणि विकासात प्रा. विजयकुमार यांचे योगदान अविस्मरणीय असल्याचे प्रतिपादन केले. प्रा. विजयकुमार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आयुष्यभर कालिदास संस्कृत विद्यापीठाचा ऋणी राहणार. त्यांनी आजवर जे काही पद आणि प्रतिष्ठा मिळवली आहे, त्याचे सर्व श्रेय कालिदास संस्कृत विद्यापीठाला दिले.

## स्मार्ट सिटीच्या ऑप्टिकल फायबर नेटवर्क अत्यावश्यक सेवा, खोदकामापूर्वी परवानगी घ्या

# डॉ. अभिजीत चौधरी यांचे विकास संस्थांना निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

विविध संस्थांकडून नागपूर शहरात सुरु असलेल्या विकास कामामुळे नागपूर स्मार्ट सिटीतर्फे लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीच्या ऑप्टिकल फायबर नेटवर्क मध्ये बिघाड होत आहे. विकास कामे करताना ऑप्टिकल फायबर नेटवर्क खंडित होतो आणि सुरक्षा प्रणाली मध्ये खंड पडतो. यासाठी ऑप्टीकल फायबर केबल्सला अत्यावश्यक सार्वजनिक सेवा समजून विकास कामात गुंतलेल्या संस्थांनी यासंदर्भात पूर्वसूचना द्यावी, असे निर्देश महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.

शहरातील ऑप्टिकल फायबर केबल्स खंडीत होत असल्याबद्दल यावर उपाययोजना करण्यासाठी नागपूर स्मार्ट सिटी तर्फे विविध विभागांची एक कार्यशाळा शुक्रवारी (२० जून) रोजी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत ऑप्टिकल फायबर केबल्सला



अत्यावश्यक सार्वजनिक सेवा म्हणून घोषित करण्यात आली तसेच शहराच्या विकास कामात गुंतलेल्या संस्थांना पूर्व सूचना देण्याचे निर्देश नागपूर महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ अभिजीत चौधरी यांनी दिले.

नागपूर महानगर पालिकेच्या डॉ पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित कार्यशाळाची अध्यक्षता डॉ चौधरी यांनी केली. अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी प्रामुख्याने उपस्थित होत्या. बैठकीत महावितरण, मनपा, बी एस एन एल महा मेट्रो सोबत इतर विभागाचे प्रमुख अधिकारी आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते. कार्यशाळेत संबोधित करताना आयुक्त यांनी सांगितले कि नागपूर शहरात कायदा आणि सुव्यस्था राखण्यासाठी नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत शहरातील ७०० चौकात सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले असून नागपूरच्या सुरक्षेसाठी हे फार महत्वाचे पाऊल आहे.

यामध्ये फायबर नेटवर्क खंडित होत आहे. याला रोखण्यासाठी स्मार्ट सिटी तर्फे एस ओ पी तयार करण्यात आली असून सर्व विभागांना आता खोदण्यापूर्वी स्मार्ट सिटी कडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच काही विभागांनी सुरक्षा ठेव सुद्धा जमा केलेली नाही, नेटवर्क पूर्ववत करण्यासाठी हे दुरुस्त करणे गरजेचे आहे.

त्यांनी सांगितले कि स्मार्ट सिटी तर्फे केबल नेटवर्क पूर्ववत करण्यासाठी एक एजन्सी नियुक्त करण्यात आली आहे. स्मार्ट सिटीचे प्रतिनिधी आणि एजन्सी सोबत चर्चा केल्या नंतर खोदकाम करावे असे त्यांनी यावेळी सांगितले.

आपल्या प्रास्ताविकात डॉ. शील घुले, महा प्रबंधक, ई गव्हर्नन्स विभाग, नागपूर स्मार्ट सिटी यांनी सांगितले कि नागपूर शहरात ७०० चौकात ३६८६ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहे. काही कॅमेरे बंद असून त्यामुळे नागपूर पोलीस, नागपूर महानगर पालिकेला त्रास होत आहे. कायदा सुव्यस्था आणि मान्सून दरम्यान कामे करण्यात कॅमेराचा वापर करण्यात येतो. स्मार्ट सिटी तर्फे सर्व विभागासाठी एस ओ पी तयार करण्यात आली असून आता सर्व विभागाने कोणतेही खोदकाम सुरु करण्यापूर्वी भूमिगत केबल्सची माहिती घेणे आवश्यक राहणार आहे.

कार्यक्रमाचे संचालन मनीष सोनी, जनसंपर्क अधिकारी यांनी केले. कार्यक्रमात महावितरणचे मुख्य अभियंता, मनपाच्या अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, स्मार्ट सिटीच्या कंपनीच्या सचिव भानुप्रिया ठाकूर, महामेट्रोचे वरिष्ठ डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर, नागपूर सुधार प्रन्यास, एम एस आर डी सी, जिल्हा परिषद, आणि इतर विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकी वाहन चालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २० :

खंडाळा शिवारातील नागपुर - जबलपुर महामार्गावरील कन्हान नदी पुला जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकी वाहन चालकाचा मृत्यु झाल्याने पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महेश श्रीराम भैरम (२६) रा. निसदखेडा हा ठेकेदारीत एम.एस.ईबी मध्ये मिटर रिडींग घेण्याचे काम करतो, महेशच्या गावात चेतन तुळशीराम राऊत (२३) हा राहत होता आणि हलदीराम कंपनी गुमथाळा येथे कामाला जात होता.

गुरुवार (दि.१९) जुन रोजी महेश कामा निमित्याने मित्रा सोबत कन्हान येथे आला होता. त्याचा भाऊ शेखर भैरम याने फोन करुन सांगितले की , खंडाळा शिवारातील नागपुर - जबलपुर महामार्गा वरील कन्हान नदी पुला जवळ चेतन राऊत चा अपघात झाला आहे. महेश भैरम आणि मित्र जितेंद्र दारोडे हे दोघे ही कन्हान नदी पुलाकडे जात असतांना नागपुर - जबलपुर मार्गावर नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. गर्दीत जाऊन पाहीले असता चेतनच्या कपाळाला मार लागुन तो बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसला.

सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन नागरिकांच्या मदतीने त्याला उचलून ॲम्बूलन्स मध्ये टाकून ऑक्सीजन देत उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे उपचारा करिता नेले असता डॉक्टरने तपासून चेतनला मृत घोषित केले.

अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजी पणाने चालवुन दुचाकी वाहनाला जोरदार धडक दिल. या धडकेत चेतन चा मृत्यु झाल्याने कन्हान पोलीसांनी महेश भैरम यांचा तक्रारीवरून अज्ञात वाहन चालका विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी काँग्रेसचा आक्रमक पवित्रा

## घोषणाबाजी करत मौदा उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २० :

राज्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी काँग्रेस पक्षाने गुरुवार १९ जून रोजी मौदा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आक्रमक मोर्चा काढला. रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश भोयर, नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यकारी अध्यक्ष अश्विन बैस यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या मोर्चात शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.




काँग्रेसने सरकारकडे शेतकऱ्यांच्या विविध १६ मागण्यांचे निवेदन दिले. त्यामध्ये शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, रखडलेला धान बोनस, हमीभाव, रोजगार हमी योजनेतून शेती व मजुरीची कामे, सोलर सक्तीविना पंपांना विज जोडणी, अतिक्रमण नियमित करून पट्टे वाटप, वीजदरात कपात, नैसर्गिक आपत्तीग्रस्त मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत, विविध योजनांच्या लाभार्थ्यांना निधी वितरण, एनएमआरडीएच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई, स्थानिकांना रोजगार, रस्त्यांचे डांबरीकरण, दुधाचे दरवाढ व स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार हमीभाव लागू करणे, पॅच प्रकल्पाच्या पाटबंधाऱ्यांची कामे पूर्ण करणे यांचा समावेश होता. खासदार श्यामकुमार बर्वे यांनी मोर्चा दरम्यान भाजप सरकारवर कडक शब्दांत टीका केली. कर्जमाफी, हमीभाव, बोनस देण्याची आश्वासने फक्त निवडणुकीपुरती आहेत. आता जनता रस्त्यावर उतरणार असून सरकारच्या निष्क्रियतेविरोधात उपविभागीय कार्यालये घेरली जातील, असा इशाराही त्यांनी दिला.

माजी मंत्री सुनील केदार यांनी भाजप सरकारवर ताशेरे ओढताना म्हटले, काँग्रेसच्या काळात सरसकट कर्जमाफी व्हायची. मात्र आजचे सरकार शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांवर गांभीयार्ने विचार करत नाही. मध्यमवर्गीय आणि लघुउद्योजकही त्रस्त आहेत. जीएसटीच्या नावाखाली त्यांचे नुकसान होत आहे.

यावेळी मोर्चात रश्मी बर्वे, अवंतिका लेकुरवाळे, तापेश्वर वैद्य, देवेंद्र गोडबोले, तुळशीराम काळमेघ, राजा तिडके, ज्ञानेश्वर वानखेडे, स्वप्नील श्रावणकर, योगेश देशमुख, शांता कुंभारे, शालिनी देशमुख, राजेश ठावकर, राजेंद्र लांडे, युवराज ठाकरे, राजेश निनावे, शकुर नागानी, साजा शेठ, विकी साठवणे, शुभम तिघारे, रंजना धनजोडे उपस्थित होते.

## मालमत्ता कर भरण्यासाठी २१ व २२ जूनला शिबीर

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या मंगळवारी झोनतर्फे वॉर्ड क्रमांक ५८ मधील नागरिकांकरीता मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी २१ व २२ जून रोजी दोन दिवसांचे शिबीर आयोजित केले आहे. जरीपटका भागातील साई वसंनशाह चौकात सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कर भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन मालमत्ता कर विभागातर्फे करण्यात आले आहे.

## सराखा शिवारात वाघाने केले गायीला जखमी

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २० :

रामटेक वनपरिक्षेत्र हद्दीतील गट ग्रामपंचायत बोरडा अंतर्गत येणाऱ्या सराखा गावातील शेतशिवारात भरदिवसा एका वाघाने गाईवर हल्ला करून तिला गंभीर जखमी केल्याची घटना आज दि. १८ जून रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली.



प्राप्त माहितीनुसार सराखा येथील रहिवासी सीताराम इस्तारी तोंडरे , वय ६१ वर्ष हे व्यवसायाने पशुपालक असून त्यांच्याकडे बरेच जनावरे आहेत. रोजप्रमाणे ते गावाजवळील परिसरात आपले सर्व जनावरे स्वतःच्या शेतात चरावयास घेऊन गेले असता अचानक सराखा शिवारात वाघाने अचानक गायीवर हल्ला केला. वेळेतच पशुपालकाने आरडाओरड केली असता वाघ गाईला सोडून पसार झाला.

या संपूर्ण घटनेची माहिती रामटेकचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांना देण्यात आली . त्यांनी तात्काळ मनसरचे क्षेत्रसहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम, वनरक्षक रेखा चोंदे यांना घटनास्थळी पंचनामा करण्याकरिता पाठविले. जखमी गायीवर उपचार सुरू असून संपूर्ण वैद्यकीय खर्च वनविभाग करेल अशी माहिती वनविभागाने माध्यमान्ना दिली आहे. गेल्या पंधरा दिवसात सत्रापूर परिसरात रोजच वाघाचा धुमाकूळ सुरु असून गाय, बकरी, वासरू यांची शिकार केल्याची घटना घडून आली होती. नंतर सत्रापूर परिसरापासूनच अवघ्या अर्ध्या ते एक किलोमीटर अंतरावर बोन्द्री शिवारात वाघाने अचानक हल्ला करून गायीला जखमी केले होते.आता पुन्हा सराखा शिवारात वाघाने गायीवर हल्ला करीत जखमी केले आहे. वनविभागाने या वाघाचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी स्थानिकांकडून केले जात आहे.

## ३.४० लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर :** परदेशात फिरायला गेलेल्या कुटुंबाकडे घरफोडी करून चोरांनी रोकड आणि दागिन्यांसह 3 लाख 40 हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी प्रशांत बिसेन टंडन (44) रा. वनराईनगर, परिवर्तन चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. गत 6 जून रोजी प्रशांत घराला कुलूप लावून कुटुंबासह थायलॅन्ड येथे फिरायला गेले होते. या दरम्यान चोरांनी मुख्य दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 1 लाख, हिरेजडित अंगठी आणि इतर दागिने असा एकूण 3.40 लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेला. टंडन कुटुंब घरी परतल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

## मोटारसायकलची मेट्रोच्या पिल्लरला धडक

### एकाचा मृत्यू, दुसरा गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

वर्धमाननगर मार्गावर मोटार सायकलस्वार दोन तरुण मेट्रोच्या पिल्लरवर जाऊन धडकले. या अपघातात चालकाचा मृत्यू झाला, तर मागच्या सीटवर बसलेला तरुण गंभीर जखमी आहे. सचिन रमेश धार्मिक (29) रा. अंबेनगर, पारडी असे मृताचे नाव आहे. जखमी जितेंद्र मोरेश्वर कुडे (30) याच्यावर उपचार सुरू आहेत. जितेंद्र आणि सचिन हे दोघेही मित्र आहेत. गुरूवारी दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास दोघेही सचिनच्या एमएच-49/एसी-4367 क्रमांकाच्या मोटारसायकलवर बसून काही कामाने जात होते. आंबेडकर चौकातून वर्धमाननगरकडे जाताना सचिन भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत होता.

# विद्यार्थ्यांनी सिकलसेल बद्दल समाजात जागृती करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

जागतिक सिकलसेल दिनानिमित्त रा. स्व.संघ लोककल्याण समिती द्वारा संचालित लोककल्याण डायग्नोस्टिकस तर्फे इंदुताई गायकवाड पाटील आयुर्वेदिक व फिजिओथेरेपी कॉलेजमध्ये सिकलसेल जनजागृती कार्यक्रमा अंतर्गत विद्यार्थांसाठी पोस्टर स्पर्धा, व्याख्यान, वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी लोककल्याण डायग्नोस्टिक्सचे अध्यक्ष डॉ विजयकुमार तुंगार, सचिव आनंद मुळे, तांत्रिक सल्लागार निलेश जोशी, प्रकल्प समन्वयक विनय आंबुलकर, इंदुताई गायकवाड




पाटील कॉलेजचे संचालक संदीप गायकवाड, फि जियोथियरोपी विभागाच्या प्राचार्य डॉ पल्लवी ढोबळे, आयुवेर्दीक कॉलेजचे प्राचार्य हेमंत येंडे, अर्निका फाउंडेशनचे डॉ अंकित भांगे यांची उपस्थिती होती.

विनय अंबुलकर यांनी लोककल्याण डायग्नोस्टिकसतर्फे राबविण्यात येणाऱ्या सुश्रुता प्रकल्पाच्या माध्यमातून सिकलसेल व थालेसेमिया संबंधित चालणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती दिली व विद्यार्थ्यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून समाजात सिकलसेल बद्दल जागृती करण्याचे आवाहन केले. डॉ अंकित भांगे यांनी सिकल सेल आजारसंबंधित माहिती तसेच, त्याचे परिणाम आणि त्यावर उपाय यासंबंधीत माहिती दिली. यावेळी १३५ विद्यार्थ्यांची सिकलसेल थलेसेमियासाठी रक्त संकलन करण्यात आले

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धेचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

नागपूर महानगरपालिका व शहर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित १५ वर्षांखालील मुले व मुलींच्या मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा २०२५ या स्पर्धेचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवार २१ जून सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राहणार आहेत.



मुला-मुलींमध्ये भारतीय खेळांबद्दल आकर्षण निर्माण व्हावे, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाने यासाठी पुढाकार घेतला आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सहकार व नागरी उड्डयण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष संजय कुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस उपस्थित राहणार आहेत.

ही स्पर्धा तीन दिवस चालणार असून, यात देशातील १५ वर्षांखालील उदयोन्मुख कुस्तीपटू सहभागी झाले आहेत. शुक्रवारपासून सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत या स्पर्धा सुरु झाली आहे. १५ वषार्खालील राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा होत आहे. फ्रीस्टाईल व ग्रीको रोमन या दोन प्रकारामध्ये होणाऱ्या स्पर्धेत २५ राज्यांतील १२०० ते १५०० कुस्तीपटू आणि नऊशे पंच मार्गदर्शक व व्यवस्थापक सहभागी होणार आहेत. मुलांचे सामने ३८ ते ८५ किलो वजनगटांत,तर मुलींची स्पर्धा ३३ ते ६६ किलो वजनगटांत खेळली जाणार आह या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे प्रदान केली जाणार आहेत. या स्पर्धेचा समारोप रविवार २२ जून रोजी सायंकाळी ७ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी भूषविणार आहेत. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय नागरी उड्डयण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मान.चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष संजयकुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांच्यासह नागपूर जिल्ह्यातील सर्व खासदार व आमदार उपस्थित राहणार असल्याची माहिती शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी, महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर, आयोजन समितीचे उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे यांनी दिली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन डब्लुसीएलमध्ये १०१ ठिकाणी साजरा केला जाणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त, २१ जून ला वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड मध्ये १०१ ठिकाणी योग दिन साजरा केला जाणार आहे. उमरेड येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचा एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, डब्लू सी एल चे सीएम डी जे.पी. द्विवेदी आणि संचालक तांत्रिक (ऑपरेशन्स) ए.के.सिंह, संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक तांत्रिक (नियोजन आणि प्रकल्प) आनंद प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे पाचशेहून अधिक लोकांसोबत योग करतील.

त्याच वेळी,डब्लू सी एल च्या सर्व १० क्षेत्रांमध्ये एकूण १०० ठिकाणी योगाचा सराव केला जाईल. प्रत्येक ठिकाणी १०० हून अधिक सहभागी असतील, त्यामुळे १०,००० हून अधिक कामगार, कंत्राटी कामगार आणि कामगारांवर अवलंबून असलेले डब्लू सी एल मध्ये योगाभ्यास करतील.

कोळसा कामगार आणि त्यांच्या



अवलंबितांमध्ये योगाविषयी जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने, डब्लू सी एल ने २७ मे २०२५ पासून अनेक महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले आहेत. या काळात, ४ जागरूकता रॅली काढण्यात आल्या, ७० बूट कॅम्प आयोजित करण्यात आले, तसेच विद्यार्थी आणि कामगारांसाठी घोषवाक्य, प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. 'योगा ॲट वर्कप्लेस' द्वारे योग प्रशिक्षण देण्यात आले ज्यामध्ये ६००० हून अधिक लोकांनी भाग घेतला. विविध ठिकाणी बॅनर आणि पोस्टर्सद्वारे लोकांना जागरूक करण्यात आले. अनेक ठिकाणी योगाशी संबंधित माहिती असलेले पत्रके वाटण्यात आली. 'योग्य श्वासोच्छवासाचे तंत्र आणि त्याचे फायदे' या विषयावर सत्रे आयोजित करण्यात आली ज्यामध्ये १५००० हून अधिक लोकांनी भाग घेतला.

यादरम्यान, डब्लु सी एल च्या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा योग्य वापर करण्यात आला. दररोज, या प्लॅटफॉर्मवर योगाभ्यास करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे व्हिडिओ अपलोड करण्यात आले. बूट कॅम्पच्या व्हिडिओंद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. या दरम्यान, सुमारे १०,००० कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन दिनचर्येत योगाभ्यासाचा समावेश करण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. च्या या सर्व प्रयत्नांमुळे लोकांमध्ये योगाविषयी जागरूकता आणि स्वीकृती निश्चितच वाढेल.

# नागपूर वरूड बसमधून प्रवाशाला उतरविले

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. २० :

नागपूर वरून कळमेश्वर ला येण्याकरिता मध्यवर्ती बस स्थानकावरून नागपूर वरुड बस मध्ये बसलेल्या प्रवाशाला कळमेश्वरला या बसचा थांबा नसल्याचे कारण देऊन व प्रवाशांसोबत असभ्य वर्तन करून प्रवाशाला खाली उतरविण्याचा प्रकार काल दिनांक 19 जून रोजी दुपारी अडीच ते तीन वाजता दरम्यान नागपूर गणेश पेठ बस स्थानकावर घडला.

कळमेश्वरातील सामाजिक कार्यकर्ते अजय खेडकर नामक गृहस्थ व काही सहप्रवासी नागपूर बस स्थानकावरून कळमेश्वरला येण्याकरिता फलाटावर लागलेल्या नागपूर वरुड बस क्रमांक एम एच 40 एन 95 25 वर्धमान नगर आगाराची बस वरुड ला जाण्याकरिता लागली होती. बस मध्ये बसलेले अजय खेडकर यांनी कळमेश्वर ची तिकीट




मागितली असता बस वाहक कमरु निसार यांनी ही बस कळमेश्वरला थांबत नसल्याचे कारण सांगत चक्क अजय खेडकर व व प्रवाशांना खाली उतरविले. अजय खेडकर दुसऱ्या बसणे कळमेश्वरला आले तेव्हा नागपूर वरुड तीच बस त्यांना कळमेश्वर बस स्थानकावर दिसली. तेव्हा अजय खेडकर यांनी त्या बस वाहकाला या बसचा कळमेश्वरला थांबा नव्हता तर ही बस कळमेश्वर बस स्थानकावर कशी थांबली याची विचारणा केली असता बस वाहकाने असभ्य वर्तन करीत तुम्हाला माझी तक्रार कुठे करायची आहे, तर करा माझे कुणीही काही करू शकत नाही, अशा शब्दात बोलले.

तसेच चालक जनबंधू यांनी सुद्धा मला उडवा उडवीची उत्तरे दिली. याबाबत अजय खेडकर यांनी विभागीय नियंत्रक नागपूर येथे आज दिनांक 20 जूनला लेखी तक्रार देऊन वाहक व चालक यांच्यावर कडक कारवाईची मागणी केली आहे. कळमेश्वर हे तालुक्याचे ठिकाण असून येथून काटोल वरुड अमरावती मोर्शी सावनेर नागपूर व अन्य गावाला जाणाऱ्यां प्रवाशांची मोठी संख्या असून या बसस्थानकावर प्रत्येक बसचा थांबा आहे.

परंतु नागपूर वरूड नागपूर मोर्शी नागपूर अमरावती नागपूर परतवाडा या नागपुर वरून सुटणाऱ्या बसेस मध्ये कळमेश्वर ला येणारे प्रवासी चढले. तर वाहक त्यांना कळमेश्वर ला थांबा नसल्याचे कारण देत. अक्षरशः प्रवाशांना खाली उतरून देण्याचे प्रकार नेहमी नागपूर गणेश पेठ बसस्थानकावर घडत असतात. नाईलाजास्तव प्रवाशांना खाजगी बस किंवा स्टार बस स्थानकावर जाऊन कळमेश्वरला यावे लागते वरील बसचा कळमेश्वरला थांबा नव्हता तर ही कळमेश्वर बस स्थानकावर का आणली व कळमेश्वर वाहतूक नियंत्रकाकडे या बसची नोंद का करून घेतली हा प्रश्न निर्माण होतो. प्रवाशाचे सेवेसाठी ही ब्रीद असलेली एसटी प्रवाशाचे सेवेसाठी की प्रवाशांसोबत असभ्य वागणूक करण्यासाठी हा प्रश्न प्रवासी करीत आहेत. अजय खेडकर यांनी लेखी स्वरूपात नागपूर विभाग नियंत्रक यांचेकडे आज दिनांक 20 जूनला तक्रार दाखल केली असून केलेल्या तक्रारीवर एसटी प्रशासन वाहक व चालक यांचे वर काय कारवाई करते याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.